# दलित कथा
# आणि विटाळ

डॉ. पवन मांडवकर



१०.९. एका झाडानं किती टकरावं? / ८४
१०.१०. घुसमट / ९३
११. 'विटाळ' या कथासंग्रहाची वैशिष्ट्ये आणि कथाकार म्हणून दया पवारांचे दलित साहित्यातील योगदान / १००
११.१. पवारांच्या कथेवरील आरोप / १०४
११.१.१. पात्रांची संख्या कमी / १०४
११.१.२. सरळसोट निवेदन / १०४
११.१.३. पांढरपेशी लेखन / १०५
११.१.४. पुनरावृत्ती / १०५
११.१.५. अकारण शेरेबाजी / १०६
११.१.६. कथानक कमी, व्यक्तिचित्रणे अधिक/१०७
११.१.७. भडक विद्रोहाचा अभाव / १०७
११.१.८. वर्तमानकालीन भाषाप्रयोग / १०८
११.२. पवारांच्या कथेची वैशिष्ट्ये / १०९
११.२.१. सामाजिक बांधिलकी / १०९
११.२.२. मानवकेंद्रितता आणि समाजव्यवस्थेविरुद्ध विद्रोहाचा सूर / ११०
११.२.३. शोषितांचे यथार्थ चित्रण / १११
११.२.४. आंबेडकरी तत्त्वज्ञानावर निष्ठा / ११२
११.२.५. वास्तवदर्शन / ११३
११.२.६. आत्मकथनात्मक शैली / ११४
११.२.७. आत्मशोधाचा प्रयत्न / ११५
११.२.८. संघर्षाचे सातत्य / ११५
११.३. पवारांच्या कथेतील वाङ्मयीन वैशिष्ट्ये / ११७
११.४. एक कथाकार म्हणून पवारांचे दलित साहित्यातील योगदान / १२०
संदर्भ / १२८



# दलित कथा आणि विटाळ

(दलित कथा आणि दया पवारांच्या 'विटाळ' कथासंग्रहाचे वाङ्मयीन मूल्यमापन करणारा संशोधनपर ग्रंथ)

डॉ. पवन मांडवकर

सुकृत प्रकाशन
सौ. शालन प्रकाश कदम
'शालीन', परमहंस सोसायटी,
१०० फुटी रोड, सांगली
☎ भ्रमणध्वनी : ९८५०५४९९९०

* ISBN 978-81-925945-9-0
* दलित कथा आणि विटाळ
(Dalit Katha Aani Vital)
* © डॉ. पवन मांडवकर
© Dr. Pavan Mandavkar
* लेखक - संपर्क - भ्रमणध्वनी : ९४२२८६७६७८
१. 'पद्मनिलया', ४२, शिवाजी नगर,
यवतमाळ ४४५ ००१
२. इंदिरा महाविद्यालय, कळंब,
जि. यवतमाळ ४४५ ४०१
३. विजय कॉलनी, रुक्मिणी नगर,
अमरावती ४४४ ६०६
* मुखपृष्ठ
डॉ. मनीष चोपडे, अमरावती
* प्रकाशन दिनांक ३ नोव्हेंबर २०२२
* प्रथमावृत्ती प्रती १०००
* प्रकाशक
सुकृत प्रकाशन
सौ. शालन प्रकाश कदम
'शालीन', परमहंस सोसायटी,
१०० फुटी रोड, सांगली
☎ भ्रमणध्वनी : ९८५०५४९९९०
* मुद्रक
दमयंती एजन्सी, कोल्हापूर
* मूल्य १९० रुपये

## अनुक्रम

१. अर्वाचीन मराठी कथा / ६
२. कथेकडून दलित कथेकडे / १०
३. दलित कथेचा प्रारंभ / १२
४. दलित कथेचे दोन टप्पे / १६
५. काही महत्त्वाचे दलित कथासंग्रह / १८
६. काही महत्त्वाचे दलित कथालेखक
आणि त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये / २०
६.१. अण्णाभाऊ साठे / २०
६.२. ना.रा. शेंडे / २२
६.३. बंधुमाधव / २२
६.४. शंकरराव खरात / २३
६.५. बाबुराव बागूल / २४
६.६. वामन होवाळ / २५
६.७. योगीराज वाघमारे / २६
७. दलित कथेची वैशिष्ट्ये / २७
८. दया पवारांची कथा / ३३
९. 'विटाळ' शीर्षकाचा ऊहापोह /३७
१०. 'विटाळ'मधील कथा आणि त्यांची समीक्षा / ३९
१०.१. फिडेल / ४०
१०.२. भूक / ४५
१०.३. पंख / ५०
१०.४. ससाणा / ५५
१०.५. आमदार / ६०
१०.६. साहेब, दिदी आणि गुलाम / ६५
१०.७. विटाळ / ७२
१०.८. वधस्तंभ / ८०

‘मनोरंजन’, ‘रत्नाकर’, ‘यशवंत’, ‘किर्लोस्कर’, ‘अभिरुची’, ‘सत्यकथा’ या मासिकांचा उल्लेख करावा लागेल. काही अपवाद वगळता प्रकाशित होणाऱ्या कथांचा आकार मात्र दीर्घ होता.

फडके, लिमये या प्रसिद्ध कथाकारांनी १९११ साली कथालेखनास प्रारंभ केला. दिवाकर कृष्णांनी याच काळात नव्या घाटाची कथा वाचकांसमोर आणली. त्यानंतर १९२६ ते १९४५ असा कथेचा दुसरा टप्पा गृहीत धरल्यास त्यात लघुकथेला प्राधान्य दिल्याचे लक्षात येते. फडके, खांडेकर, य.गो. जोशी, वि.वि. बोकील, अनंत काणेकर, दत्तात्रय रघुनाथ कवठेकर, श्री.म. माटे, ना.ग. गोरे, डॉ. अ.वा. वर्टी, सुखटणकर हे लेखक आणि कमलाबाई टिळक, कृष्णाबाई मोटे, विभावरी शिरूरकर, आनंदीबाई किर्लोस्कर या लेखिकांनी फार मोठ्या प्रमाणात कथेचे दालन समृद्ध केले. याच काळात र.वा. दिघे, ग.ल. ठोकळ, वामनराव चोरघडे, कुसुमावती देशपांडे इत्यादी कथाकार पुढे आले. विनोदी कथेलाही याच सुमारास चांगले दिवस आल्याचे दिसते. चिं.वि. जोशी, प्र. के. अत्रे  हे विनोदी कथाकार त्या काळात गाजले.

१९४५ नंतर मराठी कथेचा चेहरामोहराच बदलला. नव्या प्रवृत्ती व प्रकृतीच्या नवसाहित्याची ती सुरुवात होती. काव्य व कथा ह्या प्रांतात प्रथमच नवसाहित्य प्रवेशले. मर्ढेकरांनी त्यांच्या काव्यातून नवे संकेत रुजविले तर कथाक्षेत्रात



# दलित कथा आणि विटाळ

‘दलित कथा आणि विटाळ’ या ग्रंथात दलित कथेचा थोडक्यात परिचय देऊन दया पवारांच्या ‘विटाळ’ या कथासंग्रहावर अधिक जोर दिलेला आहे. दया पवारांचे कथावाङ्मयातील योगदान नेमकेपणाने शोधण्याचा हा प्रयत्न आहे. दया पवारांच्या कथेकडे वळण्यापूर्वी एक लक्षात घेतले पाहिजे की दया पवारांचा मूळ पिंड कवीचाच. एक कथाकार म्हणून ते खूप गाजले नाहीत; पण दलित कथेच्या क्षेत्रात त्यांचे नाव वगळून चालत नाही. पवारांच्या कथेचा अभ्यास करताना मराठी कथेतील दलित कथेचे स्थान व स्वरूप यांचाही आढावा घेणे आवश्यक आहे. अर्वाचीन मराठी कथेच्या पार्श्वभूमीवरच दलित कथेचे स्वरूप, तिची वैशिष्ट्ये आणि तिचे नेमके स्थान ठरविणे शक्य होईल. त्यानंतरच दया पवारांची कथा दलित कथेत नेमकी कुठे वावरते, याचा शोध घेता येईल, म्हणूनच येथे अर्वाचीन मराठी कथेवर आणि त्यानंतर दलित कथेवर थोडे भाष्य केलेले आहे. काही महत्त्वाच्या दलित कथासंग्रहांची सूचीही दिलेली आहे.

# १. अर्वाचीन मराठी कथा

मराठीतील पहिली कथा १८५४ मध्ये विष्णू घनश्याम नावाच्या लेखकाने लिहिली, असे स्थूलमानाने गृहीत धरले जाते.[१] ही कथा नोव्हेंबर, १८५४ पासून 'मराठी ज्ञानप्रसारक' या मासिकाने क्रमश: चार अंकांतून प्रकाशित केली. कथानिर्मितीची सुरुवातीची ही वाटचाल फारच मंद होती. याच मासिकाने पुढील दहा वर्षांत फक्त सोळा कथा प्रकाशित केल्या. यावरून कथा लिहिणारे लेखक आणि त्यांच्या लिहिण्याचा वेग लक्षात येतो. काही कथांवर कथाकारांची नावेही नसत. कथा कमीच लिहिल्या जात होत्या, असे तत्कालीन प्रकाशित कथांवरून सहज जाणवते.

सुरुवातीच्या मराठी कथा, या कामकथा, व्यभिचारकथा, उत्तानकथा, प्रेमकथा, साहसकथा, अद्‌भुतकथा, परिकथा, दंतकथा अशा स्वरूपाच्या होत्या. स्वतंत्र, वास्तववादी स्वरूपाच्या कथा त्या काळात अगदीच अभावाने दिसत. त्यानंतर बोकोशिओ यांच्या 'दी कॅमेरॉन' या तंत्रप्रसिद्ध कथासंग्रहाचा मराठी लेखकांवर मोठा प्रभाव पडला. 'दी कॅमेरॉन'मधील कथांची शैली व विषय यांनी मराठी कथाकार झपाटले गेले. पुढे काही कथांचे स्वैर अनुवाद झाले, तर काहींच्या कथानकांचा अंशत: उपयोग करून घेतला गेला. काहींची शब्दश: भाषांतरे झाली. १८९० नंतर चिनी आणि जर्मनी भाषांमधील कथांचीही रूपांतरे झाली. या कथा मराठीत



आणण्याचे काम 'मराठी ज्ञानप्रसारक', 'विविध ज्ञानविस्तार', 'ज्ञानसंग्रह', 'मनोरंजन' आणि 'निबंधचंद्रिका' या मासिकांनी केले. १८९० मध्ये ह.ना. आपटे यांचे 'करमणूक' मासिक सुरू झाले आणि मराठी कथा सामान्य वाचकांपर्यंत पोचली. १८९१ च्या सुमारास निघालेल्या 'लोकमित्र', 'शालापत्रक', 'महाराष्ट्र कोकीळ', 'सुशील' आदी मासिकांनीही मराठी कथा प्रकाशित करण्यास हातभार लावला; पण त्यांना मौलिक स्वरूप लाभले नाही. जनमानसाची पकड या कथा घेऊ शकल्या नाहीत.

१८९५ मध्ये 'मनोरंजन'मधून रहस्यकथा प्रकाशित होऊ लागल्या. पण पुढे १९०३ पर्यंत पन्नास वर्षांत मराठी कथेत म्हणावी तशी भर पडली नाही. या काळात सतरा मासिकांतून कथा प्रकाशित होत होत्या. त्यांना फारसा दर्जा मात्र नव्हता. याउलट या पन्नास वर्षांत 'कादंबरी' लोकप्रिय ठरली.

१९१५ साली हरिभाऊ आपटेंच्या स्फुटकथांचे संकलन प्रकाशित झाले. १९१६ साली वा.म. जोशी यांचा 'नवपुष्पकरंडक' नावाचा कथासंग्रह प्रकाशित झाला. याच कालखंडात हरिभाऊंनी 'करमणूक'मधून तर वि.सी. गुर्जरांनी 'मनोरंजन'मधून कथालेखन केले. पुढे कथालेखकांची संख्या वाढत गेली. काही मासिकांतून ध्येयधोरण ठरवून मराठी कथा प्रकाशित केल्या जाऊ लागल्या. त्यात 'करमणूक',

त्यांच्या डोळ्यांपुढे होता. त्यांच्या त्या काळातील लिखाणात चळवळीसंबंधीचा विचार जरी असला, तरी ती साहित्याची चळवळ नव्हती. त्यांचे प्रयत्न, भक्कम परंतु तरीही वैयक्तिक व फुटकळ स्वरूपाचे होते.'[३]

⊙⊙⊙

## ३. दलित कथेचा प्रारंभ

'महायुद्धानंतर जी कथा विकास पावत होती, ती कथा सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा यांपासून वंचित झालेल्या मध्यमवर्गीय पांढरपेशा लेखकांनी प्रामुख्याने घडविली होती. या कालखंडात उपेक्षितांचे, दलितांचे अंतरंग उकलून दाखविण्याच्या प्रेरणेने श्री.म. माटे यांनी पहिली कथा लिहिली, ती 'बन्सीधरा, तू कुठे रे जाशील?' या कथेमुळे मराठी कथेचा वाचक एका वेगळ्याच जगात आला. हा स्तर मध्यमवर्गीय पांढरपेशा वाचकांच्या ओळखीचा नव्हता. या उपेक्षितांच्या स्तराच्या वेदना माट्यांनी जाणल्या होत्या. त्यांना वाङ्मयरूप देण्याचा माट्यांचा प्रयत्न वेगळा होता. माट्यांनी 'उपेक्षितांच्या अंतरंगा'चे दर्शन घडविल्यामुळे काय परिणाम झाला? एक तर एक अनोखे जग दिसले, तेथले ओंगळ जीवन आणि तेथील पशुपातळीवर जगणारी पण 'माणुसकीचा



गाडगीळ, गोखले, भावे, माडगूळकर, शांताराम इत्यादी कथालेखकांनी नवकथेचे अभिनव दालन साहित्यक्षेत्रात उघडले.

१९४५ ते १९६० हा कालखंड नव्या प्रवाहाने न्हाऊन निघाला. जुन्या—नव्याचा संगमही या काळात आढळतो. श्री. ज. जोशी, मोकाशी, वसुंधरा पटवर्धन वगैरे कथाकारांनीही या साहित्यात भर घातली.

१९६० नंतर अनेक नवे नवे कथाकार पुढे आले. त्या अगोदरच ग्रामीण कथेलाही सुरुवात झाली होती. त्यात द.मा. मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर, रा.रं. बोराडे, शंकर पाटील, आनंद यादव यांनी वाचकांचे लक्ष वेधून घेतले. ग्रामीण कथेबरोबरच मार्क्सवादी विचार घेऊन काही कथाकार लिहीत होते. नवनवीन प्रयोग करणाऱ्यांमध्ये मधु मंगेश कर्णिक, चि. त्र्यं. खानोलकर, श्री.दा. पानवलकर, लीला श्रीवास्तव, दिलीप पु. चित्रे, जी.ए. कुलकर्णी यांची नावे घ्यावी लागतात. याच सुमारास नियतकालिके आणि अनियतकालिके यांचीही संख्या झपाट्याने वाढू लागली होती. गोष्टी, दीर्घकथा, लघुकथा यांच्या वाढीबरोबरच मध्यम व उच्चवर्णीय, उच्चवर्गीय यांचे मनोरंजन करून त्यांच्या भावभावनांना स्पर्श करण्यात कथा हा वाङ्मयप्रकार यशस्वी झाला होता.

⊙⊙⊙

## २. कथेकडून दलित कथेकडे

मराठी कथेचा प्रवाह अनेक अंगांनी, अनेक दिशांनी वळणे घेत बऱ्याच स्थित्यंतरातून जाऊनही फारसा रुंदावू शकला नाही. मध्यमवर्गीय परंपरा व त्यांच्या निष्ठा जोपासण्यातच मराठी कथा परिपुष्ट होत गेल्याचे जाणवते. ही कथा लिहिणारे कथाकार बहुतेक त्याच वर्गातील असल्याने त्यांच्या जाणिवा एका विशिष्ट मर्यादेपलीकडे जात नव्हत्या. मध्यमवर्गीयांच्या जीवनातील प्रश्न आणि त्यांचे वैयक्तिक व सामाजिक जीवन यांचेच प्रतिबिंब कळत नकळत पडत होते. या कथा कधी मनोविश्लेषणात्मक, कधी कौटुंबिक, सांस्कृतिक, पारंपरिक मूल्यांचाच पुरस्कार करीत होत्या. 'प्रेम' हा विषय बऱ्याच प्रमाणात अवतरत होता. भाषेचे सौंदर्य व बुद्धीचे चातुर्य खुलविण्यात किंवा दाखविण्यात या कथांचा हातभार लागत होता. पण जीवनातील तळागाळाकडे ह्या कथाकारांची दृष्टी कधी वळली नव्हती. या संदर्भात डॉ. योगेन्द्र मेश्राम म्हणतात, 'मराठीत नव्या कथेचे अवतरण महायुद्धोत्तर (१९४५ नंतरच्या) काळापासून झाले. युद्धोत्तर परिस्थितीत बदलत्या काळाचे पडसाद घेऊन आणि नव्या जीवन जाणिवा घेऊन मराठी कथा जन्माला आली. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले वगैरेंनंतर ग्रामीण तसेच प्रादशिक वाङ्मय बहराला येऊ लागले. ही ग्रामीण कथा जनसामान्यांपर्यंत पोचली. ती घडविण्यात व्यंकटेश माडगूळकर, द.मा. मिरासदार, शंकर



पाटील, आनंद यादव, रा.रं. बोराडे, जी.ए. कुलकर्णी आदी नव्या दमाचे कथाकार पुढे आले. पाश्चात्त्य वाङ्मयातल्या नव्या प्रवृत्ती, नवे मानसशास्त्रीय संशोधन, नवे आकृतिबंध येथे आल्याने जुन्या कथेचे पारंपरिक स्वरूप या लोकांनी आंतर्बाह्य बदलविले. परंतु त्यांच्या कथेतून एकदेशीयत्व पूर्णरूपाने व्यक्तविले गेले नाही. याचे कारण पाश्चात्त्य दृष्टीचा प्रभाव व भारतीय जीवनाबद्दल एकांगी दृष्टिकोन. एकूण काय तर हे लेखक आपल्या पांढरपेशी जीवन—दृष्टीपासून अलिप्त राहू शकले नाहीत; हे होय.'[२]

या कथाकारांवर आणि त्यांच्या कथांवर टीका करताना वामन निंबाळकर म्हणतात, 'झोपडपट्टीतील, महारवाड्यातील किंवा मांगवाड्यातील माणूस कधी कथेचा नायक झाला नाही. ही माणसे किंवा ती ठिकाणे कथांमधून आलीत, ती विद्रूप रूपाने व किळसवाणा प्रकार दाखवायला. त्यांचा चांगूलपणा, प्रामाणिकपणा, दिलेरपणा, निर्भीडपणा, शूरपणा किंवा इतरही तत्सम गुण रेखाटण्याचा प्रयत्न कोणत्याही कथाकाराने केला नाही. याच काळात बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्य व तत्त्वज्ञानापासून प्रेरणा घेऊन कष्टी, दलित कथाकार कथा लिहू लागले होते. त्यात अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बंधुमाधव वगैरे प्रमुख कथाकारांनी काही ताकदवान विद्रोही तर काही निवेदनात्मक कथा लिहिल्या. समाजजीवनाचे चित्रण करणे व दु:ख वेशीवर टांगणे हा भाग त्या काळी

प्रवर्तक म्हणून मान्य करतात; परंतु या संदर्भात डॉ. प्रकाश खरात यांचेच मत लक्षणीय वाटते. कारण या सर्वांच्या कथा आज जरी नवीन वाटत असल्या, तरी त्यातील विषय, शैली, तोंडावळा हे प्रारंभीच्या दलित कथेच्या काळातीलच आहेत.'[१०]

⊙⊙⊙

## ४. दलित कथेचे दोन टप्पे

दलित कथेच्या प्रारंभापासून तिचे ठळक असे दोन कालखंड दिसतात. पहिल्या कालखंडातील दलित कथा प्रबोधनाचे साधन आहे. दुसऱ्या टप्प्यावरील कथा वाङ्मयीन जाण असणारी आहे. पहिल्या टप्प्यावरील दलित कथेत ठळकपणे सवर्णांशी संघर्ष आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेविरुद्ध आवाज आहे, तर दुसऱ्या टप्प्यावर ह्या संघर्षाने निरनिराळी रूपे धारण केली आहेत. हा संघर्ष कधी अंतर्गत पातळीवर तर कधी स्वत:शीसुद्धा आहे. पहिल्या टप्प्यावरची कथा एकपदरी आहे. इ.स. १९६० नंतर दलितांच्या जीवनातील गुंतागुंत वाढली. राजकारणात गटबाजी आली. हा गुंता दलित कथेतही अवतरला. पहिल्या टप्प्यावरची कथा निखळ कार्यकर्त्यांनी लिहिली होती. तिच्या घाटात सफाई नव्हती. ही



गहिवर' असलेली माणसे दिसली.'[४]

वामन निंबाळकर यांच्या मते, 'श्री.म. माटे यांनी 'उपेक्षितांचे अंतरंग' चितारण्याचा मौलिक स्वरूपाचा प्रयत्न केला. त्यात दलितांविषयी सहानुभूती व कळवळा होता. परंतु माटे दलितांच्या प्रश्नाकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यापेक्षा गांधीवादी दृष्टिकोनातून अधिक पाहत होते.'[५] श्री.म. माट्यांना दलित लेखक म्हणून किंवा त्यांच्या साहित्याला दलित साहित्य म्हणून स्वीकारले गेले नाही. त्याचे स्पष्टीकरण करताना प्रा. दत्ता भगत म्हणतात, 'श्री.म. माटे ह्यांनी 'बन्सीधरा, तू कुठे रे जाशील?' अशा आर्त शीर्षकाची कथा लिहून मराठी वाचकाला प्रथमच दलित विश्वाचा परिचय करून दिला. तरीपण ही कथा खऱ्या अर्थाने दलित कथा नव्हे. 'उपेक्षितांचे अंतरंग' या संग्रहात माटे मास्तरांनी गावकुसाबाहेरच्या वस्तीचे दर्शन मराठी वाचकांना घडवले, हे त्यांचे वेगळेपण आहे. तरीपण त्यांच्या या कथांना दलित कथा म्हणता येत नाही. तहान—भूकेने व्याकुळलेल्या प्राण्याबद्दल माणसाला जसा एक स्वाभाविक कळवळा वाटतो, अगदी तसाच स्वाभाविक कळवळा माटे मास्तरांची कथा वाचल्यानंतर वाचकांच्या मनात निर्माण होतो. पण गावकुसाबाहेरचे हे जग आपल्याच विश्वाचा एक अभिन्न तुकडा आहे — केवळ दया बुद्धीने नव्हे तर आपल्याइतकाच हक्क म्हणून त्यांचा विचार सर्व पातळीवर व्हावा, अशी जाणीव ही कथा वाचल्यानंतर वाचकांच्या

मनात निर्माण होत नाही. ही माटे मास्तरांची मर्यादा नसून त्यांच्या जीवनदृष्टीचीच मर्यादा होय.'[६]

दलित कथेच्या प्रारंभाचा विचार करताना डॉ. रा.गो. चवरे यांचे मतही लक्षात घ्यावे लागते. 'तळागाळातील जीवांना न्याय मिळवून देण्याच्या कणवेने लेखन केलेल्या श्री.म. माट्यांच्या कथेत विषय अभिव्यक्तीचा एक संयत समंजसपणा दिसून येतो. तिला विद्रोहाची धार नाही. 'म्हारणीचा कुणबा' (ह.ना. आपटे), 'अगदी सोळा आणे' (वि.सी. गुर्जर), 'अस्पृश्य' (स.न. जोशी) या करमणूककालीन कथा केवळ करुणाभावनेने लिहिल्या गेल्या. १९६० पूर्वी व त्या दरम्यान ग्रामीण लेखकांनी अपवादात्मक दलित कथा लिहिल्या. शंकर पाटील यांची 'येणार येणार' ही कथा किंवा माडगूळकर, बोराडे, शेळके या ग्रामीण कथाकारांच्या दलित कथा मोजक्याच आहेत.'[७] परंतु या कथाकारांना दलित लेखक म्हणून समजले गेले नाही. मग प्रश्न पडतो, दलित कथेचा प्रारंभ नेमका केव्हा झाला?

प्रा. दत्ता भगत यांच्या मते, 'दलित कथेचा खरा आरंभ 'जनता' साप्ताहिकातील 'दलित दूरदर्शन' या सदराखाली प्रसिद्ध होणाऱ्या लेखनात आहे. हे लेखन निबंध आणि कथा यांच्या सीमेवरचे आहे. हे लेखन दौलत गुणाजी जाधव नावाच्या तरुण कार्यकर्त्याने केले आहे. याच नियतकालिकातून निर्गुणा कांबळे या स्त्री लेखिकेचे लेखनही प्रसिद्ध झाले.



गावातील सनातन प्रवृत्तीची जोपासना करणारा कारभारी व त्याच्या विरोधात बंड करणारी गावकरी जनता ह्यांचे ठसठशीत चित्रण निर्गुणा कांबळे यांनी केले आहे. ह्या काळातील ज्या लेखकाचा पुढे कथासंग्रह प्रकाशित झाला, असे एकमेव कथालेखक म्हणजे बंधुमाधव.'[८]

दलित कथेच्या प्रारंभाविषयी सुस्पष्ट मते आढळत नाहीत. एवढे खरे की, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुक्तिसंग्रामाबरोबरच दलित कथेचा जन्म झाला.'[९] साधारणपणे अगदी सुरुवातीची दलित कथा म्हणून 'बंधुमाधव' यांच्या कथेचा उल्लेख केला जातो. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ साली येवल्याला धर्मांतराची घोषणा केली. बंधुमाधवांनी आपल्या कथेतून आंबेडकरी चळवळीचे पडसाद मोठ्या प्रमाणावर उमटविले. १९५६ साली डॉ. आंबेडकरांनी हजारो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला आणि त्यानंतरच दलित साहित्याला खऱ्या अर्थाने प्रेरणा मिळाली. मात्र त्यावेळेसच एकट्या बंधुमाधवांच्या 'विखारी भाकर' किंवा 'बैत्याचा बैल'सारख्या कथा या चळवळीतील माणसे चितारीत होत्या. डॉ. प्रकाश खरात आपल्या पीएच.डी.साठी सादर केलेल्या दलित कथेवरील प्रबंधात दलित कथेचा प्रारंभीचा काळ 'जनता', 'प्रबुद्ध भारत' या साप्ताहिकांतून प्रसिद्ध झालेल्या कथांमधून सिद्ध करतात. मात्र काही समीक्षक शंकरराव खरात, बाबुराव बागूल, अण्णाभाऊ साठे यांना दलित कथेचे

## ६. काही महत्त्वाचे दलित कथालेखक आणि त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये

### ६.१. अण्णाभाऊ साठे

अवघ्या मराठी दोन इयत्तांपर्यंत शाळेची ओळख असलेले, तरीही दलित साहित्याचे उद्‌गाते ठरलेले अण्णाभाऊ साठे. ‘कल्पनेचे पंख लावून भराऱ्या मारण्यापेक्षा जे जीवन वाट्यला आले, जीवनातील जे भीषण नाट्य नशिबी आले, जे साक्षात डोळ्यांनी पाहिले आणि राहवले नाही म्हणून अनिवार जिव्हाळ्याने जे शब्दबद्ध झाले, ते अण्णाभाऊंचे साहित्य होय. स्वाभिमान, चारित्र्य, देशाचे स्वातंत्र्य आणि मानवी जीवनातील मांगल्य यांच्या पूजनासाठी त्यांनी अखंडपणे, जोशपूर्णतेने, आवेशाने आणि दमदारपणे लेखन केले. ‘अण्णाभाऊंची पात्रे पावित्र्याच्या रक्षणासाठी प्राणनिष्ठेने जीवन झोकून देणारी बंडखोर असतात. आपण मानलेल्या जीवनमूल्यांशी कधीही प्रतारणा न करण्याची वृत्ती, जीवननिष्ठा, समाजपरिवर्तनाचा ध्यास, दिलदार, उदास, उदात्त गुणसंवर्धनाचा ध्यास हा त्यांच्या साहित्याचा आत्मा होय.’[११]

अण्णाभाऊंच्या कथांमधील माणसांची दु:खे, वेदना या त्यांच्या स्वत:च्या होत्या. त्यात कृत्रिमता नव्हती. त्यांच्या कथांतील माणसे आणि जीवन त्यांनी आहे तसे उघड केले. म्हणून त्यांची कथा बेताल, बेबंद व मर्यादा ओलांडणारी



सफाई दुसऱ्या कालखंडातील दलित कथेत आढळायला लागली. पहिल्या टप्प्यावरील दलित कथा उघडपणे आंबेडकरी विचार त्या त्या निमित्ताने वाचकांना बोलून दाखवते, तोच विचार प्रत्ययाच्या पातळीवर अवतरतो, तो दुसऱ्या टप्प्यावरील दलित कथेत.

दलित कथेच्या पहिल्या विद्रोही पर्वात पहिले समर्थ कथाकार म्हणून अण्णाभाऊ साठे यांचे नाव आदराने घेतले जाते. त्याचप्रमाणे सम्यक दलित जीवन दर्शन घडविणारे शंकरराव खरात, ध्येयवाद व अद्‌भुततेवर भर देणारे ना.रा. शेंडे, दलित जीवनवास्तवाचा प्रत्ययपूर्ण आविष्कार करणारे म्हणून बंधुमाधवांचे नाव घेतले जाते. याशिवाय शंकरराव सुरडकर, ना.ब. जाधव, हरिभाऊ पगारे, हिं.गो. बनसोड, नामदेव व्हटकर, मुरलीधर भोसेकर, ज.वि. पवार आदी दलित कथालेखकांचा कालखंड हा दलित कथेचे पहिले पर्व म्हणून समजला जातो.

दलित कथेच्या दुसऱ्या विद्रोही पर्वात विद्रोही कथेचे शिल्पकार बाबुराव बागूल, काव्यात्म शैलीचे केशव मेश्राम, विनोदी लेखन करणारे वामन होवाळ, सामाजिक जाणिवा प्रत्ययकारितेने मांडणारे योगीराज वाघमारे, त्याचप्रमाणे भीमराव शिरवाळे, भास्कर चंदनशिव, माधव कोंडविलकर, सुधाकर गायकवाड, योगेन्द्र मेश्राम, अर्जुन डांगळे, अरुण कांबळे, चंद्रकान्त वानखेडे, गोपाल रेडगावकर, जगदीश कदम, व.बा.

बोधे, अमिताभ पद्मपाणी, सुरेश जाधव इत्यादी लेखकांचा समावेश केला जातो.

⊙⊙⊙

## ५. काही महत्त्वाचे दलित कथासंग्रह

१. डॉ. गंगाधर पानतावणे, प्रा. चंद्रकुमार नलगे (संपादन)
— दलित कथा
२. डॉ. एस.एस. भोसले (निवडक कथांचे संपादन)
— कै. अण्णाभाऊ साठे : निवडक कथा
३. अण्णाभाऊ साठे
— खुळंवाडी, कृष्णाकाठच्या कथा, बरबाद्या कंजारी,
फरारी, लाडी, आबी, भुतांचा मळा, राम—रावण युद्ध
४. बंधुमाधव
— आम्हीबी मानसं आहोत
५. शंकरराव खरात
— बारा बलुतेदार, तडीपार, दौंडी, सांगावा, गाव—शिव
६. ना.रा. शेंडे
— सावली, डोंगरमाथ्यावरील दिवा
७. बाबुराव बागूल
— जेव्हा मी जात चोरली होती, मरण स्वस्त होत आहे,



सूड (दीर्घकथा)
८. वामन होवाळ
— बेनवाड, वारसदार, येळकोट
९. अर्जुन डांगळे
— ही बांधावरची माणसं
१०. योगीराज वाघमारे
— उद्रेक, बेगड
११. अविनाश डोळस
— महासंगर
१२. योगेन्द्र मेश्राम
— रक्ताळलेली लक्तरे
१३. अमिताभ
— पड
१४. एकनाथ सोनवणे
— रुद्रावळ
१५. दया पवार
— विटाळ

⊙⊙⊙

समाजजीवनातील अनेक तपशील त्यांच्या कथेत येतात. दलित जीवनातील समाजशास्त्रीय तपशील देणारे खरात हे एकमेव कथाकार. 'ग्रामसंस्थेतील स्पृश्य आणि अस्पृश्य तसेच ग्रामसंस्थेशी निगडित असणाऱ्या उपेक्षित जमातींचे चित्रण खरात अत्यंत सहृदयतेने करतात. दलितांचे जीवन ज्या अंधश्रद्धांनी विस्कटले आहे, त्यामुळे त्यांच्या जीवनात निर्माण झालेले दु:ख यासंबंधीची अनेक करुण चित्रे त्यांच्या कथेत येतात.'[१५] खरातांच्या कथेतील सामाजिक प्रश्न इतके दाहक असतात की, ते आशय हरवून बसत नाहीत. त्यांची कथा बाह्य उपचारात न गुरफटता संपन्न आशय प्रकट करते.

⦿⦿⦿

## ६.५. बाबुराव बागूल

जीवनातील अनुभूतींचे अत्यंत परिणामकारक व भेदक वर्णन करणारे समर्थ दलित लेखक म्हणून बाबुराव बागूल यांचे नाव घेतले जाते. दलितांचे दैन्य, दारिद्र्य, त्यांच्या वाट्याला आलेले असह्य भोग, ज्या समाजाने मानवी हक्क हिरावून घेतले, त्यांच्या संबंधीचा विद्रोह, उद्रेक हे त्यांच्या कथेचे प्रकटविश्व. 'त्यांच्या कथेतील नायक बेदरकार व बंडाची भाषा बोलणारे नव्हे, बंडच जगणारे आहेत. त्यांना



वाटली. 'अन्याय, जुलुमाच्या रगाड्यात सापडलेली माणसे सहनशीलतेचे बंद झुगारून कसे बंड करतात, याचे दर्शन त्यांच्या कथांत होते. दलितांचे जीवन हे केवळ गुन्हेगारीचे, दुर्गुणांचे, ध्येयशून्यतेचे, भणंगपणाचे आहे असे नाही, तर याही जीवनात, माणुसकीची अर्थपूर्णता, प्रबल इच्छाशक्ती, आशाआकांक्षा, निष्ठा, मानव्याविषयी सजगता याचे अस्तित्व आहे, हे अण्णाभाऊंनी आपल्या कथांतून प्रतिपादन केले. त्यांनी चितारलेली माणसे त्यांच्या रक्तामांसाची होती. वारणेच्या खोऱ्यात, कृष्णाकाठी, खुळंवाडीच्या अवतीभवती वावरणारी होती. या माणसांची भाषा त्यांची स्वत:ची होती. या भाषेतूनच अण्णाभाऊंनी त्यांचे व्यक्तिमत्त्व उभे केले.'[१२]

अण्णाभाऊंच्या कथांमध्ये रंजकता आहे, एकसुरीपणा आहे, असे आरोप केले जातात. काही प्रमाणात तसे असेलही; पण त्यांचे सर्वच साहित्य एकसुरी आणि रंजक आहे, हे म्हणणे म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास केल्यासारखे होईल. त्यांचे उत्तरायुष्यातील लेखन पाहिले की लक्षात येते, परिस्थितीने त्यांच्यावर उगवलेला तो सूड होता. जीवनातील अस्थिरता, गुंतागुंत आणि अगतिकता यांना वाट देण्यासाठी त्यांनी स्वीकारलेली ती तडजोड होती. पण या तडजोडीतही त्यांची सामाजिक संवेदना जागी होती, हेही विसरता येत नाही.

⦿⦿⦿

## ६.२. ना.रा. शेंडे

१९३० च्या सुमारास ना.रा. शेंडे यांच्या कथालेखनास प्रारंभ झाला. त्यांच्यापुढे फडके—खांडेकरांची कथा होती. या कथांच्या आदर्शाने झपाटलेले शेंडे आपल्या माणसांची सामाजिक दु:खे चितारताना अनेकदा हळवे बनलेले दिसतात. परिस्थितीशरण माणसांची दैना आणि त्यांची असहायता ते नियतीच्या हवाली करतात. म्हणून ती माणसे सोशिक वाटतात, दुभंगून गेलेली वाटतात. आत्मतेजाने ती खवळून उठताना दिसत नाहीत. पण समाजव्यवस्थेने चिरडून टाकलेली त्यांची माणसे अशीच नियतिशरण असतात, हे सत्य त्यांच्या कथांतून प्रकट होते. 'शेंड्यांची कथा बंडखोर नाही किंवा कृत्रिमतेचे बंध झुगारून देणारी नाही. मात्र ती अनुभवांची नोंद सातत्याने करीत राहते. शेंड्यांची कथा विपुल नसली तरी, तिचे काळमूल्य नाकारता येत नाही.'[१३]

⊙⊙⊙

## ६.३. बंधुमाधव

परिवर्तनकाळात संघर्ष अटळ असतो. बंधुमाधवांनी या संघर्षाचे, त्यातून संभवणाऱ्या ताणतणावांचे, स्वत्वासाठी झुंजणाऱ्या मन:प्रवृत्तीचे चित्रण आपल्या कथेतून केले.



आम्हालाही माणूस म्हणून जगायचे आहे, या जिद्दीने उसळून आलेल्या माणसाचे मानस बंधुमाधवांनी नेमके पकडले. क्रूर समाजव्यवस्थेला नकार आणि आत्मनिष्ठेसाठी सर्वस्वाचे बलिदान करणाऱ्या निष्ठा आणि विद्रोह या प्रवृत्ती त्यांच्या कथेतून प्रकट झाल्या. 'बंधुमाधवांच्या 'वतनी कथा' म्हणजे दलितांच्या अस्मितेची जागच. अंधाराला कवटाळणारा आणि अंधारातून प्रकाशाकडे बेधुंदपणे जाणारा या दोन्ही अवस्था एकाच व्यवस्थेतून संक्रांत होत असतात. बंधुमाधवांनी या व्यवस्थेच्या मुळातील सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न कित्येक कथांतून केला आहे.'[१४] दलित कथेतील विद्रोह आणि नकाराच्या जाणिवा प्रारंभिक काळात बंधुमाधवांच्या कथेतूनच प्रकट झाल्या आहेत.

⊙⊙⊙

## ६.४. शंकरराव खरात

शंकरराव खरातांनी विपुल लेखन केले आहे. त्यांच्या कथांमधील माणसे सारे भोग वाट्याला येऊनही सोस सोस सोसणारी, निमुटपणे गिळता येईल तेवढे दु:ख गिळणारी, या साऱ्या जीवघेण्या चक्रफेऱ्यातून सुटका व्हावी, या अपेक्षेने आशाळभूतपणे कशाची तरी वाट पाहणारी आहेत.

विद्रोह' या ग्रंथात पृ. १८० वर करतात. असे असले तरी दलित कथेची सर्वसाधारणपणे काही वैशिष्ट्ये आढळतात. विषयांतर आणि विस्तारभयास्तव येथे केवळ ठळक वैशिष्ट्यांचाच थोडक्यात उल्लेख करणे उचित होईल.

१. 'दारिद्र्य, भूक, अस्पृश्यता, अन्याय, अत्याचार आणि दलित जीवनात घडून येणारी आजची स्थित्यंतरे, त्यातून निर्माण झालेली या समाजाची संक्रमणावस्था, एकूण ही सर्व समाजव्यवस्था व तिच्या परिवर्तनाची इच्छा, त्यात येणाऱ्या अडथळ्यांविरुद्ध विद्रोह, बंडाची भावना वा क्रांतीचा उन्मेष — असे एकंदर स्वरूप म्हणजे आजची दलित कथा आहे.'[१९]

२. 'दलित कथेने आजच्या विद्रोहगामी क्रान्तिसन्मुख होणाऱ्या माणसाला आपले केंद्र मानले आहे. जुने आदर्श, कर्मविपाक, दैववाद, ईश्वरवाद आणि प्रतिगामित्वाचा पुरस्कार करणाऱ्या तत्त्वांचा, घटकांचा, संकल्पना व विचारव्यवस्थेचा त्याग करून, विरोध करून दलित स्तरावरील विविध प्रकारचे, गतिस्थितीचे व प्रगतीचे जीवन जगू इच्छिणाऱ्या सामान्य माणसाला दलित कथेने नायकत्व दिले आहे.'[२०]

३. दलित कथेतून व्यक्त होणारी जीवनदृष्टी ही मराठी कथेपेक्षा वेगळी आहे. दलितांच्या जीवनाची जिवंत प्रत्ययकारिता आणि आशयघनता हे तिचे स्वरूप आहे.

४. दलित कथेतून त्यांच्या सामाजिक जाणिवा आविष्कृत होताना दिसतात. दलित समाजाचे ती प्रतिनिधित्व करते.



आपल्या उघड्यानागड्या जिण्याची जाणीव आहे. म्हणून ते शोभेची खोटी पिसे डकवीत नाहीत. रूढीग्रस्त व परंपरेच्या तुरुंगात गुदमरून गेलेल्या आणि या तुरुंगाला धडका मारून नवा आशय जगू पाहणाऱ्या जीवनशक्तीचे लक्षवेधी व जिवंत चित्र बागूलांच्या कथेत येते.'[१६] दलित जीवनाचे भीषण नाट्य समर्थपणाने पकडणारे ते एक सजग कलावंत आहेत. बंधुमाधवांच्या कथेत प्रकटणारा विद्रोह व नकार बागूलांनी अधिक गहिरा केला आहे.

⦿⦿⦿

## ६.६. वामन होवाळ

मानवी जीवनातील व्यंगावर मार्मिकपणे भाष्य करणारे कथाकार वामन होवाळ यांनी सामाजिक व सांस्कृतिक अंगांचे रोपण आपल्या कथांतून सहजपणे केले आहे. त्यांना विनोदाचे व मिस्कीलपणाचे अंग आहे. त्यामुळे जीवनातील विसंवाद ते अत्यंत चतुराईने चित्रित करतात. 'रूढी—परंपरेत अडकून पडलेल्या दलित मनाची खिल्ली उडवताना ते वास्तवाची प्रखरता व तीव्रता कमी होऊ देत नाहीत, तर अलगदपणे या रूढीग्रस्त मनावर विनोदाच्या शब्दशस्त्रांनी प्रहार करतात आणि त्यातील विरूपतेचे प्रत्ययकारी दर्शन घडवितात. ग्रामीण

जीवनातील विषमता, श्रेष्ठकनिष्ठतेचा खोटा पेहेराव, झुंडशाही, सत्ताकेंद्रे, त्यामुळे दलितांची होणारी होरपळ शब्दबद्ध करताना होवाळांमधील समर्थ कलावंताचे दर्शन घडते.'[१७]

⊙⊙⊙

## ६.७. योगीराज वाघमारे

संपूर्ण दलित समाजाला भोगाव्या लागलेल्या शतका—शतकांच्या दुःखाची आच ज्यांच्या मनाला बेचैन करते अशा लेखकांपैकी एक जागते, भान असलेले लेखक म्हणून योगीराज वाघमारे यांचे नाव घेता येईल. आपल्या समूहाचे दुःख, वेदना ते प्रभावीपणे चित्रित करतात. 'स्फोटास्फोटाच्या धगधगत्या अग्निकणांना अंगीभूत करणारी त्यांची कथा असते. न्यायाअन्यायाच्या पलीकडे जाऊन हा लेखक एक 'उद्रेक' जगत असताना दिसतो.'[१८]

या दलित कथालेखकांव्यतिरिक्त केशव मेश्राम, भीमराव शिरवाळे, अर्जुन डांगळे, अविनाश डोळस, अमिताभ, सुखराम हिवराळे, सुधाकर गायकवाड, योगेन्द्र मेश्राम, माधव कोंडविलकर, दया पवार आणि अनेक नवनवीन कथाकारांनी



कसदार कथालेखन केले आहे. या कथाकारांच्या कथा मुख्यत्वे दलित साहित्य चळवळीचे शक्तिकेंद्र असलेल्या 'अस्मितादर्श' या नियतकालिकातून प्रकाशित झाल्या आहेत. बहुतेकांचे स्वतंत्र कथासंग्रहही आहेत.

या सगळ्या दलित कथालेखकांच्या पार्श्वभूमीवर दया पवारांची कथा नेमकी कुठे आणि कशी बसते, याचा आढावा घेण्यासाठी पवारांच्या 'विटाळ' या कथासंग्रहाचा चिकित्सकदृष्टीने अभ्यास करणे आवश्यक ठरते. परंतु तत्पूर्वी एकंदर दलित कथेची ठळक वैशिष्ट्ये नेमकी कोणती आहेत, हे पाहणे अगत्याचे ठरते.

⊙⊙⊙

# ७. दलित कथेची वैशिष्ट्ये

दलित कथेचे शिल्पकार म्हणून अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल यांची नावे घेतली जातात. योगीराज वाघमारे, भीमराव शिरवाळे, पुंडलीक धोंगडे, योगेन्द्र मेश्राम, अशोक लोखंडे, अर्जुन डांगळे, दया पवार, माधव कोंडविलकर इत्यादी कथालेखकांची ही पुढची पिढी प्रामुख्याने साठे, खरात, बागूलप्रणीत कथेचेच अनुकरण करीत आहे, असा आरोप भालचंद्र फडके 'दलित साहित्य : वेदना व

होताना दिसतो.

१९. दलित कथा ही आत्मशोधाची कथा असल्याने अभावग्रस्त समाजात जन्माला आलेला या कथेचा नायक स्वत:ला व्यक्त करण्यासाठी धडपडतो. पूर्वीच्या फडकेछाप रोमँटिक किंवा जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगणाऱ्या नायकापेक्षा हा नायक संपूर्णत: वेगळा आहे. कारण या नायकाची निर्मिती स्वजनांच्या अनुभूतीतून झालेली आहे.

२०. परंपरावादी मराठी कथांमध्ये न आढळणारी वेगळ्या प्रकारची सामाजिक जाणीव दलित कथांमध्ये आढळते. नवभारताच्या निर्मितीचे ती स्वप्न पाहते. एका प्रचंड जनआंदोलनाची गरज ती प्रतिपादीत करते. सामाजिक समतेची जाणीव ती विकसित करते. समताधिष्ठित सामाजिक जाणीव हा दलित कथेचा प्राण आहे.

अशी ही दलित कथेची ठळक वैशिष्ट्ये आहेत. दलित कथा ही दलित कवितेसारखी बेभान मात्र नाही. नीतिकल्पनांचा फसवेपणा, अध्यात्माचा खोटेपणा, जीवन अर्थहीन असल्याच्या जाणिवेचा फोलपणा ती लक्षात आणून देते. ती आत्मशोध घेणारी, मानसिक स्वातंत्र्याचा उद्गार व्यक्त करणारी, आशयसंपन्न व अनुभवसंपन्न प्रवृत्तीची, रंजकतेपासून दूर राहणारी, जीवनमूल्याधिष्ठित, आंबेडकरी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारी, विद्रोह, विज्ञाननिष्ठा आणि विश्वात्मकता या त्रिसूत्रीला जोपासणारी, सम्यक दृष्टीने



समूहमनाचा आवाज तिच्यातून उठवला जातो.

५. दु:खी करणाऱ्या, हक्क आणि अधिकारांपासून वंचित व उपेक्षित ठेवणाऱ्या व्यवस्थेला ती नकार देते. तिच्यातून विद्रोहाचा एकवटलेला आवाज उमटतो. तिच्यातून स्पष्टपणे बंडखोरी जाणवते. दु:ख, प्रक्षोभ, चीड, विद्रोह हे तिचे अंत:स्वरूप विशेष आहेत. विद्रोह, विज्ञाननिष्ठा व विश्वात्मकता हे तिचे व्यवच्छेदक लक्षण ठरते.

६. दलित कथा केवळ हसवत किंवा रडवत नाही. ती वाचकाला अंतर्मुख करते. ती रसिकमनाला बधिर करीत नाही, तर बेचैन करते, अस्वस्थ करते. सामाजिक अन्यायातून निर्माण झालेल्या दु:खाचे व्यापक दर्शन घडवून त्यावर विचार करायला लावते.

७. जुन्या संकेतांना, संकल्पनांना ती नाकारते. नव्या जीवनजाणिवा, विज्ञाननिष्ठ मूल्ये यांचा स्वीकार करते. असा स्वीकार न करणाऱ्या पारंपरिक साहित्यालाही ती नकार देते आणि वाङ्मयाची नवी रूपे मांडते.

८. 'माणूस' हा दलित कथेचे केंद्र असतो. सर्वांना समान न्याय, समान प्रतिष्ठा मिळावी, हे तिचे ध्येय असते. मूलभूत हक्कांसाठी, न्यायासाठी ती तडजोडीची भाषा वापरत नाही, तर क्रांतीची आणि बंडाची भाषा बोलते.

९. जीवनाचे वास्तवदर्शन घडवताना ती लढ्याच्या किंवा क्रांतीच्या भाषेत बोलत असल्याने क्वचित तिच्यात अभिनिवेशी

भाव आढळतो; पण त्यात असत्याला जागा नसते. तिच्यावर आक्रस्ताळेपणाचा आरोप करणारे समीक्षक सहसा दलित समाजातील नसतात.

१०. ग्रामीण आणि नागरी दोन्ही परिसरांचा ती वेध घेते. शहरातील झोपडपट्ट्या, गलिच्छ वस्त्या, कामगार वसाहती, मोलमजुरी करणाऱ्यांचे जग यांप्रमाणेच ग्रामीण भागातील गावकुसाबाहेरचे जीवन ती रेखाटते. परिणामी दलितत्वाची संकल्पना विस्तृत पावली आहे.

११. तात्कालिक स्वरूपाच्या समस्या, संघर्ष, चळवळी यांसारख्या विषयांनाही दलित कथेने गवसणी घालण्याचा प्रयत्न केला आहे.

१२. दलित कथेत विनोद अभावानेच आढळतो. जिथे आढळतो, तिथे त्या विनोदाला, मिस्किलपणाला कारुण्याची झालर असते.

१३. आंबेडकरी तत्त्वज्ञानावर तिची निष्ठा आहे. ईश्वरी सत्तेला आव्हान आणि विज्ञानावर तिचा विश्वास तर आहेच, पण 'कलेसाठी कला' किंवा 'जीवनासाठी कला' या विचारांना आव्हान देणाऱ्या कलावंतांना पृथ्वी शेषमस्तकावर नसून ती दलितांच्या तळहातावर तरली आहे, हे सूर्यसत्य सांगण्याचे धैर्य ती दाखवते.

१४. दलित समाजाला सवर्ण समाजाने जे हिडीस आणि ओंगळवाणे जीवन जगण्याची पूर्वी सक्ती केली, हा गतेतिहास



विसरणे शक्य नसल्याने तोच दलित कथेचा तळमळीचा विषय बनला आहे.

१५. 'दलित कथेने दलितांच्या विविध स्तरावरील जीवनाला अंकित केले आहे. तिने महार, चांभार, कैकाडी, परीट, रामोशी, देवदासी इत्यादी पददलित जाती–जमातींच्या कथा–व्यथा साकार केल्या आहेत. त्याचप्रमाणे दलित समाजातील सुशिक्षित, शिक्षक–विद्यार्थी, श्रमिक, गिरणी मजूर, दु:खी स्त्रिया, वेश्या, यल्लम्मा, मरिआईचे भक्तगण या सगळ्यांचे चित्रण ती करते.'[२१]

१६. अस्पृश्यतेचे चटके, गावकुसाबाहेर राहण्याची सक्ती, अन्नक्षुधा यांची वर्णने दलित कथा नि:संकोचपणे करते. दारिद्र्याचे वर्णन करताना हे दारिद्र्य वर्णाधिष्ठित समाजरचनेमुळे आले आहे, दारिद्र्यापायी क्षुधाशांती होत नाही आणि परिणामी असहनीय, अस्वीकारणीय, अपमानित कामे दलित समाजाला करावी लागतात, असे ती खुलेआम सांगते.

१७. दलित कथेत कल्पनाविहाराला जागा नाही. अनुभवाचा विपुल साठा ती बाळगून आहे. जीवनाला मानवी जीवन म्हणून पाहण्याची दृष्टी तिला लाभली आहे. वास्तवाला ती सामोरी जाते व वास्तवच कथन करते.

१८. हिंदू धर्माधिष्ठित पुराणकथांना ती नाकारते; पण काही ठिकाणी बौद्ध साहित्यात अवतरलेल्या मिथ्स मात्र तिच्यात येतात. उदा. शंबुक, कर्ण, एकलव्य यांचा मिथरूपाने वापर

भयकंपित आहे, त्याचे चित्रण मराठी साहित्यात नव्हते. पवार म्हणतात, 'पोटाची भूक जेवढी महत्त्वाची, तेवढीच सांस्कृतिक भूकही महत्त्वाची. आपल्या भोवतालचा निसर्ग, तेथील बोलीभाषा, तेथील माणसांचे रंगरूप, आशा–निराशांचा क्रूर खेळ, ठायी ठायी समाजव्यवस्थेमुळे होणारी तुच्छता ह्यांचा 'अपमान–बोध' समांतर कथेमुळेच पहिल्यांदा लक्षात आला.'[२४] कमलेश्वर यांची 'मांस का दरिया', प्रेमचंद यांची 'कफन', सुहिद यांची 'अंतहीन', जितेंद्र भाटिया यांची 'सिद्धार्थ का लौट जाना' इत्यादी कथांनी पवारांच्या अनुभवविश्वावर संस्कार केले आहेत, असेही त्यांनी 'विटाळ'च्या प्रास्ताविकात नमूद केले आहे. अशा या पार्श्वभूमीवर पवारांच्या कथेचा जन्म झाला. हा अनुभव हिंदी वाचकांना जवळचा असल्याने 'विटाळ'मधील सर्वच कथा हिंदी मासिकांत प्रसिद्ध झालेल्या आहेत. मराठीतील महाराष्ट्र टाइम्स, आम्ही, राजस, साधना, नवशक्ती, उद्ध्वस्त क्षितिज या नियतकालिकांतूनही त्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

आज मराठी कथा ही अनुभवातील विकृतीवर जास्त जोर देते; पण सामाजिक बांधिलकी मानणारे लेखक अनुभवाच्या उदात्तीकरणावर जोर देतात. पवारांच्या मते, या दोन्हींचा समन्वय याचाच अर्थ खरे वास्तव आहे. कोणत्याही एका बाजूचा विचार म्हणजे कथेचा आत्मा विद्रूप करणे होय. कदाचित पवारांच्या या विचारसरणीमुळेच त्यांच्या कथांचा



माणसाच्या प्रगतीचा व समतेचा विचार करणारी आहे. जीवनाचे एक अलक्षित रूप त्याच्या वास्तव स्वरूपात अभिव्यक्त करून शब्दप्रतिमा, भाषा, नवनवीन वाङ्मयीन जाणिवा, नवीन जीवनदृष्टी आणि मानवी मनातील विकारविलसिते या सर्वांनी मराठी वाङ्मयाचे दालन अधिकच समृद्ध करण्याचे श्रेय दलित कथेला देता येईल.

⊙⊙⊙

## ८. दया पवारांची कथा

'दया पवार यांचा मूळ पिंड कवीचा' हे अनेक समीक्षकांचे मत दया पवारांनीही मान्य केले आहे. पण दलित साहित्यात कथाकार म्हणून फारसे श्रेष्ठत्व त्यांच्या पदरी पडले नाही, याची त्यांना खंत वाटते. 'विटाळ' या त्यांच्या कथासंग्रहात ' 'विटाळ'च्या पलीकडे' या शीर्षकाखाली लिहिलेल्या प्रस्तावनेत ते म्हणतात, 'हाताच्या बोटांवर मोजाव्यात, एवढ्याच मोजक्या कथा मी लिहिलेल्या. तसे पाहिले तर 'कथाकार' म्हणून मला मराठीत कोणीच ओळखत नाही. 'कोंडवाडा' आणि 'बलुतं'च्या बोलबाल्यामुळे माझ्या कथांना अंग चोरून बसावे लागले.'[२२]

वास्तविक पाहता कविता किंवा आत्मचरित्र हे प्रकार

हाताळण्यापूर्वीच पवारांनी कथा हा फॉर्म हाताळला आहे. त्यांच्या अगदी सुरुवातीच्या कथांचा तोंडवळा हा रोमँटिक स्वरूपाचा होता. त्यातील चार—पाच कथा ‘अनुराग’सारख्या मासिकात प्रसिद्धही झालेल्या होत्या. त्यांचा समावेश मात्र ‘विटाळ’ या कथासंग्रहात लेखकाने केला नाही. त्या कथा पवारांच्या स्वानुभवाशी नाते सांगणाऱ्या नव्हत्या. कदाचित त्या कथा सवर्ण लेखकांच्या कथांच्या अनुकरणातून अवतरल्या असाव्यात. पवारांना ‘स्व’चा शोध लागला तो ‘पंख’ या कथेद्वारे. बाबुराव बागूल यांनी संपादित केलेल्या ‘आम्ही’ मासिकात ‘पंख’ ही कथा प्रसिद्ध झाली. त्याच दरम्यान ‘साधना’चा (१९७२) ‘काळा स्वातंत्र्य दिन’ या नावाने दलित लेखकांना अग्रक्रम देणारा विशेषांक निघाला. डॉ. अनिल अवचट यांनी संपादित केलेल्या या अंकात पवारांची ‘विटाळ’ ही कथा प्रसिद्ध झाली. त्याच अंकात राजा ढालेंचा झेंड्यावरचा सनसनाटी लेख असल्याने पवारांची कथा विरून गेली. परंतु ‘विटाळ’मुळे पवारांना स्वतःच्या कथेचा नव्याने शोध लागला. पवार म्हणतात, ‘ज्याला आम्ही लेखकाची Identity म्हणतो, त्याची ही सुरुवात होती. ह्या शोधातूनच पुढे ‘बलुतं’ आकाराला आले. हिंदी—इंग्रजीत ‘विटाळ’चे चांगले कौतुक झाले. श्री. दिलीप पाडगावकर ह्यांनी टाइम्स ऑफ इंडियाची दलित साहित्यावरची पुरवणी प्रसिद्ध केली. (१९७३) ह्या पुरवणीत ‘विटाळ’चा इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध झाला. हिंदीतील ‘सारिका’



मासिकात सदर कथा हिंदीतून आली.’[२३]

पवारांची कथा ही स्वतःच्या खास विश्वात वावरते. प्रारंभी त्यांना अनुभव असूनही लिखाणासंदर्भात जी कोंडी झाली होती, ती फोडून ते बाहेर पडले. त्याचे श्रेय ते हिंदीतील समांतर साहित्य चळवळीला आणि हिंदी साहित्यिक कमलेश्वर यांना देतात. ऐंशीच्या दशकाच्या प्रारंभी ते समांतर मेळाव्याच्या निमित्ताने कमलेश्वर यांच्याबरोबर भारताच्या कानाकोपऱ्यात भटकले. तिथे त्यांची तिशीच्या आतील लेखकांशी ओळख झाली. त्यांच्या हिंदीतील कथा वाचून पवार झपाटले. पवारांना जाणवणारे काही सांस्कृतिक प्रश्न त्या लोकांनाही जाणवलेले होते. काश्मीरचा ओम गोस्वामी हा ब्राम्हण जातीत जन्माला आलेला लेखक, पण त्याचे डी कास्ट आणि डी क्लास होणे हे पवारांना हादरवणारे ठरले. त्याच्या कथा पवारांना त्यांच्याच वाटू लागल्या. तामीळनाडूचा इब्राहिम शरीफ, उदेपूरचा आलमशहा खान ह्यांच्या जाणिवा व स्वतःच्या जाणिवा पवारांना सारख्याच भासू लागल्या.

मराठी साहित्यात सामाजिक बांधिलकीने लिहिणारे लेखक म्हणजे प्रचारी लिहिणारे समजले गेले. देश, धर्म, देह अथवा शाश्वत मूल्यांच्या नावाखाली मृत्यू, मैथुन, आहार, निद्रा, तरल निसर्ग, अज्ञाताचा शोध इत्यादी लेखनाची पायरी उच्च दर्जाची ठरवली गेली. माणसाचे माणूसपण दुर्लक्षिले गेले. अभावग्रस्त समाजात जन्मलेल्या माणसाचे जीवन जे

'वधस्तंभ', 'घुसमट' या कथा अंतर्भूत करता येतात. तिसरा प्रकार म्हणजे पवारांच्या सामाजिक कथा. यात 'एका झाडानं किती टकरावं?' ही एकमेव कथा येते.

⊙⊙⊙

## १०.१. फिडेल

'विटाळ' या कथासंग्रहातील पहिली कथा 'फिडेल'. 'विटाळ' या कथासंग्रहातील व्यक्तिचित्रणात्मक कथा म्हणून दोन कथांचा उल्लेख करता येईल. त्यातील पहिली 'फिडेल' आणि दुसरी कथा 'आमदार'.

'फिडेल' ही एका आगळ्यावेगळ्या माणसाची कथा आहे. बाबासाहेबांच्या चळवळीने दलित समाज जागा झाला. या चळवळीने दलितांना जीवनाची दिशा दिली, प्रबोधन केले. काहींनी मात्र या चळवळीला स्वत:च्या जगण्याचे स्वरूप म्हणून स्वीकारले. प्रच्छन्नपणे ते या चळवळीतील भांडवलावर जगत राहिले. दलितांच्या हक्कांसाठी निरनिराळ्या संघटनांची निर्मिती झाली. 'दलित पँथर' ही त्यापैकीच एक संघटना. एकेकाळी या संघटनेचा मुंबईत विशेष जबरदस्त प्रभाव होता. कालांतराने काही कारणांमुळे ही चळवळ थंडावली. 'फिडेल' ही अशीच एका दलित पँथरच्या जीवनावरील कथा



फारसा गाजावाजा समीक्षकांनी केला नसावा. पण त्यांच्या कथांचा सूक्ष्म अभ्यास केल्यावर त्यांच्या कथेतून डोकावणारी कितीतरी वैशिष्ट्ये मनाला स्पर्शून जातात. अभ्यासकाला, वाचकाला अंतर्मुख करून जातात.

⊙⊙⊙

## ९. 'विटाळ' शीर्षकाचा ऊहापोह

मराठी कथासंग्रहांच्या शीर्षकांपेक्षा कितीतरी वेगळे असे 'विटाळ' शीर्षक पाहताच त्यातील कथांच्या वेगळेपणाची कल्पना येते. 'विटाळ' हा सुद्धा एक भोगवटा. स्त्री जातीच्या नशिबी आलेला हा भोगवटा नव्या पिढीला जन्म देतो. तरीदेखील या भोगवट्याच्या चार दिवसांत समाजाने स्त्रीला अपवित्र मानले आहे. ती अस्पर्श मानली गेली. तिचा रोजच्या कार्याशी, सामाजिक गोष्टींशी संबंध तोडल्या गेला.

'विटाळ'च्या मुखपृष्ठावर असणारी मनुष्याची डोळे मिटलेली निर्विकार आकृती विटाळाच्या वेदना दर्शवते. मुखपृष्ठावर लिहिलेल्या ओव्या लक्ष वेधून घेतात.

'अत्यंत दोष, ज्या विटाळा। त्या विटाळाचाचि पुतळा।
तेथे निर्मळतेचा सोहळा। केंचि घडे ——
वरिवरी दिसे वैभवाचे। अंतरी पोतडे नरकाचे।

तैसे झाकणे चर्मकुंडाचे। उघडताची नये ——'

लेखकाला जे सूचित करावयाचे आहे, ते या ओव्यांतून समर्थपणे व्यक्त होते, असा त्याचा विश्वास आहे. मुखपृष्ठावर लिहिलेल्या उपरोक्त ओव्या लेखकाच्या विश्वासाचेच द्योतक नाहीत का? हे सगळं दलित जीवनाविषयीच्या पराकोटीच्या घृणेपोटी लिहिलं गेलं आहे, असं वाटतं. स्त्रीला तिच्या मासिक पाळीच्या दिवसांत अस्पर्श मानून ज्याप्रमाणे वेगळं राहण्यास भाग पाडलं गेलं, तोच विटाळ सामाजिक पातळीवर संस्कृतीचे ढोल बडवणाऱ्यांनी आणला. हिंदू मनावर शतकानुशतके अधिराज्य करणारा हा विटाळ. ह्या विटाळाने निर्माण केली, ती भयानक जातिव्यवस्था. याच जातिव्यवस्थेने माणूस नासवला. समाजरचना खराब केली. माणसामाणसांत भेद पाडले. एक भयानक दरी निर्माण केली. काही जातींना आपल्या बरोबरीने वागवणे तर दूरच राहिले, पण त्यांची सावलीही निषिद्ध मानली गेली आणि त्यातूनच या भयानक रूढीचा जन्म झाला. याच रूढीने अनेक पिढ्या नासवून टाकल्या. अशा या भयानक विटाळाचे चटके दया पवारांनाही सोसावे लागले; आणि त्या भोगवट्याचे शीर्षक त्यांनी आपल्या कथासंग्रहाला दिले आहे. 'विटाळ' ही कथा त्यात अंतर्भूत असली किंवा तिच्यातून पवारांना एक मर्यादित अर्थ सांगावयाचा आहे, असे जरी भासत असले तरी संपूर्ण कथासंग्रहात त्यांना 'विटाळ' या शब्दाचा केवळ एकच अर्थ अभिप्रेत नाही.



त्याचे अनेकपदरी अर्थ त्यांना व्यक्त करायचे आहेत. 'विटाळ' मधील दहाही कथांचा तोंडवळा निरनिराळा असला तरीही त्यांना एका धाग्याने जोडणारे सूत्र त्यात आहे. ते सूत्र म्हणजे शतकानुशतके त्यांच्या जातीवर झालेल्या सामाजिक अन्यायाचे, अस्पृश्यतेचे आणि विटाळाचे. गुलाम म्हणून जगत आलेल्या, अज्ञान—अंध:कारात खितपत पडलेल्या दलित समाजाच्या कितीतरी पिढ्या या विटाळामुळे बर्बाद झाल्या. तो विटाळ जगापुढे मांडावा, दूर करण्यासाठी काही प्रयत्न करावे आणि दलित समाजाच्या भोगवट्याच्या प्रखर वेदना जाहीरपणे प्रकट कराव्या, या उद्देशाने निर्मिती झाली ती 'विटाळ' या कथासंग्रहाची.

⊙⊙⊙

## १०. 'विटाळ'मधील कथा आणि त्यांची समीक्षा

'विटाळ' या कथासंग्रहात एकूण दहा कथा आहेत. स्थूलमानाने त्या कथांचे तीन भाग करता येतात. एक म्हणजे दलित जीवनानुभवाचे चित्रण करणाऱ्या कथा. यामध्ये 'फिडेल', 'पंख', 'विटाळ' या कथांचा समावेश होतो. दुसरा प्रकार म्हणजे दलितेतर जीवनाच्या अनुभवांच्या कथा. या प्रकारात 'भूक', 'ससाणा', 'आमदार', 'साहेब, दिदी आणि गुलाम',

या कथेचे काही धागेदोरे 'चावडी'मध्येही आढळतात. कदाचित तिलाच व्यक्तिचित्रणात्मक रूप देऊन पवारांनी 'फिडेल' ही कथा निर्माण केली असेल. आंबेडकरी चळवळीत जे अनेक दोष येत गेले, त्यातलाच एक दोष म्हणजे स्वार्थासाठी बुद्ध आणि आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाचा दुरुपयोग केला गेला. बाबासाहेबांचे विशाल तत्त्वज्ञान संकुचित केले गेले. नेत्यांचे भरघोस पीक आले. आपणच आंबेडकरांचे खरे वारसदार आहोत, असा पुकारा प्रत्येक नेता करू लागला. स्वार्थासाठी भल्याबुऱ्याचा विचार न करता आपल्यामागे समाजाला फरपटत नेण्याचे काम हे नेते करू लागले.

'फिडेल' या कथेतून एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते, ती म्हणजे पवारांना जे जे म्हणून दलित चळवळीतील दोष आढळले, ते ते त्यांनी येथे व्यक्त केले. 'विटाळ'प्रमाणेच हे दोष त्यांनी 'बलुतं' आणि 'चावडी'मधूनही दाखवून दिले आहेत. स्वत:ला आंबेडकरांचे वारसदार म्हणवून घेऊन धंदा करणाऱ्या नकली नेत्यांची त्यांनी खिल्ली उडवली आहे. दलित चळवळीतील दोषदिग्दर्शन करण्याचा त्यांचा हेतू आहे. कारण ते केवळ लेखकच नाहीत, तर त्यांची दलित चळवळीशी बांधिलकी आहे. त्या बांधिलकीपोटीच आंबेडकरी चळवळीची झालेली वाताहत त्यांना व्यथित करून सोडते; आणि म्हणून 'फिडेल'सारख्या कथांची निर्मिती होते.

'फिडेल' ही एक वास्तवदर्शी कथा आहे. दलित



आहे. संघटनेवरची पकड ढिली झाल्यामुळे त्याची मनोवृत्ती कशी बनते, याचे वास्तवदर्शी चित्रण या कथेत लेखकाने केले आहे.

मुळात 'फिडेल' हे क्युबा देशाच्या राष्ट्राध्यक्षाचे नाव. परंतु केवळ दबदबा निर्माण व्हावा, किंवा भारदस्तपणा वाटावा, यासाठी कथेच्या नायकाने हे नाव घेतले आहे. टोपीसुद्धा तो फिडेल कॅस्ट्रोसारखीच घालतो. त्याने एक शक्तिशाली संघटना तयार केली आहे. तिला तो 'गुडशांची संघटना' या नावाने संबोधतो. 'गुडसा' हा शब्द तसा दलित समाजाशीच संबंधित आहे. मेलेल्या जनावराच्या शरीरातील एका भागाचे नाव 'गुडसा'. गावकुसाबाहेरचा हा शब्द फिडेलने आपल्या अनुयायांसाठी वापरला आहे. एकेकाळी अतिशय जोरदार कार्य करणारी ही गुडशांची संघटना. फिडेलने या सर्व मंडळींना एकत्र केले आणि या सर्वांचा प्रमुख म्हणून आपल्या तव्यावरची पोळी भाजून घेतली. असा हा फिडेल.

मुंबईसारख्या शहरात कामगारांच्या संघटना तयार होतात. आपापल्या मागण्यांसाठी संप, मोर्चे काढले जातात. त्यातून निर्माण झालेले नेते स्वत:चे खिसे भरत असतात. आपल्याच कामगारांकडून फक्त एक एक रुपया काढूनही ते लक्षाधीश होतात. त्याच पद्धतीने दलित पँथरचा नेता आपले कार्य करतो. अतिशय बनेल, अतिशय रंगेल पण तितकाच सावध असा आहे — फिडेल. बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर

सैरभैर झालेल्या दलित समाजाला नेमकी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे, याची त्याला जाणीव आहे. म्हणूनच त्याने भगवान बुद्धाचे आणि डॉ. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान आत्मसात केले आहे. परंतु या तत्त्वज्ञानाचा उपयोग मात्र त्याने दलित समाजाच्या प्रबोधनासाठी, जागरणासाठी वा फायद्यासाठी केलेला नाही, तर फक्त स्वत:च्या स्वार्थासाठी केला आहे.

'फिडेल' स्वत:भोवती एक वेगळंच वलय तयार करतो. समाजातील सर्वच जातींतील लोकांबरोबर त्याचे संबंध चांगले आहेत. एकाच वेळी तो सर्वांना खूष ठेवण्याचा प्रयत्न करतो. त्याची वागणूक सराईत गुंडासारखी आहे. त्याचे स्वत:चे बॉडीगार्ड आहेत. धाक दाखवून तो लोकवर्गणी गोळा करतो. तो कुठलाही विधिनिषेध पाळत नाही. ब्राम्हणांशी त्याची मैत्री आहे; पण तीही स्वार्थासाठीच. दलितांच्या लेबर कॅम्प्समधून वर्गणी गोळा करण्यात तो पटाईत आहे.

या कथेत फिडेलच्या बापाचे चित्रण येते. ते पवारांनी पार्श्वभूमीसारखे केले आहे. फिडेलच्या बापाला फक्त एवढीच जाणीव असते, की आपला मुलगा जगात काहीतरी वेगळे करतो आहे. जगाचे स्वार्थी व्यवहार माहीत नसलेला तो भोळाभाबडा, दुबळा बाप मुलाच्या वागणुकीमुळे पुढे अधिकच दुबळा आणि गरीब होत जातो. मुलाविषयी काळजी करण्याशिवाय तो काहीच करू शकत नाही.



लवकरच परिस्थिती बदलते. फिडेलचे संघटनेवरील वर्चस्व खिळखिळे होते. दलित जनता जागृत झाल्यामुळे त्याची संघटना मोडकळीस येते. कार्यकर्त्यांवर त्याचे वजन पडत नाही. पूर्वीसारखी वर्गणीही जमवता येत नाही. परिणामी फिडेल उदास होतो. तरीदेखील तो काहीतरी मार्ग शोधत जगतो. तसा तो बहुरंगी आहे, बहुढंगी आहे. स्त्रियांच्या संदर्भात तर तो प्रवीणच आहे. बदललेल्या परिस्थितीतही पूर्वी उपभोगलेली नेपाळी पोरगी त्याला आठवते. मऊ सायीसारखी असलेली तिची कातडी सिगारेटच्या धुराच्या वलयांबरोबर त्याचा जीव पेटवून जाते. परंतु पूर्वीसारखा पैसा गाठीशी नसल्याने तो निराश आहे. पुन्हा साथीदारांबरोबर तो लेबर कॅम्पकडे जातो. फारशी वर्गणी न जमल्यामुळे तो सोबत्यांना झापतो. चळवळीतील सगळेच लोक आता पांढरपेशे झाले आहेत, असे तो आवाज चढवून सांगतो. सोबतचे कार्यकर्ते मिळतील तेवढे पैसे त्याच्या हातात कोंबतात. आता आपल्यालाच हातपाय हलवावे लागतील, याची त्याला जाणीव होते.

'फिडेल' ही कथा इतर कथांपेक्षा नक्कीच वेगळी आहे. सर्वसाधारणपणे दलित लेखकांच्या साहित्यातून त्यांच्या जीवनातील दु:ख, वेदना, आक्रोश, विद्रोह यांचेच चित्रण प्रकर्षाने होते. पण 'फिडेल'मधून पवारांनी दलित चळवळीतील अप्पलपोटेपणा, स्वार्थीवृत्ती आणि भ्रष्टाचार रेखाटलेला आहे.

हेलकावणारा नायक त्या लोकांसाठी नगरसेवकाकडे जाण्याचे ठरवतो. त्या लोकांना तो जेवण देण्याचे आश्वासन देतो. 'भगवान तेरा भला करे' अशा दुवा म्हाताऱ्या बाया आकाशाकडे पाहत देतात. भगवानावर साऱ्या गोष्टी सोपवून स्वत: स्वस्थ बसणाऱ्या या भारतीय परंपरेची कथानायकाला विलक्षण चीड येते.

नगरसेवक कुठलीही मदत करीत नाही. पण व्यापारी संघटनेच्या चंपाशेट नावाच्या अध्यक्षाच्या नावे नगरसेवकाची चिठ्ठी घेऊन कथानायक चंपाशेटकडे जातो. वेळ रात्रीची असते. झोपी गेलेला चंपाशेट उठत नाही. नायकाच्या आवाजाने जागे झालेल्या फुटपाथवरील माणसांनाही दुष्काळग्रस्तांबद्दल सहानुभूती वाटत नाही. तो निराश होतो. निर्वासितांना दिलेल्या आश्वासनाचे काय? असा प्रश्न त्याला पडतो. तेवढ्यात त्याला त्याचा कांबळे नावाचा मित्र भेटतो. कांबळे आणि तो दोघेही स्वत:जवळ असणारे सर्व पैसे खर्च करून हॉटेलमधून सांबार आणतात. सांबार नेण्यासाठी काही नसल्याने हॉटेलमालक एक जुना प्लास्टीकचा रिकामा डबा देतो व त्याचेही बिल आकारतो. कथानायक मयताच्या टाळूवरचं लोणी खाणाऱ्यांत हॉटेलमालकाची गणना करतो. पण त्याच वेळी गरीब पाववाला मात्र या अकालपीडित लोकांसाठी दिलेल्या पावाचे पैसे घेत नाही. परस्परविरोधी प्रसंगांतून जगात कुठेतरी माणुसकीचा ओलावा शिल्लक असल्याचे



कथेत सहसा न आढळणारा बेगुमानपणा इथे आहे. वाचक जसजसा वाचत पुढे जातो, तसतशी ही कथा त्याला अस्वस्थ करू लागते. शेणातले किडे जसे शेणालाच पोखरत जातात आणि शेवटी त्या शेणाचा भुगा करून टाकतात, तशीच या स्वार्थी नेत्यांनी दलित चळवळीची वाताहत केल्याचे पवार स्पष्ट करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निधनानंतर संधिसाधू दलित मन कसे पांढरपेशी बनत गेले, त्याची जाणीव या कथेतून व्यक्त केली आहे. ही कथा केवळ व्यक्तिचित्रणात्मक न राहता दलित समूहमनाचे ती प्रतिनिधित्व आपल्यासमोर उभे करते. परंतु व्यक्तिचित्रणाचे सामाजिक परिणाम पवार कथन करीत नाहीत. परिणामांचा विचार करणे त्यांनी वाचकांवर सोडले आहे. तरीदेखील पवारांना आलेले दलित चळवळीतील दु:खद अनुभव त्यांनी अतिशय समर्पक शब्दांत आणि रेखीव स्वरूपात 'फिडेल' या कथेमध्ये मांडले आहेत.

⊙⊙⊙

## १०.२. भूक

'विटाळ' या कथासंग्रहातील भूक ही दुसरी कथा. मानवी प्रवृत्तीचा विविध दिशांनी वेध घेणारी कथा म्हणून

'भूक'चा उल्लेख करता येईल. मानवी जीवनातील अनेक मूल्यांना स्पर्श करणारी ही कथा आहे. दया पवार हे सामाजिक बांधिलकी मानणारे लेखक असल्याने 'भूक' ही कथा त्यांनी तटस्थपणे लिहिल्याचे जाणवते. सामाजिक बांधिलकीने लिहिणारे लेखक मार्क्सवाद्यांच्या साहित्याप्रमाणे टोकाची भूमिका स्वीकारीत नाहीत. पवारांची बांधिलकी भडकपणे कथांमधून दिसत नाही. त्यांच्या कथेचे नायक हे असहाय परिस्थितीचे बळी ठरलेले आहेत. हे नायक बळी गेले; पण मोडले नाहीत. त्यांच्या एकंदरीत लिखाणाचा विचार करताना त्यांचे अनुभव अतिशय सुस्पष्ट आणि रेखीव असे आहेत, हे वाचकांना पटते.

'भूक' कथेतील एक एक अनुभव लेखणीने पवार जेव्हा कागदावर उतरवतात, तेव्हा तो प्रखर वास्तववादी बनतो. 'भूक' मनुष्याला कुठल्या पातळीवर नेईल, हे सांगता येत नाही. या कथेतील निर्वासितांचा प्रश्न केवळ परप्रांतातून आलेल्या निर्वासितांचा नाही, तर तो समस्त दलित, पीडित मानव समाजाचा आहे. मानवी मूल्यांचा तो प्रश्न आहे. पोटाच्या भुकेने तडफडणाऱ्या समाजाचे दु:ख, वेदना एक माणूस म्हणून आपण जाणून घेतो का? हा प्रश्न येथे उपस्थित होतो. दलित समाजाला हजारो वर्षे जी वागणूक मिळाली, तशीच वागणूक किंवा त्या वागणुकीचे अवशेष आजच्या समाजरचनेत अजूनही असल्याने निर्वासितांना कोणत्या परिस्थितीला सामोरे जावे लागते, यावर ही कथा प्रकाश टाकते.



कथानायकाच्या निवासापासून जवळच असलेल्या मैदानावर गुजरातच्या दुष्काळ पडलेल्या कच्छ प्रांतातून आलेले निर्वासित उतरलेले असतात. आधीच मुंबई म्हणजे अफाट जनसागर. त्यात दुष्काळग्रस्तांचे पेव फुटलेले आणि अशातच कच्छमधून आलेले हे निर्वासित. कथानायक विचार करू लागतो. त्याच्या कच्छमधील गतस्मृती जागृत होतात. पूर्वी सीमा प्रश्नावरून एका तुकडीत तोही कच्छला गेलेला असतो. याच कच्छमधील लोकांनी त्याचे त्याच्या तुकडीसह मोठ्या उत्स्फूर्ततेने स्वागत केलेले असते. देशी तुपातील भोजन दिले असते. नाक्यानाक्यावर कमानी उभारलेल्या असतात. ढोलकाच्या तालावर नृत्य करून, गीते गाऊन त्यांचे स्वागत केलेले असते. तेच कच्छनिवासी आज निर्वासित म्हणून त्याच्यापुढे उभे असतात.

रात्र झालेली असते. निर्वासित लोक खाण्यासाठी काहीतरी मागत असतात. कथानायकाला जाणवतं की, मानवी मूल्ये ऱ्हास पावत चालली आहेत. यंत्रयुगीन संस्कृतीपुढे ती थिटी पडत चालली आहेत. नायकाला त्यांच्यासाठी काहीतरी करावयाची तीव्र इच्छा होते. पण संकटकाळात मदतीसाठी येणारे फार थोडे असतात, याची त्याला जाणीव होते. येथे त्याचा दुहेरी संघर्ष सुरू असतो. एक म्हणजे स्वत:च्या मनाशीच चालणारा संघर्ष आणि दुसरा म्हणजे समाजातील दुष्ट प्रवृत्तींविरुद्ध चालणारा संघर्ष. या दुहेरी संघर्षात

भडक असतात. पण विक्रेत्याने केलेल्या अपमानामुळे व ‘भिकाऱ्याला निवड नसते’ या उक्तीप्रमाणे काका ते कपडे गुपचूप घेतात. वामनचाही नाइलाज होतो. त्याच वेळी त्याला त्याच्या मागच्या पिढ्यांनी भोगलेले जीवन आठवते आणि तसे दैन्य नको असते, म्हणूनच तो काकांबरोबर कपडे घ्यायला जातो. कपडे घेतल्यावर काका त्याला कामाठीपुऱ्यातील वेश्यावस्तीत नेतात. तिथे वामनच्या मनाची फारच कुचंबणा होते. ती वस्ती वामनला मुळीच आवडत नाही. काकांनी आपल्याला इथे आणावे, याचा त्याला संताप येतो. काका एका छेलछबेलीशी वामनची ओळख करून देतात. वामनला ते असह्य होते. त्याच्या अंतर्मनातील संघर्ष तीव्र होतो. तो काकांच्या नकळत तिथून सटकतो व घरी येतो. त्याचे हे वागणे काका समजू शकत नाहीत. ते घरी आल्यावर वामनवर तोंडसुख घेतात. ‘अरे, तुला काय वाटलं? काका जसा शेण खातो, तसा तुला चारणार होता? चालता हो आत्ताच गावाला, पुन्हा तोंड दाखवू नको.’ (‘विटाळ’ पृ. २२)

वामन असहाय होतो. पूर्वजांच्या गुहाजीवनाविषयीच्या घृणेने त्याच्या पंखात वर येण्याचे बळ निर्माण केले जात असतानाच क्षणोक्षणी त्याचे हे पंख छाटून टाकण्याचा प्रयत्न होतो. त्याची असहायता त्याच्या जगण्यावर मात करते. एकीकडे काकांविषयी आणि सभोवतालच्या परिस्थितीविषयी त्याच्या मनात प्रचंड तिरस्कार आहे, तर दुसरीकडे आपल्याला



कथानायकाला जाणवते. त्या दुष्काळग्रस्तांना सांबार आणि पाव देऊन तो घरी परततो.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो उठतो, तर वेगळेच नाट्य घडत असते. शेजारच्या ब्लॉकमध्ये चोरी झाल्यामुळे त्या निर्वासितांमधील तरुणांना चोर म्हणून पकडून नेतात. या नायकाला ओरडून सांगावेसे वाटते की, ते लोक चोर नाहीत; पण तो काहीच बोलू शकत नाही. विषण्ण अंत:करणाने घराकडे परतणाऱ्या नायकावर प्रकाश टाकून कथा संपते आणि वाचकांचे हृदय विदीर्ण करून जाते.

पूर्वी ज्याप्रमाणे कुठेही चोरी झाली, तरी दलित समाजातील विशिष्ट जातीच्या लोकांना पकडून पोलीस ठाण्यावर नेले जायचे, तसलाच हा प्रकार ‘भूक’मध्ये रेखाटला आहे. तीच अवस्था आजही दिसून येते. हा मानवतावादी मूल्यांचा ऱ्हास मानवी प्रवृत्तीचा वेध घेणाऱ्या ‘भूक’ या कथेतून स्पष्टपणे जाणवतो. माणसानं माणसावर प्रेम करावं, माणसावरचं सूक्त गावं, एक तीळ सात जणांनी करंडून खावा ही नामदेव ढसाळांनी ‘गोलपिठा’ काव्यसंग्रहात प्रकट केलेली नवसमाजरचनेची स्वप्नं आजच्या समाजरचनेला मुळीच पेलवणारी नाहीत. पूर्वापार चालत आलेल्या या दुष्ट परंपरा संपुष्टात येणारच नाहीत का? असा प्रश्न उभा करणारी ही कथा – ‘भूक’.

⊙⊙⊙

## १०.३. पंख

'पंख' ही दलित जाणिवेतून लिहिल्या गेलेली कथा आहे. दलितांजवळ स्वानुभवाचा एवढा साठा आहे की, त्याला व्यक्त करण्यासाठी बाह्य अवडंबराची गरज भासत नाही. 'पंख' ही कथा पवारांची स्वत:चीच आहे, कारण 'बलुतं' या आत्मकथनात या कथेतील सर्व प्रसंग त्यांनी वर्णन केले आहेत. त्यांचेच अनुभव वामन शिंदेच्या रूपाने 'पंख' या कथेत प्रकट होतात.

'विटाळ' या कथासंग्रहाच्या मनोगतातच म्हटल्याप्रमाणे दया पवारांनी सुरुवातीला रोमँटिक कथा लिहिल्या होत्या. पण त्या रोमँटिक प्रवाहातून बाहेर पडल्यावर त्यांनी दलित जाणिवेतून लिहिलेली पहिली कथा म्हणजे 'पंख'. ते स्वत: मान्य करतात की, त्यांना 'स्व'कथेचा शोध 'पंख' या कथेद्वारेच लागला. बाबुराव बागूल संपादित 'आम्ही' या मासिकात ती कथा प्रसिद्ध झाली होती.

ही कथा तालुक्याच्या गावापासून दूर असलेल्या दहाव्या वर्गात शिकणाऱ्या वामन शिंदेच्या भावविश्वात वाचकाला खेचून नेणारी कथा आहे. वामन हा अत्यंत गरीब असलेला दलित मुलगा आहे. बालपणीच त्याचे वडील गेलेले. आई आणि लहान बहीण हे त्याचे कुटुंब. गरिबीमुळे इतरांवर अवलंबून त्याला जगावे लागते. इतरांनी दिलेले कपडेच वापरावे लागतात. त्याचे काका त्याला भडक रंगीबेरंगी शर्ट



घेऊन देतात. तो शर्ट घालून वामन शाळेत जातो. प्रिन्सिपॉलच्या शिस्तीत ते वर्तन बसत नाही. त्याला ऑफीसमध्ये बोलावले जाते आणि तिथे त्याला बोलणी खावी लागतात. त्याच्या जातीचा उद्धार होतो. त्या वेळी वामनला वाटते की, सरांनी मारलं असतं तरी चाललं असतं; पण त्यांनी जातीचा उद्धार करायला नको होता. जिव्हारी लागलेले बोल मनात साठवून खचलेल्या मन:स्थितीत वामन ऑफीसच्या बाहेर पडतो. वर्गात येतो. संस्कृतचा तास सुरू असतो. मुले त्याच्याकडे बघून कुचेष्टेने हसत आहेत, असा त्याला भास होतो. अभ्यासात त्याचे मन लागत नाही. त्याच वेळी शेजारच्या वर्गातील मुले मोठ्या आवाजात रेव्ह. टिळकांची 'केव्हढे हे क्रौर्य!' ही कविता गात असतात. त्या कवितेतील घायाळ पक्षिणीचे वर्णन ऐकून तिच्या जागी आपणच उभे आहोत, असे वामनला वाटू लागते. दोघांच्याही भावस्थितीतील साम्य दिसून येते. ज्या रंगीबेरंगी शर्टावरून एवढे प्रकरण घडले, तो शर्ट त्याला कोणत्या परिस्थितीत स्वीकारावा लागला, त्याची वामनला आठवण होते.

गरिबीमुळे दिवाळीच्या सुटीत वामनने काकांच्या घराचा आश्रय घेतलेला असतो. पगाराच्या दिवशी काका खूप दारू पिऊन येतात. त्याला नवे कपडे घेऊन द्यावे म्हणून सोबत नेतात. मुंबईच्या गोलपिठ्याजवळील रेडीमेड कपड्यांच्या दुकानातून काका वामनला दोन जोड घेतात. ते कपडे फारच

सयबाय सतत कोंबडीची पिल्लं मोजत असते. एखादे पिल्लू कमी भरले, की ती हवालदिल होते. ते पिल्लू पुढ्यात आले की तिचा जीव भांड्यात पडतो. परंतु ससाणा तिच्या डोळ्यादेखत तिच्या पुढ्यातून कोंबडीचे पिल्लू उचलून नेतो, तेव्हा ती घाबरते. कारण तिला तिचा भूतकाळ आठवतो. ससाण्यानं जसं तिचं पिल्लू नेलं, तसंच कितीतरी वर्षांपूर्वी मानमोडीनं तिच्या नवऱ्याला नेलं असतं. त्यावेळी ती नुकतंच लग्न करून आलेली असते. तिच्या लग्नाला पुरते दोन महिनेही झालेले नसतात.

कचरच्या बापानं सयबायच्या बापाला मरताना पाणी दिलेलं असतं, या एकाच धाग्यावर ती जगते आहे आणि मरताना कचरच्या हातचं पाणी प्यायचा विचार करते आहे. तिचे हे विचार खंडू पाटील ऐकतो आणि तिच्या दहा एकराच्या जमिनीच्या तुकड्यावर नजर ठेवणाऱ्या पाटलाला खात्री पटते की, ती तिची जमीन आपल्याला विकणार नाही. खंडू पाटील तिला बरंच समजावतो. पण म्हातारी सयबाय जुन्या पारंपरिक मूल्यांना चिकटून आहे. सगळी शेती पुतण्याच्याच नावावर तिला करायची आहे.

खंडू पाटलाच्या बोलण्यामुळे सयबायचे विचारचक्र सुरू होते. पाटील म्हणतो, त्याप्रमाणे खरंच जमीन विकून दहा हजार रुपये घ्यावे का? आणि म्हातारपणात खुडून खुडून खावेत की कचरच्या नावाने ती जमीन करून द्यावी?



कोणी समजावून घेत नाही, ही खंत आहे.

या कथेतील वामनचे आणि काकांचे भावविश्व निरनिराळे आहे. परिस्थितीपुढे वामन असहाय होतो, तर उरातील दु:खाला दारूत बुडवून टाकणारे काकाही असहायच आहेत. कथेतील या दोन समांतर रेषा पवारांच्या जीवनातही समांतर गेल्याचे 'बलुतं'मधून स्पष्ट होते. 'बलुतं'मध्ये ज्या काकांनी दगडूसाठी खूप जीव टाकला, त्याच काकांच्या आणि दगडूच्या संदर्भातील ही घटना आहे. पवारांनी येथे नायकाचे नाव 'वामन शिंदे' असे घेतले आहे. कित्येकदा पवार स्वानुभवासाठी वेगळा फॉर्म वापरतात. त्यामुळे कथेचा कॅनव्हास विस्तृत होतो, असे पवारांना वाटत असावे. पवारांनी या कथेत वापरलेले तंत्र हे फ्लॅशबॅक पद्धतीचे आहे, हे उल्लेखनीय.

पवारांच्या कथाविश्वातील माणसे वेगळ्याच पद्धतीने जीवन जगतात. अंगी कितीतरी सुप्तगुण किंवा हुन्नर असूनही त्यांच्या जीवनाची शोकांतिका झालेली आहे. पवारांच्या कलासंपन्न वडिलांच्या जीवनाचीही अशीच व्यथा झाली. या माणसांच्या जीवनाची अशी शोकांतिका का व्हावी? केवळ ते दलित समाजात जन्माला आले म्हणून? कोणी केली ही शोकांतिका? या जीवघेण्या दु:खापोटीच ही माणसे दारू पितात. आपलं दु:ख जगापासून लपविण्यासाठी किंवा विसरण्यासाठी ते असे वागतात, असे पवारांना वाटते.

डोळ्यांतील अश्रूंचे भांडवल करून जगणे त्यांना पसंत नसावे. परिस्थितीला नकळत शरण जाणारी माणसे त्यांच्या कथेत असली, तरी त्यांचे शरण जाणे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संघर्षानंतरच घडते.

क्षणोक्षणी वामनचे पंख छाटून टाकणारी परिस्थिती या कथेच्या शीर्षकाची यथार्थता पटवते. पंखाचा आणि पक्षिणीचा वापर पवारांनी सुंदर रीतीने केला आहे. घटनांच्या विचारचक्रातून शेवटी वामन बाहेर पडतो, तो त्याला शिक्षक वर्गातून बाहेर काढतात तेव्हाच. पुस्तके गोळा करून, न थोपवता येणारे अश्रू घेऊन बाहेर पडणाऱ्या वामनच्या कानावर शेजारच्या वर्गात सुरू असलेली कविता पडते –

'चंचू तशीच उघडी, पद लांबविले.....
निष्प्राण देह पडला, श्रमही निमाले.'

या कवितेतील पक्षिणीसारखेच आपलेही पंख छाटले जात असल्याची जाणीव वामनच्या भावविश्वात तरळत जाते आणि कथा संपते.

⊙⊙⊙



## १०.४. ससाणा

'ससाणा' ही मानवी वृत्तीप्रवृत्तींचे आणि अंतरंगातील रंगतरंगांचे दर्शन घडविणारी कथा आहे. त्यातून पूर्वापार चालत आलेल्या दारिद्र्याचे दु:ख आणि वेदना प्रकट होते. म्हाताऱ्या 'सयबाय'चे चित्रण आहे. या कथेला दलितत्वाचा स्पर्श आहे. तरीही ही कथा केवळ दलित समाजातील सयबायपुरती मर्यादित राहत नसून समग्र मानव जातीची बनते.

सयबाय शेवटच्या उंबरठ्यावर आहे. काळाचा बहिरी ससाणा तिच्यावर केव्हा झडप घालेल, हे सांगता येत नाही. तिच्या बापाचा वंशबूड झालेला असल्याने परंपरेने जमीनजुमला तिच्याकडेच आलेला आहे. तिला जवळचा म्हणून एकमेव पुतण्या आहे, तो म्हणजे कचर. हा कचर मुंबईत राहतो. गावचा खंडू पाटील आणि हा कचर दोघेही एकाच प्रवृत्तीचे प्रतीक आहेत. खंडू पाटलाचा सयबायच्या जमिनीवर डोळा आहे. तेवढ्यासाठीच कधीही महारवाड्यात न आलेला पाटील तिच्याकडे येतो.

'ससाणा' हे शीर्षक देऊन आणि ससाण्याचे प्रतीक योजून पवारांनी पुढे येणाऱ्या संकटाची चाहूल देण्याचा प्रयत्न येथे केला आहे. पूर्वीच्या मराठी कथेत ही पद्धत प्रकर्षाने आढळायची; पण दलित कथा मात्र त्याला अपवाद होती. पवारांनी तो फॉर्म सहजतेने हाताळला आहे. या कथेतील

## १०.५. आमदार

दलित जाणिवेच्या पलीकडे गेलेली एक व्यक्तिचित्रणात्मक कथा म्हणून 'आमदार' या कथेचा उल्लेख करता येईल. या आधी 'फिडेल' या कथेचा आशय आणि आकृतिबंध आपण पाहिला. या दोन्ही कथा व्यक्तिचित्रणात्मकच आहेत, परंतु दोन्हींत फरक असा की, 'फिडेल' ही कथा दलित जाणिवेतच अडकलेली आहे; तर 'आमदार' ही कथा — तिचा नायक दलित असूनही — दलितत्वाच्या मर्यादा ओलांडून पलीकडे गेलेली आहे.

दया पवारांचे साहित्य वाचताना पुनरावृत्तीचा दोष जाणवतो. 'बलुतं'मध्ये आलेल्या श्री. सदाशिव रूपवते यांची कथा आणि 'आमदार' या नावे 'विटाळ'मध्ये अंतर्भुत केलेली कथा एकच आहे. सदाशिव रूपवते हे पवारांचे जवळचे मित्र. आपल्या हरहुन्नरी मित्राची जीवनात झालेली जीवघेणी ससेहोलपट पवारांनी 'आमदार'मध्ये रेखाटली आहे. आंबेडकरी चळवळीत जगलेला, तेच विचार जोपासणारा हा 'आमदार' दलितत्वाच्या मर्यादा ओलांडून जातो; पण तरीही त्याच्या जीवनाची शोकांतिका होते.

वास्तविक रूढ अर्थाने हा आमदार नाही. लोकांनी त्याला निवडून दिलेले नाही. त्याचा समाजसेवी स्वभाव, तळमळ, सामाजिक कार्यात स्वत:ला झोकून देण्याची तयारी आणि विद्रोही प्रवृत्ती यांमुळे सर्वसामान्य लोकांनी त्याला



जमीन विकली तर स्वर्गातील आईबापांना काय वाटेल? असा तिच्या मनातील विचारसंघर्ष सुरू असतो. पवारांनी म्हातारीच्या मनातील घालमेल येथे मोठ्या ताकदीने वर्णन केली आहे. शेवटी ती ठरवते की, जीव गेला तरी चालेल, पण ही मायपंढरी दुसऱ्याला विकायची नाही. ती अशा विचारात असतानाच मुंबईहून कचर येतो. मुंबईत राहून त्याची जीवनमूल्ये बदललेली असतात. म्हातारीने त्याला 'कचर' या नावाने हाक मारलेली त्याला आवडत नाही. त्याला म्हातारीने बोलवलेले नसते, तर तात्याने गुपचूप पत्र पाठवून बोलवलेले असते. कचरचा या ठिकाणी जीव स्थिर राहत नाही. त्याला मुंबईच्या फ्लॅटमधील जीवनाची आठवण येते. कचर आणि तात्या संगनमताने म्हातारीची जमीन लवकर ताब्यात घेण्याचा बेत आखतात. म्हातारी वर जाण्यापूर्वी ती जमीन आपल्या नावे बक्षीसपत्र करून घेण्याचा कचरचा विचार असतो. तात्या वेगळा डाव टाकतो. तो सयबायच्या काळजाला हात घालतो. सयबायने तिच्या आईबापाचा दिवस घातला नसल्याने 'आया गगनी फिरतात — भुकेल्या पोटी त्यांचे आत्मे' असे सांगून तात्या तिला दिवस घालण्यासाठी प्रवृत्त करतो. पण तिच्याजवळ तेवढे पैसे नाहीत, म्हणून कचरने तो दिवस घालायचा. त्याचा सर्व खर्च तो करील आणि त्या मोबदल्यात म्हातारीने जमिनीचा तुकडा त्याच्या नावे करायचा, असे ठरते. वास्तविक म्हातारी खंडू पाटलाला

जमीन विकायला तयार होत नाही. त्याची कारणे म्हणजे तिची जुनी जीवनमूल्ये शाबूत आहेत म्हणून आणि जमीन विकल्यावर म्हातारपणी आपले काय होईल, हा प्रश्नही तिच्यापुढे असतो.

शेवटी म्हातारी सयबाय खचून जाते. तात्या आणि कचर ही तिची जवळची माणसे तिची जमीन हडप करण्यास निघाली असतात. म्हातारपणात हातपाय बसल्यावर गावात आपण घरोघरी भाकरी मागतोय, हे चित्र तिला सारखे दिसू लागते आणि ती हुंदक्यावर हुंदके देऊ लागते.

या कथेत स्वत:च्या माणसांनीच फसवल्याने आणि जुन्या जीवनमूल्यांत गुरफटल्याने म्हातारी क्षणोक्षणी उद्ध्वस्त होत जाते. हा संघर्ष प्रवृत्तींमधील आहे. अशा प्रवृत्ती आज समाजात सर्वत्र आढळतात. पैशापुढे, जमिनीपुढे, स्वार्थापुढे माया, प्रेम या गोष्टी तुच्छ लेखणारा कचर येथे आहे, तर मायपंढरीवर प्राणापलीकडे प्रेम करणारी सयबाय आहे. कचर आणि सयबाय दोन विरुद्ध प्रवृत्तीचे मानदंड आहेत. दोघेही भविष्याचाच विचार करतात. एकीकडे सयबायला उद्ध्वस्त करणारा भविष्यकाळ दिसतो, तर दुसरीकडे तिच्या शेतात ऊस पेरून मिळणाऱ्या पैशांचे स्वप्न पाहणारा कचर आहे. म्हणूनच या कथेचे 'ससाणा' हे शीर्षक यथार्थ आहे. म्हातारी ससाण्यापासून कोंबडीच्या पिलाला वाचवू पाहते; परंतु स्वत:च्या मूल्यांना कचररूपी ससाण्यापासून वाचवू शकत नाही.



'ससाणा' या कथेत माणसाच्या स्वार्थी वृत्तीबरोबरच पवारांनी मानवी भावभावनांचा प्रश्नही हाताळला आहे. येथे अर्जुन डांगळे यांनी लिहिलेली 'प्रमोशन' कथा आठवते. या कथेतील 'वाघमारे' ही व्यक्तिरेखा आणि 'ससाणा'मधील 'कचर' हे दोघेही एकाच स्वभावाचे किंवा एकाच प्रवृत्तीचे वाटतात.

दलितांमध्ये मुख्यत्वेकरून महार मंडळी बौद्ध झाली. पण त्यांच्यात खरोखरीच सुधारणा झाली का? या प्रश्नाचे उत्तर पवारांना नकारार्थी द्यावयाचे असावे. जुन्या मूल्यांना चिकटून राहणारी जुनी पिढी, खेड्यातून शहराकडे धाव घेणारी आणि जुन्या मूल्यांना तिलांजली देणारी नवी पिढी या दोन्ही पिढ्यांमध्ये किंवा गावगाडा आणि नागरजीवन या दोन्हींतील दलित मनोवृत्तींमध्ये निर्माण झालेली तफावत यांमुळे उघड उघड दोन तट दिसून येतात. शेवटी एवढेच म्हणता येईल की इथून तिथून माणूस सारखाच!

⊙⊙⊙

खेचणारे तयारच असतात. तिथेच खरे राजकारण चालते, म्हणूनच आमदार या राजकारणाला 'गजकरण' म्हणतो. पण हा आमदार शेवटी वास्तवतेचा स्वीकार करतो. स्वत:चा मुलगा उत्तम कुस्तिवीर असूनही सभापतीच्या मुलाविरुद्ध कुस्ती खेळताना तो त्याला पडून घ्यायला सांगतो. कारण त्या पडून घेण्यामुळे त्याला साखर कारखान्यात नोकरी मिळणार असते.

पद्धतशीरपणे, धूर्तपणे आमदाराचा आपल्या मार्गातून काटा काढणारे दलित समाजातील नेते येथे आहेत आणि त्यांचे मूठभर कार्यकर्ते आहेत. त्याच्यासारख्या हरहुन्नरी माणसाला नेस्तनाबूत करून तत्कालीन प्रस्थापित पुढाऱ्यांनी आंबेडकरी चळवळीलाच सुरुंग लावला. पण तरीदेखील हा आमदार त्या दु:खाला कवटाळून बसला नाही, तर वस्तुस्थितीचा स्वीकार करून त्याने त्याचे मोठेपण दाखवून दिले. त्याच्या जीवनाचे तत्त्वज्ञान हे असामान्यच म्हटले पाहिजे.

दया पवारांच्या काही कथांवर असे आक्षेप घेतले जातात की, त्या एकसुरी आहेत. 'आमदार' कथाही त्याला अपवाद नाही. दलित समाजात राहून त्यांची परवड ज्यांनी बघितली आहे, ते मात्र हा आरोप करणार नाहीत. इतर समाजातही असे 'आमदार' असतील, त्यांचाही बळी जात असेल. पण येथे विद्रोह किंवा लढा एक असला तरी त्याची प्रत निराळी आहे. परिस्थितीशी तडजोड करणारा 'आमदार'



'आमदार' हे पद बहाल केले आहे. हे पद तो मोठ्या अभिमानाने मिरवतो आहे. तो पोलादी मनाचा आहे. बिकट परिस्थितीतही तो खचत नाही. वैभव असो किंवा दैन्य, त्याची जगण्याची पद्धत एकच. कुणाबद्दल मनात रागही असेल तरी तो आतल्या आत गिळून हसतमुखाने जीवनाला सामोरा जातो.

दुर्दैवाने संपकाळात कामगारांना भडकवण्याच्या आरोपावरून त्याला नोकरी गमवावी लागते आणि तो पुन्हा खेड्यात परततो. लेखकाचे आणि आमदाराचे घर समोरासमोर असल्याने त्याची चांगली माहिती लेखकाला आहे. बालपणापासून त्याच्या चळवळ्या स्वभावामुळे तो मुलांचा पुढारी होतो. गावातील तालमीत महार पोरांना कुस्त्या खेळू देत नाहीत, म्हणून त्याने चावडीपुढे कुस्त्यांचा हौद खोदलेला असतो. त्याची प्रवृत्ती सुरुवातीपासूनच विद्रोही असते. त्याच्या सामाजिक कार्यामुळे गावातील प्रतिष्ठित मंडळीही त्याला मान देतात. त्याला आपल्या घरी नेतात. गावकरी त्याचे म्हणणे ऐकतात. त्याने फुले, आंबेडकर, मार्क्स यांची विचारसरणी अंगीकारली आहे. धर्मावर, बुरसटलेल्या विचारांवर, रूढींवर तो घणाघाती हल्ला करतो. गावातील हरिनाम सप्ताहाच्या वेळी भंडारा होतो, तेव्हा आमदाराच्या नेतृत्वाची आणि विद्रोहाची कसोटीच लागते.

एक दिवस हा आमदार लेखकाच्या घरी येतो. त्याच्या

बोलण्यातून लेखकाला कळते की, आता आमदार तमाशाच्या फडात मॅनेजर असतो. जाताना तो लेखकाला त्या दिवशीच्या तमाशाच्या खेळाचे आमंत्रण देतो. लेखक तो खेळ बघायला जातात. 'सावळा कुंभार' हा तो खेळ असतो. तिथे आमदाराला एका नि:स्तब्ध उभ्या गाढवाच्या भूमिकेत पाहून लेखक हादरतात. खेळ संपेपर्यंत त्याला एकही संवाद बोलायचा नसतो. उभ्या हयातीत ज्या आमदाराने आपली वाणी तलवारीच्या पात्याप्रमाणे सतत चालवली, तोच हा आमदार. १९५६ ते १९६० या कालावधीत संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात एस.एम. जोशी, आचार्य अत्रे यांच्या बरोबरीने ज्याने वादळी प्रचार केलेला असतो, त्याच आमदाराची आज वाचा बंद झालेली असते. ही कल्पनाच लेखकाला सहन होत नाही. ज्या आमदाराने 'महाराची सून'सारखे नाटक बसवलेले असते, त्यातील ब्राम्हण नटीला झापायलाही कमी केलेले नसते, त्या आमदाराला अशा अवस्थेला कोणत्या समाजरचनेने पोचवला? हा विद्रोही माणूस अशा स्थितीला का बरे पोचला? हे प्रश्न चिंतनशीलतेला प्रवृत्त करतात.

या कथेमध्ये आंबेडकरी चळवळीबरोबरच स्वार्थाचे राजकारणही रंगविण्यात आले आहे. बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर दलित समाज सैरभैर झाला. नेत्यांच्या भरघोस पिकामुळे बाबासाहेबांची शिकवण पायदळी तुडवली गेली. नेत्यांची स्वार्थी वृत्ती फोफावत गेली. पवार आमदाराला त्याच्या



राजकारणाबद्दल विचारतात, तेव्हा तो 'राजकारण ते गजकरण झाले आहे' असे उद्गार काढतो. या राजकारणाने त्याची ससेहोलपट झाली आहे. या संदर्भात तो पवारांना माकडांतील उपल्याची गोष्ट सांगतो. हा उपल्या आपल्याला कोणीच प्रतिस्पर्धी येऊ नये किंवा आपल्या टोळीत आपल्यापेक्षा कोणी वरचढ होऊ नये, म्हणून नव्या जन्मलेल्या फक्त नर माकडांना मारून खातो. या त्याच्या भविष्यकाळातील तरतुदीसाठी आपल्याच रक्तापासून जन्मलेल्या नरांनाही तो सोडत नाही. आमदाराच्या बाबतीत नेमके हेच घडते. या आमदाराची तीक्ष्ण बुद्धी, कर्तृत्वाची चमक, चळवळीतील आणि समाजातील सर्वांनीच ओळखलेली असते. हा आपल्याला भविष्यात जड जाईल, आपल्यालाच डोके वर काढू देणार नाही, हे लक्षात घेऊन त्याच्याच सहकारी राजकारण्यांनी त्याचा बळी घेतला, तोही मोठ्या विचित्र पद्धतीने. झेड.पी.च्या निवडणुकीच्या वेळी सभापती त्याला थंड हवेच्या ठिकाणी म्हणून फिरायला पाठवतो आणि स्वत: मात्र चमच्यांबरोबर निवडणुकीचा फॉर्म भरण्यासाठी निघून जातो. निवडणूक तर दूरच राहिली, या आमदाराला फॉर्मही भरू दिला जात नाही. त्याची चांगलीच गोची केली जाते.

आमदाराची जी गोची होते, तसा प्रकार केवळ दलित नेतृत्वाच्या संदर्भातच घडतो, असे नाही. तो सर्वत्रच आणि असाच आढळतो. वरचढ होत जाणाऱ्या व्यक्तीला खाली

मानवी मनाच्या स्पंदनापेक्षा अंगावरील मांसाला जास्त किंमत आहे. तिथल्याच एका स्त्रीचे चित्रण करताना पवार लिहितात, 'तिच्या चेहऱ्याची एकच बाजू मेकअप करून झालेली. त्यामुळे दुसऱ्या बाजूच्या डोळ्यांभोवती असलेली काळी वर्तुळे दिसत असतात.' ('विटाळ' पृ. ४४) म्हणजेच तिच्या चेहऱ्याची पहिली बाजू तिच्याकडे येणाऱ्या रसिकांसाठी हास्याचा, आनंदाचा मुलामा चढवलेली, तर दुसरी वास्तव दर्शवणारी, आशा, निराशा, दु:ख यांचे प्रतीक असलेली. या वस्तीतील उफाड्याच्या टंच पोरींच्या विनवण्यांतून त्यांना पोटासाठी करावी लागणारी लाचारी जाणवते.

मोहन वामनला घेऊन वरच्या मजल्यावर पोचतो. तो दिदीच्या कोठीवर जाऊन तिला मिठाईचा पुडा देतो. त्याचवेळी वामनचे लक्ष कोचाखाली असणाऱ्या पाटीदप्तराकडे जाते. ते पाहून त्याचे मन सैरभैर होते. ते वातावरण त्याला असह्य होते. दिदी पेटीवाल्यापुढे बसते. गायला सुरुवात करते. ती गालिबची गझल असते. त्यात ओळी येतात —

'रगो में दौडने—फिरने के हम नही कायल।
अब आँखही से न टपका तो फिर लहू क्या है।'
('विटाळ' पृ. ४६)

जिवाच्या आकांतानं दिदी गाते. वामन गलबलून जातो. जंगलातील शिकाऱ्यांना पाहून चित्कारत जीव घेऊन पळणाऱ्या हरिणीचे दृश्य त्याच्या डोळ्यांपुढे उभे राहते.



किंवा परिस्थितीमुळे चिडून उठलेला 'फिडेल' या समाजातील दोन विरुद्ध प्रवृत्ती आहेत. काही ठिकाणी दलित समाजाच्या पाईकांनीच बेइमानी केली. आमदारासारख्या सच्च्या कार्यकर्त्याच्या रूपाने नवे उन्मेष तोडले गेले. वैयक्तिक राग, लोभ, स्वार्थ हे समाजविकासाच्या आड येणारे घटक सर्वत्रच आढळतात. दलित समाज त्याला अपवाद कसा राहील? 'फिडेल' आणि 'आमदार' या दोन्ही शोकांतिका आहे. 'फिडेल'ची शोकांतिका ही वैयक्तिक स्वार्थापोटी झालेली आहे तर 'आमदारा'वी शोकांतिका समूहमनाच्या स्वार्थापोटी झाली आहे. आमदाराची शोकांतिका मनाला स्पर्शून जाते. समाजातील हीच स्वार्थी प्रवृत्ती त्यांच्या शोकांतिकेला जबाबदार आहे. येथे आंबेडकरी चळवळीचे अपयश दिसून पडते. आमदाराचा नाही, तर आंबेडकरी मूल्यांचाही हा पराभव आहे, असे प्रकर्षाने जाणवते.

⊙⊙⊙

## १०.६. साहेब, दिदी आणि गुलाम

दलितेतर जीवनाची कथा म्हणून 'साहेब, दिदी आणि गुलाम' या कथेचा उल्लेख करता येईल. या कथेला वेगळीच

पार्श्वभूमी आहे. 'विटाळ'मधील इतर सर्व कथांपेक्षा या कथेचा तोंडवळा वेगळा आहे. मात्र या कथेचे धागेदोरे पवारांच्या 'बलुतं'मध्ये आढळतात.

कथेचे शीर्षक गुरुदत्तच्या 'साहेब, बिबी और गुलाम' या चित्रपटाच्या नावाशी साम्य दाखवणारे आहे. या चित्रपटाची कथाही आगळीवेगळी होती. ही कथाही निराळीच आहे. दलित कथांमध्ये किंवा साहित्यामध्ये वेश्यांचे, कोठेवाल्या स्त्रियांचे चित्रण येते. बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ यांच्या साहित्यात ते प्रकर्षाने वाचायला मिळते. दया पवारांच्या 'बलुतं'मध्येही गोलपिठ्यात राहणारी जमना मावशी, मानसिक दुभंगलेल्या अवस्थेत मित्राने दाखवलेला वेश्येचा उंबरठा, गोलपिठ्यात त्यांनी पाहिलेले वेश्यांचे जीवन वर्णन केले आहे. त्या घटनांचाच परिणाम होऊन पवारांनी ही कथा तयार केली आहे. पण नामदेव ढसाळांसारखी प्रखरता, भेदकता पवारांच्या लेखनात नाही. त्याला पवारांचा भिडस्त स्वभाव कारणीभूत आहे. समकालीन दलित लेखकांसारखी आक्रस्ताळी भूमिका दया पवारांना कधीच घेता आली नाही, हे त्यांच्या साहित्याचे वेगळेपण आहे. पवारांनी ज्या कथा लिहिल्या आहेत, त्यात स्वानुभवांचे चित्रण अधिक आहे. हे अनुभव सांगताना पवारांनी पात्रांची नावे मात्र बदलली आहेत.

वामनला बऱ्याच वर्षांनंतर मुंबईत 'बडा बिझिनेसमन' बनलेला त्याचा जुना मित्र मोहन भेटतो. वामन आणि मोहन



महाविद्यालयात एकत्र शिकलेले असतात. मोहनच्या बापाचा मोठा कारखाना आहे. पण मोहन भांडवलशाही मनोवृत्तीचा नाही. आपला बाप कामगारांना कसा त्रास देतो, कोंबड्यांना दाणे टाकावे तसे झुलवतो, आपापसात झुंजी लावतो, या सगळ्याची मोहनला जाणीव आहे. तो बापाचे दुर्गुण जाणून आहे.

एके दिवशी मोहन वामनला टॅक्सीने फोरास रोड दिशेने दिदीकडे जायचे आहे, असे सांगून घेऊन जातो. मोहनला कोठीवरील गाण्याचा नाद आहे. आपला नाद कसा खानदानी आहे, हे तो वामनला सांगतो. फोरास रोडचा भाग वामनच्या ओळखीचा असतो. त्याचे बालपण त्याच भागात गेलेले असते. त्या परिसराचे चित्रण करण्यात पवारांची लेखणी अधिक रमल्याचे जाणवते. कोठीवर गेल्यावर मोहन तिथल्या बाईला दिदी म्हणतो, याचे वामनला आश्चर्य वाटते. वेश्यांच्या वस्तीत, कोठीवर नाती नसतात, जात नसते. त्यांना असतो तो फक्त धर्म, भोग देण्याचा. म्हणूनच वामनला 'दिदी' शब्दाचे जे आश्चर्य वाटते, ते स्वाभाविक आहे.

या वेश्यावस्तीचे वर्णन पवारांनी वामनकडून करवून घेतले आहे. इमारतीत असलेल्या भरपूर खोल्या, कोपऱ्यात अंग चोरून बसलेले साजिंदे, त्यांच्यासमोरच बसून मेकअप करणाऱ्या त्या बाया, अत्तरांचे उग्र दर्प, मधूनच ऐकू येणारी दर्दभरी लकेर असे सगळे वर्णन या कथेत येते. या जगात

शोकांतिकाही झाली आहे. गणिकेच्या आणि मोहन नावाच्या एका गझलवेड्या तरुणाच्या जीवनावरील ही कथा दलितत्वाचा प्रत्यय विशेष देत नाही, हेही एक वैशिष्ट्यच!

⊙⊙⊙

## १०.७. विटाळ

दलित जीवनानुभवाचे चित्रण करणारी कथा म्हणून 'विटाळ'चा उल्लेख केला जातो. पण केवळ दलित जगापुरतीच ही शोकांतिका मर्यादित नाही, तर समस्त स्त्रीजातीवर भोगवट्याच्या दिवसात अपवित्रतेचा शिक्का मारून तिचा विटाळ मानणाऱ्या भारतीय परंपरेवरही ही कथा घणाघाती हल्ला करते. भारतीय समाजरचनेचा खोल तळ शोधण्याचा प्रयत्न ही कथा करते.

दलित कथा ही अनेकदा आत्मशोधाची कथा असते. 'विटाळ' हीदेखील एक आत्मशोधाचीच कथा आहे. 'बलुतं' या आत्मकथनात पवारांनी या कथेतील बहुतेक भाग मांडलेला आहे. 'विटाळ' या कथेद्वारे पवारांच्या आयुष्यात उद्‌भवलेल्या विटाळाच्या संदर्भातील कितीतरी प्रसंगांचे चित्र आपल्या डोळ्यांपुढे उभे राहते. एक भयाण परंतु वास्तव जीवनदर्शन या कथेतून होते. संवेदनशील मानवी मनाला हादरवून टाकणारी



असाच प्रसंग गुरुदत्तच्या 'प्यासा' चित्रपटात आहे. 'जिन्हे नाज है हिंदपर, वो कहाँ है?' हे गाणे त्या चित्रपटातील एका प्रसंगात आहे. पवारांच्या या कथेतील सदर प्रसंगाशी त्याची नाळ जोडता येते.

दिदी ही शरीरविक्रय करून जगणारी स्त्री आहे. मोहन तिच्या गझलेवर पुन:पुन्हा पैसे उधळतो. तेवढ्यात तिथे पाच–सहा तरुणी येतात. त्यातील एक मुलगी वामनला आपल्याच मुलीसारखी वाटते आणि तो हादरतो. तिच्या चेहऱ्याची ठेवण, लकब वामनला आपल्याच मुलीसारखी भासू लागते. येथे पवारांच्या 'कोंडवाडा' या काव्यसंग्रहातील 'हिरोशिमा' कवितेची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. त्या कवितेत 'वात्सल्यासाठी टाहो फोडणारा' असा उल्लेख आहे. सईपासून झालेल्या पवारांच्या बकुळा नावाच्या मुलीबद्दलचा तिथे संदर्भ येतो. या कथेतील उपरोक्त प्रसंगातील भाव आणि पवारांच्या 'हिरोशिमा' कवितेतील भावांमध्ये कमालीचे साम्य आढळते.

एकीकडे ही कथा मोहन आणि दिदी यांच्या पातळीवर घडते; पण या कथेला इतरही पैलू आहेत. नृत्य करताना एका युवतीच्या ओटीपोटावरील पदर ढळतो. ती गरोदर असल्याचे वामनला जाणवते. 'मातृत्व' हे किती पवित्र मानलं जातं! 'पोरसवदा'सारख्या कवितेत बा.सी. मर्ढेकर ज्या मातृत्वाला वंदन करतात तेच हे मातृत्व. शत्रूच्या सुनेला पकडून आणल्यावर तिची विटंबना न करता 'आमच्या माँ

साहेब इतक्या सुंदर असत्या तर....' असे उद्‌गार काढून मातृत्वाची महती गाणारे, स्त्रीला पूजनीय ठरवणारे शिवाजी महाराज एकीकडे आणि दुसरीकडे या बाजारात तेच मातृत्व कोणत्या परिस्थितीत लादलं जातं, याचा विचार वामनप्रमाणेच वाचकांनाही सुन्न करून सोडतो. पोटासाठी त्या मुलीला पोटातला जीव लपवून नाचावं लागतं, ही वास्तवता भयंकर आहे. वामन मोहनला याची जाणीव करून देतो. मोहनही तिचे पोट पाहून चपापतो व नाच थांबवायला सांगतो. आपलं नेमकं काय चुकलं, हे त्या अबोध बालिकेला कळत नाही.

एक पोट सुटलेली, वयस्क व्यक्ती पैशाच्या जोरावर मोहनची गझल तोडते. उडत्या चालीचे गाणे सुरू होते. मोहन संतापतो. रागाने दिदीला म्हणतो, 'मै आपको दिदी कहता हूँ, हमें क्या यहाँ ऐसा सम्मान मिलेगा?' यावर दिदी जे उत्तर देते, ते वास्तवाचे भीषण रूप आहे. ती म्हणते, 'देखिये साब, दिदीका रिश्ता तो घर में. दिदी कहते हो और बाजार में आते हो? यह तो बाजार है. अगर यहाँ कोईभी अठण्णी देगा तो हमें इज्जत करनी होती है. पेट की खातीर यह सब होता है.' ('विटाळ' पृ. ४९)

जगण्यासाठी इतर कुठलाच मार्ग खुला नसलेल्या या गणिकांना नाइलाजाने अंगीकारलेल्या या पेशात पैसा हाच एक मोलाचा आहे. पैशापुढे नातीगोती फिकी पडतात, भावभावना क्षुद्र ठरतात. कोठीवरच्या आणि वेश्यांच्या जीवनात



असतो फक्त व्यवहार देवघेवीचा. भावनांना, प्रेमाला तिथे किंमत नसते. या संदर्भात ग.दि. माडगूळकरांची 'जोगिया' ही कविता स्मरते.

'नीतीचा उघडला खुला जिथे व्यापार
बावळा तिथे हा इष्का गणितो प्यार'

नर्तकीकडे आलेला तो वेडा बावळा तरुण नर्तकीच्या प्रेमाबद्दल विचारतो, हेच त्याचे चुकते. कारण या जीवनात असतो, खुल्लमखुल्ला व्यापार. तिथे विचार असतो, पोटाचा आणि भोगाचा. मग वाटल्यास तिथे ढोंगीपणा किंवा फसवणूक किंचितही आढळणार नाही. कवी नारायण सुर्वेंच्या 'मनिऑर्डर'मध्येही गणिकेचा विषय घेऊन सुरेख वर्णन केले आहे. या गणिकांच्या जीवनात जिथे केवळ दु:ख, वेदना आणि परवडच लिहिलेली आहे, तिथे उदास चेहऱ्यावर खोट्या आनंदाचा, हसरेपणाचा मेकअप चढवून स्वत:ला विकायला सज्ज असलेल्या त्या गणिका पैशाशिवाय दुसरी कुठली अपेक्षा करणार? जिथे अधिक पैसा मिळेल, तिथे त्या जातील, त्यांचेच ऐकतील. फाटक्या जीवनाला अशी ठिगळं लावण्यासाठी स्वत:चं शरीर विकणाऱ्या या गणिकांच्या व्यवहारी जगात मोहन मात्र अव्यवहारी ठरतो. या कथेतून कोठीवरच्या स्त्रियांची परवड तर पवारांनी समर्थपणे रेखाटली आहेच, पण त्याचवेळी हळव्या, स्वप्नाळू भावभावनांमध्ये गुरफटलेल्या एका मोहन नावाच्या तरुणाची ती यशस्वीपणे सादर केलेली

किंवा खाद्यपदार्थ उकळणारे हे पात्र पवारांनी इथे संक्षेपाने दिले आहे.

पवारांच्या वडिलांचे वाढत गेलेले दारूचे व्यसन, त्यांचा मृत्यू, येसकरपाळी, मेलेल्या ढोरांना खांदा देण्याची आईने केलेली कामे या सगळ्या प्रसंगांना या कथेत एकत्र गुंफण्याचे कारण म्हणजे भारतीय परंपरेने या दलित जातींचा किंवा समाजाचा जो विटाळ मानला, त्याची नव्या पिढीला जाणीव व्हावी. त्याचप्रमाणे विटाळाचा केवळ एकच अर्थ त्यांना अभिप्रेत नाही, तर शतकानुशतके दलित समाजाच्या वाट्याला आलेला अस्पृश्यतेचा भोगवटा त्यांना येथे सांगावयाचा आहे.

पवारांची निवड बोर्डिंगमध्ये होते. तिथेही 'विटाळा'चा भोगवटा त्यांना सोडत नाही. पहिल्याच दिवशी त्यांना विचित्र अनुभव येतो. बोर्डिंगमधील सर्व मुले महादेव कोळी असतात. एकटे पवारच महार जातीचे असतात. ते महार असल्याने त्यांनी दरवाजाजवळ बसावे, हॉलमध्ये येऊ नये, नाहीतर मुले त्यांचा चेंदामेंदा करतील अशी समज ऑफीस सुपरिंटेंडेंट देतात. त्यावेळी 'वदनि कवळ घेता' ही प्रार्थना पवारांना मृत्युगीतासारखी वाटते. पुढे दर शनिवारी मारुतीस्तोत्र व्हायचे. पवारांचा आवाज चांगला असल्याने गांधीजींचे आवडते भजन 'वैष्णव जन तो तेणे कहिये – पर पीडा जो जाने रे' हे पवार पुढे म्हणायचे आणि मागून मुले साथ द्यायची. परंतु प्रसादाचे ताट मात्र त्यांच्या हाती कधीच आले नाही. त्यावेळी पवार



ही कथा आहे. तत्कालीन जातिभेदाचे चटके, दुष्ट रूढीपरंपरांचे फटके या कथेतून वर्णिलेले आहेत. ही कथा इतर कथांच्या मानाने बरीच मोठी आहे. 'विटाळा'संदर्भात विविध प्रसंगांची गुंफण त्यात आहे.

दिवाळीच्या दिवशी पवारांच्या पत्नीने गोडधोड केलेले असते. मिठाईचे ताट घेऊन ती शेजारच्या शहाण्णवकुळी मराठे म्हणवून घेणाऱ्या देशमुखबाईंकडे जाते. 'अहो, आम्हाला कशाला ताट? आमच्या घरी भरपूर आहे. तेवढेच होईल तुमच्या मुलाबाळांना.' असे बोलून देशमुखबाई पवारांच्या पत्नीची बोळवण करते. ('विटाळ' पृ. ५१)

पवारांचे मन सुन्न होते. जातीमुळे त्यांच्या पत्नीचा पाणउतारा झालेला असतो. जिभेवरच्या गोड पदार्थांची चव त्यांना कडवट वाटू लागते. सारा देश प्रचंड पिरॅमिड आहे आणि आपण त्या पिरॅमिडमध्ये 'ममी'सारखे सडले जातोय, असा भास त्यांना होतो. भोगलेला भूतकाळ त्यांना गंडमाळेसारखा ठसठसू लागतो. जणूकाही एक एक गाठ फुटतेय, असे त्यांना वाटू लागते आणि विचारांच्या तंद्रीत पवार भूतकाळात पोचतात.

'फ्लॅशबॅक' हे तंत्र पवारांनी बऱ्याच कथांसाठी वापरले आहे. किंबहुना समस्त दलित जीवनाचा विचार करताना लक्षात येते की, एखादा कटू प्रसंग घडला की पूर्वी घडून गेलेले अनेक कटू प्रसंग दलित नजरेपुढे वारंवार साकार

होतात. गतकालाशी त्या प्रसंगाची नाळ जोडण्याचा प्रयत्न केला जातो. हे दुःखद वेदनामय अनुभव कधीच संपणार नाहीत का? असा गहन प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहत असावा. गतकालातील वाडवडिलांच्या अनुभवांची तीव्रता आठवून या अनुभवाची तीव्रता त्यापेक्षा किंचित कमी आहे, असे काहीसे समाधान मानून भविष्याची सुखद स्वप्ने बघत तर ही मंडळी जगत नसावी?

दया पवार हे एक साहित्यिक म्हणून गाजले. पण त्यांचे बालपण सुखात गेले नाही. लहानपणीच वडील वारले. त्यामुळे 'रांडकीचं रांड प्वार' ही अवहेलना सदोदित त्यांच्या वाट्याला आली. त्यांची आई मात्र हिंमतीची होती. हालअपेष्टा सोसूनही तिने मुलांना चांगले संस्कार दिले. आपला मुलगा शिकला पाहिजे, या नरकयातनांतून त्याची मुक्ती व्हायला हवी, अशी तिची इच्छा होती. तिने आपल्या मुलाला तालुक्याला शिकायला पाठवले. शिक्षणातही दया पवारांना जातिभेदाचे चटके सोसावे लागले. शाळेत इतर जातीची मुले दूर बसायची. नदीवर सवर्णांची मुले पाणी प्यायची, त्यावेळी पवारांना नदीच्या खालच्या भागाला जाऊन पाणी प्यावे लागे.

बालवयातच आलेल्या या अनुभवांमुळे त्यांचे मन दुभंगून जायचे. तेव्हापासून 'विटाळा'चा हा भोगवटा त्यांच्या मनात ज्वालामुखीप्रमाणे धगधगत राहिला. हा 'विटाळ' त्यांच्या मनात प्रक्षोभ निर्माण करायचा. एकदा त्यांनी आपल्या



शिदोरीतील चटणी इतर सवर्ण मुलांना देऊ केली, तर त्या मुलांना तो अपमान वाटला. 'ए धेडपटा, फार माजलास काय? आमच्या घरचे येसकरपाटीत आलेले तुकडे मोडतोस आणि येथे मिजास दाखवतोस?' अशी वाक्ये त्यांना ऐकावी लागली. ('विटाळ' पृ. ५७) या घटनेमुळे पवार अंतर्मुख झाले.

पवारांनी 'विटाळ'मध्ये जे विविध प्रसंग वर्णन केलेले आहेत, त्यात सिन्नरच्या क्रांतिकारक जलशाचे वर्णन आहे. 'जलसा' हा काय प्रकार आहे, हे पाहायला गावातील मराठा मंडळी जातात. गवळण सुरू होते, पण जलशातील गवळणी मथुरेच्या बाजाराला न जाता बाबासाहेबांच्या प्रेरणेने पाहिलेल्या नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहाला चाललेल्या असतात. मराठा मंडळी पेटून उठतात. दुसऱ्या दिवशी महारवाड्यावर गावाकडून बहिष्कार टाकला जातो.

दुसऱ्या एका प्रसंगात वाजंत्र्याच्या ताफ्यातील सटवामामाचे वर्णन आलेले आहे. 'बलुतं'मध्येही हे प्रसंग आहेतच. सटवामामा कांडं वाजवायचा. त्याची पत्रावळी उकिरड्यावर मांडणाऱ्या वऱ्हाड्यांना तो कांडातून शिव्या द्यायचा. फक्त पवारांनाच ते कळत असल्यामुळे पवार आणि सटवामामा खूष व्हायचे.

सुदामबुवाचे वर्णनही या कथेत आले आहे. लोकांना गंडवून, बाहुली दाखवून, जादूटोणा वगैरेची थाप देऊन पैसे

मुलगी जेव्हा 'मनाचे श्लोक'सारखे पुस्तक मागते, तेव्हा पवारांना अंगावर पाल पडावी, तसे वाटते. माणसामाणसात विषमतेचे तत्त्वज्ञान पेरणाऱ्या अशा धर्मग्रंथाला चूड लावावी, हा विचार पवारांच्या मनात येणं साहजिकच आहे.

एकंदरीत 'विटाळ' ही कथा दलित साहित्यात एक अनन्यसाधारण महत्त्व राखून आहे. संपूर्ण भारतीय समाजरचनेला ती आव्हान देते, यातच तिच्या यशाचे गमक आहे.

⊙⊙⊙

## १०.८. वधस्तंभ

'वधस्तंभ' ही कथा परिस्थितीला शरण न जाणाऱ्या एका ध्येयवादी तरुणाची कथा आहे. मानवी जीवनातील अनेक घटना अनाकलनीय असतात. सर्वसामान्य माणसाला जीवन हे कोडेच वाटते. आपण नेमके कुणासाठी जगलो, कशासाठी जगलो हे प्रश्न 'वधस्तंभ' कथेच्या नायकाला पडलेले आहेत.

पवारांच्या कथेतील माणसे संघर्ष करीतच जगतात. कधी ते विद्रोह पुकारतात तर कधी माघारही घेतात. 'मोडेन पण वाकणार नाही' अशा बाण्याने जगणारी माणसेही त्यांच्या कथेत येतात. 'वधस्तंभ'चा नायक सदा कांबळे हाही याच



आपल्या हाताकडे बघायचे. आपल्याला रक्तपिती तर झाली नाही ना, असा प्रश्न त्यांना पडायचा. या तोंड दाबून बुक्क्यांच्या मारापेक्षा गावची गुरे वळली असती तर बरे झाले असते, असे त्यांना वाटते. मुंग्यांना साखर घालणारा हा धर्म मोडीत काढावा, असे त्यांना सारखे वाटायचे.

'विटाळ'मध्येच पवारांनी सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांचा प्रसंगही तटस्थपणे वर्णन केला आहे. गावातील देवळात प्रवेश केल्यावर एक टाळकरी जात विचारतो. पवारांची जात कळल्यावर सणसणीत कानामागे बसते. शेवटी आजी येते आणि पवारांची सुटका करते.

दगडू मारोती पवार सातवी पास झाल्यानंतर तालुक्याच्या ठिकाणी बोर्डिंगमध्ये मुंबईहून आलेली ट्रस्टी मंडळी त्यांची प्रवेशासाठी मुलाखत घेतात. 'हरिजन' ही जात सांगितल्यावर ट्रस्टी म्हणतात, 'असे नाही बोलायचे, 'महार' म्हणायचे. 'हरिजन' ही गांधींनी आपल्याला दिलेली शिवी आहे.' ('बलुतं' पृ. ६१) इथे पवारांच्या मनाचा गोंधळ उडतो. आंबेडकरी तत्त्वज्ञानाशी त्यांची तिथे ओळख होते. सभोवतालच्या परिस्थितीची कल्पना येते. पुढे दिवाळीच्या सुटीत घरी गेल्यावर पवारांना आईचे हाल बघवत नाहीत. वसतिगृहाच्या संचालकांना विनंती करून ते आईला तिथे स्वयंपाकीण म्हणून नोकरी मिळवून देतात. पण दुर्दैवाने अस्पृश्यतेची, अदृश्य विटाळाची भयंकर बाजू तिथे त्यांच्यापुढे येते. हे सगळे त्यांनी कथेच्या

शेवटच्या प्रसंगात वर्णन केले आहे.

एक दिवस पवार ताट आणि तांब्या घेऊन जेवणाच्या हॉलकडे जातात. सारी मुले तिथे आधीच बसलेली असतात. पवारांना पाहताच सगळे किंचाळतात, 'पचका झाला!' पवारांना नेमके काय झाले, ते समजत नाही. कुणीच जेवत नाही. सारे 'पचका, पचका' असे ओरडतात. पवार ताटावरून उठून स्वयंपाकखोलीकडे जातात. पवारांना पाहताच त्यांची आई गळ्यात पडून रडू लागते आणि मग एकदम बाजूला होऊन म्हणते, 'मला शिवायचं नाही.' हे ऐकल्याबरोबर पवारांच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडतो. ते म्हणतात, 'अंगावर तेजाब ओतल्यासारखा देहाचा दाह होतो. भूकंप व्हावा आणि आम्हा मायलेकराला धरणीनं पोटात घ्यावं, असं वाटतं. आपण या देशात का बरं जन्माला आलो? त्यापेक्षा बर्फाळ अशा टुंड्रा प्रदेशात का नाही जन्मलो? तिथं 'विटाळ' नसेल.'[२५] विटाळाची ही भीषण परंपरा पवारांनी वेगळ्या प्रसंगातून आपल्यापुढे मांडली आहे. मुखपृष्ठावर दिलेल्या ओव्याच पुन्हा पवार विषण्ण होऊन उद्धृत करतात.

'अत्यंत दोष, ज्या विटाळा।
त्या विटाळाचाचि पुतळा।
तेथे निर्मळतेचा सोहळा। केचि घडे ——'

मनुष्य जन्मासंबंधी किती पराकोटीची ही घृणा? हे सारं तत्त्वज्ञान शाळा–कॉलेजात शिकवलं जातंय. यातून



'नवा माणूस' कसा उभा राहील?'[२६] असा प्रश्न पवार करतात. सवर्णांसह कोणत्याही जाती–जमातीतील स्त्रीच्या बाबतीत ही घटना साहजिक असूनही पवारांना स्वानुभूतीतून तिचे चित्रण करणे आवश्यक वाटले. त्यातूनच ही कथा साकारली. अस्पर्शतेचे दु:ख सगळ्याच स्त्रियांना महिन्यातले चार दिवस भोगावे लागत असले तरी अस्पृश्य, दलित, हरिजनांना जीवनभरच त्या तुच्छ जिण्याला तोंड द्यावे लागते, हेही पवारांना सांगायचे आहे.

या कथेतील शेवटचा प्रसंग खरोखर विचार करण्यास भाग पाडतो. शतकानुशतके चालत आलेला हा 'विटाळ' कधी संपुष्टात येईल? स्वयंपाक करून आपला चरितार्थ चालवणारी गरीब स्त्री महार जातीची आहे आणि तिला मासिक पाळी आलेली आहे, म्हणून तिने केलेला स्वयंपाक नाकारणारे विद्यार्थी विटाळ पाळतात. हे विद्यार्थीसुद्धा कोण, तर डोंगरदऱ्यांतून आलेले आदिवासी — महादेवकोळी. ज्यांना विटाळाचा नेमका अर्थही माहीत नाही, असे विद्यार्थी. ते असे वागतात कारण तो सामाजिक रूढीचा एक भाग होता. त्या रूढीपलीकडे ते जाऊ शकले नाहीत. हेच समाजाचे, शिक्षणाचे दुर्दैव आहे.

'विटाळ' ही कथा आपण एक कथा म्हणून वाचत असलो तरीदेखील पवारांनी घेतलेला तो एक जीवघेणा अनुभव आहे. हा अनुभव वाचकांना बेचैन करतो. पवारांची

'आपण सीमेवर कुणासाठी लढलो
का बरे देशासाठी खुडलो गेलो?'[२७]

सदा कांबळेच्या मन:प्रवृत्तींशी जुळणाऱ्या या ओळी आहेत. या कथेला दिलेले 'वधस्तंभ' हे शीर्षक संयुक्तिक आहे. येथे जो संघर्ष आहे, तो वैयक्तिक नाही, तो मूल्यसंघर्ष आहे. खरेतर तत्त्वनिष्ठ व्यक्ती किंवा तात्त्विक विचार यांच्या विरोधात स्वार्थी सामाजिक प्रवृत्ती यांच्यामधील हा संघर्ष आहे.

⊙⊙⊙

## १०.९. एका झाडानं किती टकरावं?

एक सामाजिक कथा म्हणून 'एका झाडानं किती टकरावं?' या कथेकडे बघितले जाते. या कथेत राजकारण मात्र बऱ्याच प्रमाणात आहे. वि.शं. चौघुलेंच्या मते, ' 'एका झाडानं किती टकरावं?' ही कथा रिपोर्टाज (वृत्तान्त) पद्धतीची आहे. सामाजिक विषयावर लिहिताना अनिल अवचट जी शैली किंवा पद्धत वापरतात, तशीच पद्धत पवारांनी या कथेसाठी वापरली आहे.'[२८] दलित जीवनात येणारे हे अनुभव पवारांनी स्वत: घेतलेले आहेत; पण लिहिताना ते केवळ दलित जीवनाचेच अनुभव कथन करीत नाहीत, तर अन्य



प्रकारात मोडतो; परंतु तो दुर्दैवी ठरतो. सदा कांबळेची ही शोकांतिका वाचकांना चटका लावून जाते.

पवारांची ही कथाही फ्लॅशबॅक तंत्राने पुढे येते. सुरुवातीलाच कारखान्याच्या मेनगेटवर सदा कांबळे केळी विकताना दिसतो. पवार त्याच्याकडून केळी घेतात, तेव्हा त्यांना कसेसेच होते. या सळसळत्या रक्ताच्या तरुण कार्यकर्त्याच्या शोकांतिकेला आपणही जबाबदार आहोत, या जाणिवेने लेखकही व्यथित होतो. त्याला भूतकाळ आठवतो. पूर्वीचा सदा कांबळे आठवतो. कामगारांच्या हाकेला ओ देणारा, त्यांच्यासाठी धावून जाणारा, जिवाची बाजी लावणारा सळसळत्या रक्ताचा हा तरुण कार्यकर्ता. कामावर रुजू झाल्यानंतर जमावापुढे भाषण करताना सदा कांबळेला पवार पाहतात. त्यावेळी त्याच्यापुढे चार–पाचशे कामगारांचा समुदाय असतो. त्याची ओळखच 'सदा कांबळे हाय. आमच्या युनियनचा पुढारी, मागच्या संपात नोकरी गेली व्हती, मोठा बहाद्दर गडी, लाचारी पत्करली न्हाई' अशा पद्धतीने पवारांना करून दिली जाते.

लवकरच चित्र बदलते. कामगारांना भडकावल्याच्या आरोपावरून सदा कांबळेला कामावरून कमी केले जाते. पण तो परिस्थितीला शरण जाताना दिसत नाही. ज्या कारखान्यातून त्याला कमी करण्यात आलेले असते, त्याच कारखान्यासमोर तो केळी विकण्याचा धंदा सुरू करतो. पण

त्यावेळी त्याला जाणवतं की, आपल्यामुळे अगोदर तेथे केळी विकणाऱ्या दोन बायांच्या पोटावर पाय येतो, म्हणून तो केळीचा धंदा बंद करायचा ठरवतो.

कांबळे तसा विद्रोही प्रवृत्तीचा आहे. तो अन्याय सहन करीत नाही. कारखान्याच्या कँटीनमध्ये मिळणाऱ्या चहात फरक जाणवल्याने तो चवताळतो. कारखान्याच्या निवडणुकीत तो निवडून येतो. पण तिथे सापळ्यात सापडलेल्या उंदरासारखी सदाची अवस्था होते. कँटीन कमिटीवर जाऊनही तो काही करू शकत नाही. सदा राजीनामा देणार, हे भाकीत शेवटी खरे ठरते.

सदाचे दुर्दैव एवढ्यावर संपत नाही. त्याची नववीत शिकणारी मुलगी गल्लीतील मवाल्याबरोबर पळून जाते. त्याची स्थिती बिघडत जाते. मुलाबाळांचे हाल होऊ लागतात. पवार त्याला पुन्हा कामावर येण्यासाठी साहेबांकडे अपील करायला सुचवतात. पण ज्या कामगारांसाठी तो सतत लढला असतो, ते कामगार आता त्याच्यासोबत नसतात. तो अपील करायचे नाकारतो. अपील करणे म्हणजे भीक मागणे आहे, असे त्याला वाटते. त्याच्यापेक्षा टाचा घासून मरेन, ही त्याची जिद्द असते. संसाराची परवड होत असते. बायको फुटपाथवर भाजीपाला घेऊन बसते. पवार समजावतात; पण त्यांना तो म्हणतो, 'मास्तर, हे सोडून बाकीचे काहीही सांगा. पण माझे इमान सोडायला सांगू नका.' ('विटाळ' पृ. ७२) तडजोड



सदाला पसंत नसते. शेवटी सदा वेडा होतो. कारखान्याच्या मेनगेटवर तो साहेबांची गाडी अडवण्याचा प्रयत्न करतो. पहारेकरी त्याला पकडून ठेवतो. तो किंचाळत राहतो. पवार समजावण्यासाठी त्याच्याजवळ येतात. त्यांनाही तो साहेबांचाच माणूस म्हणून धिक्कारतो. 'त्यांच्याच माळेतले मणी' म्हणतो. बडबडत तो पळू लागतो. पवार शून्य दृष्टीने त्याच्याकडे बघत राहतात.

सदा कांबळे या धडाडीच्या कामगाराची अशी शोकांतिका का व्हावी? त्याच्या या स्थितीला जबाबदार कोण? ज्यांच्यासाठी तो आयुष्यभर लढला, त्यांनीच गद्दारी केली. तरीही त्याची मूल्ये तो सोडत नाही. वेळ पाहून वागत नाही. तडजोड त्याच्या रक्तात नाही. आहे तो बेगुमानपणा. त्याच्या जीवनाचं तत्त्वज्ञान ठरलेलं आहे. त्याची जीवनमूल्येही त्याच्या शोकांतिकेला कारणीभूत आहेत. त्याच्या बाणेदार तत्त्वांना बाजूला सारून इतर कामगारांप्रमाणे त्याने पुन्हा नोकरी केली असती, तर त्याच्या संसाराची अशी ससेहोलपट झाली नसती. पण स्वार्थासाठी माणसाने तत्त्वांना तिलांजली द्यावी का? असा प्रश्न उभा राहतो. खरंतर तत्त्वनिष्ठ जीवनप्रणालीतच खरे सामर्थ्य असते. पण जगातील बहुतेक लोक स्वार्थासाठी वाटेल ते करायला तयार होतात. पवारांचीच एक कविता 'ब्रोकन मेन'. त्यातील महार पलटणीतल्या कांबळेला शेवटी प्रश्न पडतो,

घेतो, हे त्यांना माहीत नसते. त्याच्या पूर्वजीवनाबद्दल विशेष माहिती त्यांना नसते. त्याला नोकरीवर ठेवण्यासाठी त्यांनीच शिफारस केलेली. आणखी माहिती मिळते की, त्याची पत्नी असून दोन–तीन रखेल्याही आहेत. त्यांच्यापासून संततीही झालेली आहे. पूर्वी त्याने सीता नामक एका बाईलाही पळवून नेले होते व त्याला अटकही झाली होती. अशा उलटसुलट बातम्या पुढे येतात.

पुढे प्राप्त झालेल्या बातम्यांवरून पवार ही घटना विस्ताराने कथन करतात. संध्याकाळी सहाला लहान भावाबरोबर लता सय्यद इब्राहिम नावाच्या शिक्षकाकडे शिकवणीस गेलेली. सय्यद त्या दोघांना कोकाकोला म्हणून चक्क ब्रँडी पाजतो. लहान भाऊ नशेत झोपतो. सय्यद अर्धवट नशेच्या अवस्थेत असलेल्या लतावर बलात्कार करतो. ती धडपड करते; पण सुटू शकत नाही. बराच वेळ मुलगी घरी आली नाही, म्हणून मुलीची आई काळजीत पडते. मुलीचे वडील घरी नाहीत. जुने शेजारी महंमद यांना ती तिच्या शोधार्थ पाठवते. त्यांच्या जबानीवरून ते गेल्यावर दारावर जोरात लाथा मारल्यावरच सय्यद दार उघडतो. रसभंग झाला म्हणून चिडलेला. दोघांची शिवीगाळी होते. जवळ जवळ नग्नावस्थेत असलेली मुलगी कपडे करते.

मुलीवर बलात्कार करणाराही मुसलमान आणि तिची सुटका करणाराही मुसलमान, त्यामुळे घटनेवर वेगळा प्रकाश



समाजातील किंवा एकंदर मानवी जीवनातील मनाला चटका लावून जाणारे चित्रणही ते करतात. अनेकदा एखाद्या सत्यघटनेने ते भारावून जातात आणि ती लोकविलक्षण घटना त्यांच्या अखंड चिंतनातून एका वास्तव साहित्यकृतीचे रूप घेऊन जन्माला येते. 'एका झाडानं किती टकरावं?' हे त्याचं बोलकं उदाहरण.

सोलापूर शहरात इतर जातींप्रमाणेच बौद्ध आणि मुसलमानांचीही वस्ती आहे. बौद्ध मंडळींतही एकता नाही. या भागातील बौद्ध मंडळींनी दोन वेगवेगळी हायस्कूल्स चालवलेली आहेत. एक म्हणजे जयभीम हायस्कूल आणि दुसरे म्हणजे सिद्धार्थ हायस्कूल. दोन्ही संस्था वेगळ्या. एकमेकांच्या चुरशीने काढलेल्या. जयभीम हायस्कूलचे संचालक रिपब्लिकन पक्षाचे माजी खासदार. या शाळेसमोर डॉ. बाबासाहेबांनी काढलेले मागासवर्गीय विद्यार्थिनींचे वसतिगृह आहे. पण या वसतिगृहाचा कारभार आता सवर्ण मंडळींकडे असतो. हायस्कूलचे मुख्याध्यापक माळी समाजाचे आहेत.

पवारांनी ही कथा सांगताना तपशीलाचा भरपूर वापर केला आहे. बऱ्याच बारीकसारीक अनावश्यक गोष्टींची माहितीही ते या ठिकाणी देतात. पण त्यामुळे कथानकाचा वेग मात्र मंदावत नाही, एवढे खरे! दलितांत एकी नाही, ही खंत मात्र सातत्याने प्रकट होते.

या शाळेच्या संदर्भात एक घृणास्पद घटना घडते.

दहावीत शिकणारी कु. लता कांबळे या मुलीवर एका शिक्षकाने बलात्कार केलेला असतो. सगळ्या शहरभर खळबळ माजते. पोलीस खात्याचे कोरड्या भाषेतील पत्र मुख्याध्यापकाला येते. त्यात तपशील असतो. हिंदीच्या शिकवणीच्या निमित्ताने लता कांबळे सय्यद इब्राहिम नावाच्या शिक्षकाकडे त्याच्या खोलीवर गेलेली असते. तिथे तो नराधम तिच्याशी जबरी संभोग करतो. मुलीचे वडील पोलिसांत तक्रार देतात. शिक्षक फरार होतो.

ज्या दिवशी ही घटना घडते, त्या दिवशी एक रिपब्लिकन पुढारी शहरात बुद्धाच्या मूर्तीच्या प्रतिष्ठापनेसाठी आलेला असतो. हे वृत्त पसरताच बौद्ध तरुण संतापतात. घटनेच्या निषेधार्थ ते मोर्चा काढतात. शाळेत हरताळ पाळतात. शाळा संचालक, माजी खासदार घरी सापडत नाहीत. पुढाऱ्याबरोबर ते डाकबंगल्यावर असतात. ज्या पद्धतीने तरुण बौद्ध मंडळी ही केस हाताळतात, ती पद्धत नेते मंडळींना आवडत नाही. त्यांच्या मते, असे केल्याने संस्थेची, बौद्ध समाजाची, आंबेडकरी चळवळीची अब्रू जाते. मुलीची एवढी अब्रू गेली, त्याचे नेते मंडळींना काहीच वाटत नाही. वृत्तपत्रांतून घटनेला वाचा फुटते. असेंब्लीत चर्चा होते. दया पवार या घटनेसंबधी खरी परिस्थिती जाणण्यास जातात. त्यांनाही विचित्र असाच अनुभव येतो.

एका मुस्लीम शिक्षकाने एका नवबौद्ध विद्यार्थिनीवर



जबरी बलात्कार केला, हा विषय कथेच्या केंद्रस्थानी असला, तरी या कथेला अनेक पदर आहेत. दलितांमधील दोन विचारप्रवाह, तरुणांमधील प्रस्थापित नेतृत्व आणि राजकारणातील दोन गट यांचे विश्लेषणही पवारांनी केले आहे. समाजाची आणि आंबेडकरी चळवळीची अब्रू गेली, असे म्हणणारा प्रस्थापित दलित नेत्यांचा विचारप्रवाह आणि विद्रोहाने पेटलेला तरुण हा दुसरा प्रवाह एक होऊ शकत नाहीत.

पुढे पवारांच्या चिंतनशीलतेतून उमटणारा सूर सांगतो की, इथे गवई गट आणि खोब्रागडे गट अशी दलित राजकारण्यांची गटबाजी आहे. घटना बलात्काराची, त्यावरील संतप्त प्रतिक्रिया मोर्चाच्या रूपाने व्यक्त होते. पण स्वार्थासाठी आपल्याबरोबर समाजाला फरफटत नेणाऱ्या नेतृत्वाने हा मोर्चा खोब्रागडे गटाने आयोजित केला, असे विधान मांडणे, हे संतापजनक आहे. कारण ती संस्था गवई गटाची असते व झेड.पी.ची निवडणूक जवळ आलेली असते. लतावर झालेला बलात्कार जितका चीड आणणारा आहे, त्यापेक्षा अधिक चीड सभोवतालच्या समाजामुळे आणि दलित नेतृत्वाने केलेल्या कृत्याने येते.

त्या शिक्षकाला बडतर्फ करण्यास विलंब होतो; पण मुख्याध्यापकांच्या मते घटनेच्या दुसऱ्याच दिवशी त्याला बडतर्फ केले असते. शिक्षकाची वैयक्तिक माहिती काढली जाते. भाऊ लोखंडेंचा तो मित्र असतो. तो हिंदीच्या शिकवण्या

किडलेली, Rotten झालेली आहे. ती आमूलाग्र बदलली पाहिजे.' हे वामन मल्हारांचे भाष्य अशावेळी आस्वादकाला न आठवले तर नवल! एका बलात्कारपीडित तरुणीशी लग्न करण्याचे धैर्य दाखवणारा एकही तरुण आज या समाजात आढळणार नाही. आणि आढळलाच तर केवळ दयेपोटी तो तिच्याशी विवाह करील किंवा कुठल्यातरी स्वार्थाने तो हपापलेला असेल. म्हणून लताला दोष देता येईल की तिच्या निर्णयाचे स्वागत करता येईल? या सगळ्यातच विविध प्रश्नांची भेंडोळी वाचकांपुढे टाकून ही कथा यशाचे शिखर गाठते.

परंतु, एक कथा म्हणून वाङ्मयीन समीक्षेच्या दृष्टीने ती अपयशी ठरते. 'एका झाडानं किती टकरावं?' हे शीर्षक समर्पक आहे. मात्र ही कथा केवळ घटना निवेदनाच्या पातळीवर वावरते. ती प्रश्न निर्माण करते; पण तिला उत्तर देता येत नाही. उत्तराच्या शोधात ती अंतरंगात, खोलवर जाण्याचा प्रयत्न करताना दिसत नाही, हेसुद्धा मान्य करावे लागते.

⊙⊙⊙



पडतो. मुलीचे वडील अठरा वर्षे महार पलटणीत शिपाई म्हणून सरहद्दीवर लढलेले असतात. या कथेचा अनुभव पवारांनी सामाजिक बांधिलकी म्हणून कथन केला आहे. त्यामुळे ते खूप तपशिलात जातात. समीक्षणाचे ठोकळेबाज आडाखे या कथेला लावण्यात अर्थ नाही. मुलीच्या वडिलांविषयी लिहिताना पवारांची लेखणी अतिशय वास्तवदर्शी बनते. ते म्हणतात, 'सीमेवर हा लढला असेल. कुटुंबाची वर्षानुवर्षे फारकत. पाऊसपाणी, ऊनवारा याची तमा न बाळगता खांद्यावर रायफल लटकावून — डोळ्यांत तेल घालून सीमेचे रक्षण केले असेल आणि या देशात त्याच्या संसाराचे अशा प्रकारे धिंडवडे निघावे? त्याला आपल्या घराचे रक्षण करता येऊ नये? हा का केवळ अपघात आहे? — ती केवळ स्त्री आहे म्हणून तिच्यावर बलात्कार होतोय. ती दलित आहे म्हणून काही नाही — अशी तात्त्विक राळ उडविणारे पुष्कळ भेटतात. पण खरेच का असे घडते? सत्ता, संपत्ती ही ज्यांच्यापाशी आहे, त्यांच्या मुलीबाळींवर कोण असा वाकडा डोळा ठेवणार? केवळ दुर्बल घटकांवरच असे अत्याचार होत असतात.'[२९] यातील थोडाफार संदर्भ पवारांच्या 'ब्रोकन मेन' या कवितेतही आला आहे.

या कथेत पवारांची शब्दकळा वेगळेच रूप घेते. दलितांतील गटबाजीचे राजकारण ते उघडे पाडतात. या प्रकरणासाठी आंबेडकर, सिद्धार्थ, गांधी अशा महापुरुषांच्या

नावाचा उल्लेख किंवा उपयोग केला जातो. पण शोकांतिका येथेच संपत नाही. पवार मुलीच्या आईवडिलांशी चर्चेचा प्रयत्न करतात; पण लताचे वडील मोकळेपणाने चर्चा करू शकत नाहीत. समाजाच्या रूढी, स्त्रियांच्या पातिव्रत्याचे संकेत, राजकारण्यांचं दडपण ही कारणे त्यामागे असावीत. पवार मुलीला पाहतात. बराच काळ आजारी असावी, अशा मलूल झालेल्या चेहऱ्याची ती लहानशी मुलगी — लता. हे सर्व पवारांच्या मनाला ती दारुण चटका लावून जातं.

या केसचा निकाल लवकर लागत नाही. कायद्याच्या भाषेत, सय्यद गुन्हा सिद्ध होईपर्यंत निर्दोष म्हणूनच वावरतो. सय्यदची पार्टी लता कांबळे या दलित मुलीच्या मानाने आर्थिक बाजूने प्रबळ. सय्यदसाठी मुस्लीम समाज वर्गणी गोळा करतो. सय्यद निर्दोष सुटतो. आरोप सिद्ध होऊ शकत नाही. ही या देशाच्या तोकड्या आणि भ्रष्टाचारी न्यायव्यवस्थेची शोकांतिका आहे.

पुढे लता आरोपीचीच बिबी होण्याचे मान्य करते. ती अशी का वागली, ते पवारांना कळत नाही. त्यांना त्यांचीच 'मरण' नावाची कविता आठवते.

'मागील पाणी गढूळ आलं
पुढल्या पाण्यानं किती जपावं
हां हां म्हणता वणवा आला
एका झाडानं किती टकरावं?



सणाणत गोळ्या चालून आल्या
पंखानं आभाळ किती तोलावं?
धारदार सुळ्यांच्या दरवाज्याला
हत्ती जसे चिपा होतात
तसं आपण हसत हसत मरावं.'[३०]

ही कथा वाचकांना अंतर्मुख करते. येथे अनेक सामाजिक प्रश्न उपस्थित होतात. अशा घटनांना जबाबदार कोण? समाजरचना की तोकडे कायदे? जो देशासाठी सैनिक म्हणून अठरा वर्षे सीमेवर लढला, त्याच्या नशिबी हा भोगवटा का? एखाद्या मंत्र्याच्या, अधिकाऱ्याच्या नशिबी हे का येत नाही? एवढं होऊनही सय्यद निर्दोष सुटतो. त्यावरही ताण म्हणजे लता त्याची पत्नी होण्याचं मान्य करते. पण 'का?' या प्रश्नाला उत्तर नाही. समाजव्यवस्थेजवळ किंवा न्यायव्यवस्थेजवळही या प्रश्नांची उत्तरे नाहीत. आपल्या देशात अशा असंख्य 'लता' आहेत, ज्यांच्यावर हे प्रसंग हरघडी येतात. पण त्यांचे आक्रंदन मूक आहे. हा नासलेला, किडलेला समाज त्याची दाद घेत नाही. स्वार्थाकरिता जगणारे नेतृत्व आहे, राजकारण आहे. न्याय दुबळा आहे. भावनांची कदर नाही. म्हणून लताने स्वीकारलेला मार्ग योग्य की अयोग्य? हा निर्णय घेण्यासाठी निकष लावावयाचे ते कोणते? आणि कशाच्या आधारावर? आणि असेच किती, कुठवर आणि कसे चालू द्यावयाचे? 'आपली समाजव्यवस्था सडलेली,

पाठीमागून मोटारीला धक्का मारत असतो. नायकाला हातगाडी ओढणाऱ्या आपल्या बापाची आठवण होते. भूतकाळाच्या खाचरातून किती कष्टाने आपण बाहेर पडलोय. आपला लेक पुन्हा त्या खाचरात तर लोटला जाणार नाही, अशी भीती त्याला वाटते.

परस्पर विसंगत दृश्ये पवारांच्या साहित्यात नेहमीच येतात. या विसंगतीतून गरीब—श्रीमंतांची मने ते अप्रतिमरीत्या चित्रित करतात. त्यांचा नायक परिस्थितीशी लढतो; पण तो आतल्याआत स्वत:शीही झुंज देत असतो. सुखासीन आयुष्यापेक्षा त्याची चिंता पोटाची अधिक आहे. टीचभर पोट भरून जीवनगाडा कसा रेटायचा, याच चिंतेत तो सदोदित राहतो. महिन्याच्या अखेरीस तर तो जणूकाही युद्धपातळीवर जगतो. शेवटचा आठवडा त्याला जन्मठेपेसारखा वाटतो. कडकी असली की घरात आदळआपट ठरलेली. बायको जेव्हा खर्चासाठी पैसे मागते, तेव्हा तो पैसे नसल्यामुळे पगार संपला असे सांगतो. अशा परिस्थितीला कंटाळलेली बायको म्हणते की, 'मला नेऊन बाजारात विका.' हा ओढाताणीचा संसार चालवताना मेटाकुटीस येणारी ही नायिका दया पवारांनी हुबेहूब चित्रित केली आहे. तिच्या या उत्तराने तिच्याविषयीची कणव अधिकच वाढीस लागते. नायकाला असे वाटू लागते की, आपले जीवन सार्वजनिक झाले आहे. कारण एका घरात बोललेले दुसऱ्या घरात ऐकू जाते. या कथेच्या नायकाने



## १०.१०. घुसमट

सर्वसामान्य मनुष्याचे जीवन रंगविणारी ही कथा 'घुसमट'. दलितेतर जाणिवेची ही कथा आहे. 'तो' हेच (सर्व)नाम नायकाला वापरून पवारांनी येथे तृतीयपुरुषी निवेदनपद्धती उपयोगात आणली आहे. या कथेला इतिहास आहे. 'विटाळ' या कथासंग्रहाच्या ' 'विटाळ'च्या पलीकडे' या शीर्षकाखाली लिहिलेल्या मनोगतात त्यांनी तो मांडला आहे.

ऐन आणीबाणीच्या काळात पवारांनी हीच कथा 'वीस रुपये' नावाने लिहिली. मराठीतील प्रतिष्ठित अशा 'सत्यकथा' मासिकाकडे ती पाठवली. पण या मासिकाने ती नाकारली. पवारांना कथा नाकारल्याचे दु:ख झाले नाही; पण असे कितीतरी अंकुर गर्भातच खुडले जात असतील, याचे त्यांना वाईट वाटते. पुढे हीच कथा 'राजस' मासिकात प्रकाशित झाली. ह्या कथेचे भाग्य एवढे की, ती पुढे 'धर्मयुग' या प्रसिद्ध हिंदी मासिकात छापून आली आणि हिंदीतून कानडी, तेलगूतसुद्धा गेली. याविषयी पुढे जेव्हा चर्चा झाली, तेव्हा 'सत्यकथे'च्या संपादकांनी जाहीर खुलासा केला की, 'एखादे लेखन गाजलेले असेल, त्याला नोबेल पारितोषिक जरी मिळाले, तरी ते आम्हाला आवडेलच असे नाही.' हासुद्धा एक साहित्यिक विटाळ समजावा का? असा प्रश्न पवारांना पडला.

'घुसमट' ही कथा सामान्य मनुष्याच्या जीवनाचे वास्तव आहे. ती केवळ वैयक्तिक पातळीवर किंवा दलित जीवनानुभवाच्या पातळीवर वावरत नाही, तर हातातोंडाची गाठ पडावी यासाठी धडपडणाऱ्या सर्वसामान्य माणसाची कहाणी बनते. तिच्यात रोमँटिकपणा नाही, हास्यविनोद नाही. ती वास्तवाच्या खडतर वाटेवर चालणारी कथा आहे. ती कल्पनेच्या पंखांवर भराऱ्या मारत नाही. भीषण वास्तवाच्या अंधाऱ्या सावटात ती जाणिवेच्या पातळीवर खोलवर शिरत जाते. सर्वसामान्यांच्या जीवनात ज्या ज्या समस्या येतात, त्या सोडविताना माणूस किती हतबल होतो, परिस्थितीशी झगडताना तो दुसरं सगळंच कसं विसरून जातो, याचं विदारक वर्णन दया पवारांनी केलं आहे. घासभर अन्न आणि घोटभर पाणी यासाठी तळमळणाऱ्या, भुकेने तडफडणाऱ्या व्यक्तीच पवारांच्या कथेत अधिक प्रमाणात आढळतात. त्याचेच उदाहरण म्हणजे 'घुसमट' ही कथा.

या कथेचा नायक आर्थिक ओढाताणीतून जीवनाचा प्रवास करतो आहे. रात्री त्याला नीट झोप लागत नाही. सकाळचा नाश्ता म्हणजेही काय, तर कोड फुटलेल्या चपात्या आणि भाजी. त्याच्या उपड्या झोपलेल्या सहा वर्षांच्या मुलाकडे बघून त्याने आपलेच गुण घेतल्याची जाणीव त्याला होते. दोन दिवसांपूर्वी म्युन्सिपाल्टीच्या शाळेतील सात–आठ वर्षांचं पोरगं गर्दीत चेंगरून मेल्याची बातमी त्याला आठवते आणि



तो अस्वस्थ होतो. बायको त्याला चहा देते. तिच्या नजरेतून त्याला प्रेम पाझरताना दिसते. जाताना ती त्याला आठवण करून देते की, 'आज लवकर घरी या. येताना वीस रुपये उसने आणा. रेशनचा हप्ता थकलाय.' त्यावर मोघम आश्वासन देऊन तो कामावर जातो. नोकरीवर जाणे म्हणजेही एक कसरतच. रोजचा मस्टरवरचा लाल क्रॉस वाचवण्यासाठी जिवाच्या आकांताने लोकलला लटकून तो प्रवास करतो. गरिबीगरिबीत संसार करणाऱ्या या नायकाची ससेहोलपटच होते. त्याच्या मनात कामगारांबद्दल कणव आहे. म्हणून एकदा त्याने अंडरपेमेंटचे ऑब्जेक्शन काढलेले असते. त्यासाठी त्याला साहेबांचा दमही ऐकून घ्यावा लागला असतो. तिथे तो इतर कामगारांच्या मुलांबाळांचाही विचार करतो.

बायकोने सांगितलेले वीस रुपये कोणाकडे मागावे, या विवंचनेत तो असतो. ऑफिसात जातानाच त्याला पाटील भेटतो. पाटील निरक्षर असतो; पण शहरात पिक्चर फिटिंग करण्यावर त्याला खूप पैसा मिळतो. त्याच्याकडून पाटील बँकेच्या स्लीपवर चार हजाराचा आकडा लिहून घेतो. एकीकडे आपण वीस रुपयांसाठीही या जगात महाग आहोत आणि दुसरीकडे हा निरक्षर पाटील खोऱ्याने पैसे ओढतो, याचा त्याला हेवा वाटतो.

गल्लीतलं दृश्य त्याला हादरवतं. पाटलाचा मुलगा चकचकीत मोटारीत बसला असतो आणि नायकाचा मुलगा

## ११. 'विटाळ' या कथासंग्रहाची वैशिष्ट्ये आणि कथाकार म्हणून दया पवारांचे दलित साहित्यातील योगदान

हिंदू धर्मव्यवस्थेमुळे भारतातील अस्पृश्य वर्ग हा सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक अशा सर्वच दृष्टीने पिळला गेला. त्यांचे जीवन हे कालपरवापर्यंत गुलामगिरीचे जीवन होते. त्यांचा स्पर्शसुद्धा निषिद्ध मानला गेला. जीवनाला आलेल्या अवकळेने त्यांच्या संवेदनक्षम मनाला व्यथित केले. गुलामगिरीविरुद्ध बंड करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्भीडपणे पाऊल टाकले. ते दलितांचे प्रेरणास्थान ठरले. दलित माणूस, दलित समाज 'आम्हीही माणसं आहोत' हे मत साहित्यामधून, जाहीर सभांमधून खडसावून सांगू लागला. आपल्यावर झालेला अन्याय तो शब्दांतून मांडू लागला. आंबेडकरप्रणीत समताधिष्ठित सामाजिक जाणिवेच्या पातळीवर तो लिहू लागला. दलितांच्या इतर वाङ्मयीन प्रवाहाप्रमाणेच दलित कथेचा असा उगम झाला.

'जनता', 'प्रबुद्ध भारत' या साप्ताहिकांतून सामाजिक जाणिवेच्या अनेक कथा आल्या. नवी वाट, बैत्याचा बैल, बंदा गुलाम, महार जल्माची चित्तरकथा, विखारी भाकर, सारं आभाळ फाटलंय, आम्हीही माणसं आहोत, देव झोपला आहे इत्यादी अनेक कथा जीवनानुभव सांगू लागल्या.



सर्वच खर्चात काटकसर केली आहे. एका दुधाच्या बाटलीऐवजी तो अर्धीच बाटली आणतो. सिनेमाची तहान तो टी.व्ही.वर भागवतो. दुपारचा चहा पिणे त्याने सोडले आहे. पेपर विकत घेणे बंद केले आहे. एवढे करूनही त्याला संसाराचा गाडा ओढणे कठीण जात आहे. स्वतःच्या मुलाचा 'एक तारीख कधी उजाडते?' हा प्रश्न त्याला अंधःकाराच्या खोल गर्तेत नेऊन सोडतो.

त्याला त्याच्या धराडे नावाच्या बालमित्राचा फोन येतो. आदिवासींमध्ये काम करता करता आलेल्या संधीचा फायदा उचलून तो आपले नशीब उजळवतो. धराडेनी तत्त्वे सोडली; पण पवारांच्या या कथेचा नायक तत्त्वे सोडायला तयार नाही. धराडे त्याच्यापुढे वेगळेच जग उभे करतो. त्याला पार्टीत नेतो. नायकाला ही नवी दुनिया हादरवून टाकते. अनोळखी वाटते. पार्टीतल्या जगाशी तो समरस होऊ शकत नाही. तिथल्या बिझिनेस गप्पा त्याला कंटाळवाण्या वाटतात. तो खातो जादा पण पितो कमी. तरी त्याला नशा चढते. समुद्राच्या गार वाऱ्यानं त्याचं मन रोमांचित होतं. सारं शहर दिव्याच्या प्रकाशात झगमगत असतं. तो डोळे चोळतो. 'बापरे! किती खोल! साला येथून मरण फार झकास येईल नाही?' ('विटाळ' पृ. ९३) असा विचार त्याच्या मनात येतो.

पार्टी संपते व तिथलं मायावी जीवनही संपतं. तो स्टेशनच्या दिशेने चालू लागतो. बायकोचं काळंसावळं शरीर

त्याच्या डोळ्यांपुढे सारखं लवलवू लागतं. दोन महिन्यांपासून त्याने बायकोशी सहवास केलेला नसतो. शेवटच्या लोकलने तो घरी पोचतो. धुंदीतच तो अंधारात कपडे बदलतो. बायकोकडे पाहतो. तिच्या पांघरुणात घुसतो. गाढ झोपलेली बायको त्याच्या स्पर्शाने जागी होते. दहा वर्षांच्या परिचयाचा स्पर्श ती सहज ओळखते. त्याच्या गळ्यात हात टाकत ती कुजबुजते,

'वीस रुपये आणलेत?'

हा या कथेचा परमोच्च बिंदू आहे. पवारांनी ही कथा अतिशय समर्पकपणे चढत्या श्रेणीने नेली आहे. मग तिचा तो प्रश्न त्याला एखाद्या धंदेवाईक बाईने विचारावा, असा वाटतो. त्याची सारी गात्रे बर्फासारखी थंडगार पडतात. शरीराचे मुटकुळे करून तो बाजूला जाऊन झोपतो. गर्भाशयात मूल झोपावं, तसा तो दिसत असतो. ('विटाळ' पृ. ९४)

कथा इथे संपते; पण वाचकांच्या मनात मात्र विचारांची शृंखला निर्माण करते. सामान्यातल्या सामान्य माणसाच्या जीवनाचं हे यथार्थ चित्रण आहे. आयुष्याच्या गुंतागुंतीत माणसाच्या हाती काहीच शिल्लक राहत नाही. पण त्याचा जगण्याचा शोध मात्र सुरूच राहतो. अभिलाषा मरत नाही. पती—पत्नी, तत्त्व हे सगळे या कथेत योग्य आहेत. पण वास्तव यापेक्षाही भीषण आहे. मनुष्य जगत असतो, तेव्हा त्याला ज्ञात असते, ते फक्त जगणे. या कथेचा नायक सामान्य असूनही तो सत्याचा विपर्यास करीत नाही.



या कथेत वीस रुपये मागणारी पत्नी, ओढगस्तीचा संसार चालवणारा नायक हे दोघेही पाटील आणि धराडेच्या पार्श्वभूमीवर कमालीचे केविलवाणे वाटतात. त्यांची धडपड त्यांना शून्यच मिळवून देते आहे, असे वाटू लागते आणि शेवटी वीस रुपये मागणारी पत्नी देहविक्रय करणाऱ्या बाजारबसवीसारखी वाटते, ही घटनाच कथेला उच्च पातळीवर नेऊन ठेवते. वेश्या ही मोबदला म्हणून पैसे मागते, तो शुद्ध व्यवहार; तर त्याची पत्नीदेखील पैसे मागते, ती संसाराचा गाडा ओढण्यासाठी. त्याला मोबदला म्हणायचे का? जीवन जगण्याची प्रेरणा मात्र दोघींचीही एकच असते, हे सतत जाणवतं.

दलित कथा ही आत्मशोधाची कथा असते. अभावग्रस्त समाजात जन्माला आलेला नायक कुठेतरी व्यक्त होण्याची धडपड करतो. पण या कथेचा नायक सर्वस्वी अपरिचित आहे. दलित लेखक स्वानुभव सामाजिक पातळीवर नेऊन ठेवतात. सच्च्या, प्रामाणिक अनुभवाचे प्रकटीकरण योग्य तऱ्हेने झाले, तर तो अनुभव वाचकांच्या मनाला स्पर्शून जातो. म्हणूनच 'घुसमट'चा नायक आपल्याला जवळचा वाटतो. कधीकधी वाचक आपले प्रतिबिंब त्या नायकात शोधतो. एकंदरीत ही एक दलितेतर कथा असून दया पवारांनी तिला लेखणीच्या विलक्षण सामर्थ्याने घडविले आहे, हे मात्र खरे!

⊙⊙⊙

## ११.१. पवारांच्या कथेवरील आरोप

दया पवारांच्या कथेवर समीक्षकांकडून, अभ्यासकांकडून, साहित्यिकांकडून जे आरोप केले गेले, ते असे :

### ११.१.१. पात्रांची संख्या कमी

पवारांच्या कथेत मोजकीच पात्रे असतात. त्यांची सर्वच कथानके अतिशय कमी पात्रांना घेऊन सामोरी येतात. परंतु, पात्रे कमी असल्याने कथेचे महत्त्व किंवा वाङ्मयीन सौंदर्य कमी होत नाही. मोजकी पात्रे, मोजके कथानक पण विस्तृत आशय हा त्यांचा गुणच म्हणायला हवा.

### ११.१.२. सरळसोट निवेदन

अनेक कथांमध्ये दया पवार सरळ सरळ निवेदन करतात, हे खरे आहे. ना.सी. फडके यांच्याप्रमाणे गाठ–निरगाठ–उकल अशी पद्धत पवार वापरत नाहीत. खांडेकरांचा जीवनवादही ते सांगत नाहीत. पण निवेदनाची भाषा जबरदस्त वापरतात. ते शब्द वाचकांच्या हृदयाचा ठाव घेतात. उदा. 'विटाळ' कथेत आईच्या मासिक पाळीमुळे घडलेला तो भीषण प्रसंग आहे, हे कळताच त्यांचे शब्द वेगळेच रूप धारण करतात. ते म्हणतात, 'अंगावर तेजाब ओतल्यासारखा देहाचा दाह होतो. भूकंप व्हावा आणि आम्हा



भारतातील खेड्यापाड्यांतून व शहरी झोपडपट्ट्यांतून राहणाऱ्या दलित मनाच्या व्यथा–वेदना उमटू लागल्या. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, शिळ्या भाकरीच्या तुकड्यांवरचे जीवन, वंशपरंपरेने आणि अन्याय्य अशा रूढीपरंपरांनी उत्पादनाच्या साधनांपासून, धर्मकार्यांपासून वंचित होण्याचे दारुण दुर्भाग्य हेच त्याचे संचित! त्याने कुठलाही सण करू नये, दागिने घालू नये, जमीनदारापुढून चप्पल, जोडे घालून जाऊ नये, संस्कृत ऐकू नये अशा कितीतरी जाचक नियमांमुळे, तत्कालीन धर्माच्या थोतांडामुळे तो सर्वार्थाने गुलामच राहिला. या गुलामीचे वर्णन, त्याविरुद्ध बंड आणि अधिकारांसाठी दलित चळवळ लेखणीच्या साह्याने कागदावर उतरवली गेली आणि सवर्णांना, दलितेतरांना दलितांच्या दु:खाची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला गेला.

दलित कथा बाबुराव बागूल, अण्णाभाऊ साठे, केशव मेश्राम, बंधुमाधव, अमिताभ, योगीराज वाघमारे, वामन होवाळ, दया पवार, अर्जुन डांगळे यांच्या खांद्यावर उभी आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेने जो घात चौथ्या वर्णाचा केला, तो घात लेखणीच्या सहाय्याने प्रकट करण्याचे कार्य या लेखकांनी केले. शिडी नसलेल्या या चारमजली चिरेबंदी उन्मत्त गढीने गावकुसाबाहेरचा माणूस पायाखाली तुडवला. दलित कथा ही त्याचा हुंकार आहे. पण पवारांची लेखणी ही कथेपेक्षा आत्मकथनात आणि काव्यात अधिक यशस्वी झाली. तसा पवारांचा मूळ पिंड

कवीचा. अगदी मोजक्या कथा पवारांनी लिहिल्या आहेत. पण एक कथाकार म्हणून पवारांची उपेक्षाच झाली आहे. स्वत: दया पवार लिहितात, ' 'कथाकार' म्हणून मला मराठीत कुणीच ओळखत नाही. 'कोंडवाडा' आणि 'बलुतं'च्या बोलबाल्यामुळे माझ्या कथांना अंग चोरून बसावे लागले. आजवर दलित कथेवर वेळोवेळी समीक्षकांकडून जे बरेवाईट लिहिले गेले अथवा मराठी–हिंदीत दलित कथेच्या ज्या अँथॉलॉजी निघाल्या, त्यात माझ्या नावाचा अगर कथेचा अंतर्भाव झाला नाही. सावत्र मुलाला जसा दुरावा वाट्याला येतो, तसे थोडेफार माझ्या कथेच्या संदर्भात झाले. हा 'विटाळा'चा भोगवटा भोगत असताना माझ्याच मनात काही प्रश्न डोकावतात. एक तर, आपणांस कथा लिहिता येत नसावी; अगर आजवर जिला दलित कथा म्हणून संबोधली जाते, त्या पठडीत ही कथा बसत नसावी, असा काहीसा संभ्रम माझ्या मनात आजही ठसठसत असतो.'[३१]

खरंतर बहुतेक दलित लेखकांनी त्यांच्या कथांतून दलित जीवनाचंच चित्रण केलं आहे. पण पवारांनी मात्र दलित जीवनाबरोबरच, दलितेतर जीवनाचंही चित्रण केलं आहे. पवार केवळ दलित जाणिवेतून विचार करीत नाहीत, तर सामाजिक पातळीवर स्वत:ला स्थितप्रज्ञाप्रमाणे ठेवून विचार करतात. त्यांची चिंतनशीलता आणि तटस्थवृत्ती खऱ्याला खरे व खोट्याला खोटे म्हणणारी आहे. स्वत:चे, स्वत:च्या



समाजाचे दुर्गुण किंवा अन्य गोष्टी ते लपवून ठेवत नाही. सरळपणे उघड करतात. दलित चळवळीची शोकांतिका, गटबाजी, स्वार्थी नेतृत्व यांवर ते कडाडून हल्ला करतात आणि म्हणूनच त्यांच्याच समाजाने त्यांना 'दलित ब्राम्हण' म्हटले, 'पांढरपेशा'सुद्धा म्हटले. अनेकदा त्यांची कथा निवेदनाच्या पातळीवर वावरते, म्हणून तिच्यात वाङ्मयीन गुण नाहीत असा आरोप केला गेला. ते स्वत:चेच अनुभव कथेत मांडतात, म्हणून तिला कथा न म्हणता आत्मकथन म्हणावे, असेही म्हटले गेले. पण पवारांनी कुठल्याही टीकेची, आक्षेपांची तमा केली नाही. मोजक्याच कथा लिहिल्या; पण वाचकांच्या हृदयाला स्पर्श करणाऱ्या लिहिल्या, खोलवर कळ उमटवणाऱ्या लिहिल्या, हे विसरून चालत नाही.

⊙⊙⊙

जे भोग वाट्याला आले, त्यामुळे विद्रोहाचे भीषण रूप त्यांना कधी साकारताच आले नसावे. त्यांनी 'बलुत्या'त मान्यच केले आहे, त्यांचे दुभंगलेपण त्यांनी स्वत: सांगितले आहे. म्हणूनच प्रखर विद्रोहाचा अभाव आढळतो. असे असले तरी 'वधस्तंभ'सारख्या कथेत सदा कांबळेसारखा विद्रोही तरुण ते सहजतेने रेखाटतात, हे विसरता येत नाही.

खरेतर दया पवारांची भूमिका सामंजस्याची असल्यामुळे हा आरोप विद्रोही लेखकांनी करणे साहजिक आहे.

## ११.१.८. वर्तमानकालीन भाषाप्रयोग

वाङ्मयीन निकषांच्या कसोटीवर पवारांचा हा दोष मान्य करावा लागतो. त्यांच्या कथाच नाही, तर लेख आणि 'बलुतं'सारखं आत्मकथनही अनेक ठिकाणी वर्तमानकालीन भाषाप्रयोगांनी साकारल्या गेलं आहे. कथा म्हटली की, ती भूतकाळी रूपे वापरून किंवा ज्या काळात ती घडली असेल, त्या व्याकरणशुद्ध काळातच कथन केली जाते. पण पवार बहुतेक कथा वर्तमानकालीन रूपे वापरूनच सांगतात.

पवार बहुतेक क्रियापदांची वर्तमानकालीन रूपेच स्वीकारतात, त्यालाही कारण आहे. प्रत्यक्ष पाहिलेले, भोगलेले, अनुभवलेले प्रसंग चित्रित करताना अभावितपणे दलित लेखक वर्तमानात वावरतो व तसेच कथानक त्याच्या लेखणीतून उतरते. आजही दलित जीवनाचा हा भोगवटा संपुष्टात आला



मायलेकरांना धरणीनं पोटात घ्यावं असं वाटतं. आपण या देशात का बरं जन्माला आलो? त्यापेक्षा बर्फाळ अशा टुंड्रा प्रदेशात का नाही जन्मलो? तिथं 'विटाळ' नसेल.... सारी रात्र वर्मी घाव लागलेल्या पाखरासारखे आपण तळमळत असतो.'[३२]

## ११.१.३. पांढरपेशी लेखन

पवारांवर लावण्यात येणारा हा आरोप नाण्याची एकच बाजू दर्शवतो. पवारांनी ज्या कथा लिहिल्या, त्यात सुरुवातीला काही रोमँटिक कथा होत्या. पण 'पंख' या कथेपासून त्यांना अभिप्रेत असलेली दलित जाणीव व्यक्त होऊ लागली. तरी त्यांनी कथांतून केवळ दलित जीवनच साकारले नाही, तर दलितेतर जीवनाचे, दारिद्र्याचे, अन्याय–अत्याचाराचे जीवन रंगवले. पण ते कधीही श्रीमंत, सुखवस्तू, अय्याश अशांचे नव्हते. तळागाळातील लोकांच्या जीवनाला रंगविण्यातच त्यांची लेखणी रमली आहे.

## ११.१.४. पुनरावृत्ती

पुनरावृत्तीचा दोष दया पवारांच्या लिखाणात आहे. अनेकदा पवार एखाद्या सत्य घटनेने भारावून जातात. ती लोकविलक्षण घटना त्यांच्या अखंड चिंतनातून एका वास्तव

साहित्यकृतीचे रूप घेऊन जन्माला येते. परंतु ते त्या घटनेला वारंवार कथन करण्याचा मोह टाळू शकत नाहीत. कारण ती घटना त्यांच्या कवितेतही येते, कथेतही येते, आत्मकथनातही येते आणि लेखातही येते.

'पासंग', 'चावडी' किंवा 'जागल्या'मधील लेखात येणारी एखादी घटना त्यांच्या 'बलुतं' या आत्मकथनातही असतेच, कारण ती घटना त्यांनी प्रत्यक्ष अनुभवलेली असते. तीच घटना त्यांच्या 'विटाळ'मध्येही पात्रनाम बदलून येते आणि अनेकदा त्याचेच काव्यरूप त्यांच्या 'कोंडवाडा' किंवा 'पाणी कुठंवर आलं ग बाई' यामधून प्रकटलेले असते. दया पवारांचे समग्र वाङ्मय वाचणाऱ्यांना ही पुनरावृत्ती सहज जाणवते. कदाचित त्या पुनरावृत्तीचे कारण ती त्यांची आवडती प्रतिमा किंवा काळजावर कोरलेली, जखम केलेली घटना असू शकते किंवा त्यांचा स्वभावच मुळात चिंतनशील असल्याने हा दोष येत असावा. उदा. 'आपण सीमेवर कुणासाठी लढलो' या 'ब्रोकन मेन' कवितेतील पवारांच्या ओळी त्यांच्या विविध साहित्यप्रकारात आढळतात.

## ११.१.५. अकारण शेरेबाजी

कधीकधी निवेदनाच्या ओघात पवार अकारण शेरेबाजी करून कथेचा प्रवाह खंडित करतात व त्यामुळे कथेचे वाङ्मयीन मूल्य घसरते. उदा. 'घुसमट' या चांगल्या कथाबीजातसुद्धा



पवार अकारण शेरेबाजी करतात. कदाचित पवारांची अनुभव मांडण्याची पद्धत याला कारणीभूत असावी. म्हणूनच वेश्यावस्तीचा अनुभव नामदेव ढसाळ जेवढ्या प्रखरतेने मांडतील तेवढ्या जळजळीतपणे पवार मांडतीलच असे नाही.

खरंतर साहित्यकृतीत लेखकाने लुडबूड करू नये, असे म्हणतात. पण पवार काही ठिकाणी त्या संदर्भातले आपले विचार विस्ताराने मांडतात, एवढे मात्र खरे! अनेकदा ती शेरेबाजी संयुक्तिकही असते.

## ११.१.६. कथानक कमी, व्यक्तिचित्रणे अधिक

सर्वच कथांच्या बाबतीत नाही, पण काही कथांमध्ये पवार कथा सांगण्यापेक्षा व्यक्तिचित्रणावर अधिक भर देतात. उदा. 'फिडेल' आणि 'आमदार' या कथांमध्ये हा दोष आलेला आहे. स्वानुभवाचे चित्रण करताना असे होणे स्वाभाविक असते, हे येथे लक्षात घेतले पाहिजे.

## ११.१.७. भडक विद्रोहाचा अभाव

दलित साहित्य विद्रोही असते. पण पवारांच्या कथा भडकपणे विद्रोह व्यक्त करीत नाहीत. त्यांचा विरोध गुळगुळीत आहे. त्यांचे नायक त्वेषाने पेटून उठत नाही. ते शांत, संयमी अधिक आहेत. कदाचित पवारांच्या जीवनात सुरुवातीपासूनच

चित्रित केले आहे. पवार शोषितांचे चित्रण तर करतातच, पण त्यांच्यावर झालेल्या अन्याय–अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवण्याचाही सतत प्रयत्न करतात.

## ११.२.४. आंबेडकरी तत्त्वज्ञानावर निष्ठा

'दलित कथेने आंबेडकरी तत्त्वज्ञानावर निष्ठा ठेवली आहे. अन्यायाचा प्रतिकार करण्याची धडपड, ईश्वरी सत्तेला आव्हान देण्याची क्षमता असलेली बुद्धी आणि विवेकाच्या आधारावर विज्ञानावर निष्ठा ठेवणारी, मानवतेची पूजा करणारी ही कथा आहे.'[३५] पवारांच्या कथेत ईश्वरी सत्तेला नकार आहे. मानवतेची मूल्ये जोपासण्याचा प्रयत्न आहे. विज्ञानावर त्यांची निष्ठा आहे. बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान त्यांच्या लेखणीतून उतरले आहे.

'भूक' कथेत जेव्हा नायक दुष्काळग्रस्तांना जेवण देण्याचे आश्वासन देतो, तेव्हा म्हाताऱ्या बाया आकाशाकडे बघत 'भगवान तेरा भला करे' असे म्हणतात. साऱ्या गोष्टी भगवानावर सोपवून स्वस्थ बसणाऱ्या भारतीय परंपरेची त्याला विलक्षण चीड येते. असे अनेक प्रसंग पवारांच्या कथेत ठायीठायी आढळतात.



नाही, असेही त्यांना सूचित करावयाचे असावे.

दया पवारांप्रमाणेच अन्य काही दलित लेखकांनीही त्यांच्या विविध साहित्य प्रकारांमध्ये वर्तमानकालीन भाषाप्रयोग केले आहेत. त्यालाही उपरोक्त कारणच लागू पडते.

⊙⊙⊙

## ११.२. पवारांच्या कथेची वैशिष्ट्ये

## ११.२.१. सामाजिक बांधिलकी

'दलित कथा 'स्व'मुक्त असते. म्हणून तीत व्यक्त होणारा अनुभव समाजाचे प्रातिनिधिक रूप धारण करतो. दलित कथा सामाजिक अस्तित्वाशिवाय उभी राहू शकत नाही. त्यामुळे समाजव्यवस्थेशी तिचा अटळ संबंध असतो.'[३३] पवार हे सामाजिक बांधिलकी मानणारे लेखक आहेत. त्यामुळे त्यांची कथा व्यक्तिगत पातळीबरोबरच सामाजिक पातळीवरही घडताना दिसून येते. दया पवारांची कथानके पारंपरिक कथानकांचाच घाट लेवून जरी येत असली तरी समाजजीवनात मानवी मूल्यांचा होत असलेला ऱ्हास आणि सामाजिक दृष्टीने अस्वस्थ करून जाणारे हे सर्वश्रेष्ठ मूल्य मानणाऱ्या विचारांची बांधिलकी त्यांच्या कथानकांमध्ये सापडते. मूल्यभाव व्यक्त करणाऱ्या कथाही 'विटाळ'मध्ये आढळतात. रूढ अर्थाने ही

सामाजिक कथानके आहेत. सामाजिक बांधिलकीपासून त्यांची कथा केव्हाच दूर जात नाही.

## ११.२.२. मानवकेंद्रितता आणि समाजव्यवस्थेविरुद्ध विद्रोहाचा सूर

'दलित कथा ही माणसाला केंद्र करते आणि त्याला समान न्याय व प्रतिष्ठेचे मूल्य प्राप्त व्हावे, हे ध्येय प्रस्तुत करते. या मानवी मूलभूत हक्कासाठी आणि न्यायासाठी ती तडजोड करीत नाही, तर त्यासाठी बंडाची भाषा करते. क्रांतीची प्रेरणा देते.'[३४]

पवारांच्या कथा या मानवकेंद्री आहेत. 'माणूस' या शब्दाचा परिपूर्ण अर्थ त्या प्रकट करतात. माणसाने माणसाला माणूस म्हणून जगू द्यावे, यासाठी त्यांची धडपड असते. पवारांची कथानके ही सर्वसामान्य माणसांची कथानके आहेत. त्यांनी सर्वसामान्य नायक चित्रित केला. तो नायक या समाजव्यवस्थेतील फार मोठी व्यक्ती नसेलही; पण त्याने निर्माण केलेले प्रश्न महत्त्वाचे आहेत. तरी या मानवकेंद्री कथांमधून प्रकटणारा त्यांचा विद्रोह बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ, योगीराज वाघमारे यांच्यासारखा जळजळीत, प्रखर नाही. त्यांच्या कथेतील विद्रोह हा सुजाण आणि समंजस व्यक्तिमत्त्वाचा विद्रोह आहे. आयुष्यभर आपल्याला कराव्या लागणाऱ्या संघर्षाचे भान ठेवून केलेला असा हा विद्रोह



आहे. मात्र विरोधासाठी विरोध किंवा आक्रस्ताळेपणापासून पवारांची कथा अलिप्त आहे, हे त्यांचे अध्ययन करताना सहज लक्षात येते.

## ११.२.३. शोषितांचे यथार्थ चित्रण

दलित कथा ही शोषित समाजाची कथा आहे. परंतु पवारांना अभिप्रेत असलेला 'शोषित' म्हणजे केवळ एका ठरावीक जातीत जन्माला आलेली व्यक्ती नाही, तर उच्चवर्णीयांनी शतकानुशतके ज्यांच्यावर अन्याय केला ते दलित, श्रीमंतांनी ज्यांना पायदळी तुडवले ते गरीब, जमीनदारांनी ज्यांना पिळले ते मजूर, स्वार्थी राजकारण्यांनी ज्या उमलत्या, उभरत्या नेतृत्वाच्या अंकुरांना उमलण्यापूर्वीच खुडले ते कार्यकर्ते, अन्यायग्रस्त, पीडित, अत्याचारित अशा सर्व शोषितांची चित्रणे करून त्यांनी 'शोषित' या शब्दाचा व्यापक अर्थ प्रकट केला आहे.

'भूक'मधील दुष्काळग्रस्त निर्वासित, 'आमदार'मधील धूर्त राजकारण्यांना बळी पडलेला आमदार, 'वधस्तंभ'मधील पराभूत झालेला सळसळत्या रक्ताचा तरुण कार्यकर्ता सदा कांबळे किंवा 'एका झाडानं किती टकरावं?'मधील बलात्कारपीडित लता, ही सगळीच पात्रे शोषित आहेत. आपल्याच लोकांनी केलेल्या अन्यायाचाही प्रतिकार करू न शकणाऱ्या, पराभूत होणाऱ्या पात्रांनाही पवारांनी यथार्थपणे

समाजाकडून होणाऱ्या उपेक्षेची चिंता आहे. अन्याय–अत्याचाराला सतत बळी पडणाऱ्या या नायकांच्या चिंतांना मर्यादाच नाहीत आणि म्हणून ते सतत संघर्षाच्या पातळीवर जगतात.

'घुसमट'सारख्या कथेतील टीचभर पोटासाठीचा संघर्ष काय किंवा 'वधस्तंभ' या कथेमधील सदा कांबळेचा कामगारांसाठी व अस्मितेसाठी चाललेला संघर्ष काय, पवारांच्या कथेत संघर्षाशिवाय जीवन नाही. किंबहुना एकंदर दलित जीवनच संघर्षमय असतं. मग पवार तरी कसे अपवाद राहतील? त्यांच्या कथेतील नायकच नाही, तर सर्वच पात्रे संघर्ष करीतच जगतात. पण कधीकधी सुज्ञपणे परिस्थितीसमोर ते माघारही घेताना दिसतात. 'आमदार' जेव्हा वास्तवतेचा स्वीकार करून जीवनमूल्येच बदलवून टाकतो, तेव्हा त्याने माघार घेतली असेच प्रतिपादित होते; पण त्याचा स्वत:शीच चाललेला अंतर्गत संघर्ष मात्र संपलेला नसतो.



### ११.२.५. वास्तवदर्शन

दलित साहित्य हे मुख्यत्वेकरून दलितेतरांनी वाचावे, यासाठी अवतरते. ज्या दलित जीवनाच्या वास्तवापासून दलितेतर समाज अनभिज्ञ होता, ते भीषण वास्तव दलित कथा प्रकट करते. रा.ग. जाधव म्हणतात, 'दलित कथा ही दलित वास्तवाचे सर्वांगीण भान राखून वाटचाल करीत आहे. या वास्तवाचा एक भाग जुन्या पिढ्यांच्या अनुभवांशी निगडित आहे. त्याचप्रमाणे कथालेखकांच्या बाळपणीच्या अनुभवांशी तो जखडलेला आहे. या दोन्ही प्रकारच्या वास्तवात लेखकाची स्वत:ची मानसिक गुंतवणूक आहे. या गुंतवणुकीतून आवश्यक ते ताटस्थ्य साधण्यासाठी लेखकाची धडपड चालू आहे.'[३६] 'विटाळ'मध्ये आलेल्या बहुतेक कथा या पवारांच्या जीवनात घडून गेलेल्या घटना आहेत. 'बलुतं' या त्यांच्या आत्मकथनात त्यातील बरेच प्रसंग आढळतात. कथेत ते सत्यपरिस्थितीचे वर्णन करतात, वास्तवाचे दर्शन घडवितात; मग ते वास्तव कितीही भीषण असो किंवा किळसवाणे असो, त्यांची लेखणी आखडत नाही. 'विटाळ' ही कथाच याबाबतचे एक बोलके उदाहरण आहे.

जीवनाच्या केवळ वैयक्तिक घटनांवर पवारांचे वास्तवदर्शन स्थिर राहत नाही, तर 'एका झाडानं किती टकरावं?' यासारख्या कथांमधून ते समाजातील विविधांगी घटनांचेही वास्तवचित्रण करतात. जीवनवास्तवातील सत्यदर्शन

ते लढ्याच्या भाषेतही मांडतात. क्वचित त्यात अभिनिवेशी भाव आढळत असला, तरी त्यात असत्याचा लवलेश नसतो, हेही लक्षात घेतले पाहिजे.

## ११.२.६. आत्मकथनात्मक शैली

पवारांचे अनुभव जेव्हा कथेतून उमटतात, तेव्हा त्यांना आत्मकथनाचे स्वरूप लाभते. रा.ग. जाधव म्हणतात, 'पुष्कळदा दलित कथा ही आत्मकथनाच्या रूपाने अवतरते, त्याचे कारण वास्तवाच्या प्रकटनाला आत्मकथनातून अधिक आत्मविश्वास लाभतो.'[३७]

पवारांच्या पुनरावृत्तीच्या दोषांचे विश्लेषण करतानाच हे स्पष्ट केले आहे की, त्यांच्या जीवनातील अनुभवांनाच त्यांनी महत्त्व दिले आहे. त्यांची जीवनानुभूती कथारूपानेही प्रकटते. म्हणून बरेचदा त्यांच्या कथांना आत्मकथनाचे स्वरूप प्राप्त होते. 'विटाळ'मधील कथा म्हणजे पवारांचे वास्तवजीवनातील अनुभवच असल्याने त्यांची शैली आत्मकथनात्मक स्वरूपाची भासते; पण त्यामुळे त्या कथांचे वाङ्मयीन मूल्य जरासेही कमी होत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे.



## ११.२.७. आत्मशोधाचा प्रयत्न

'दलित कथा ही आत्मशोध करणारी कथा आहे. म्हणून ती इतिहास जाणून घेते आणि वर्तमानाचे भान राखते.'[३८] पवारांच्या कथेतही आत्मशोध असतो. जवळ जवळ सगळ्याच कथांच्या केंद्रस्थानी ते आहेत. तरी पूर्वीच्या घटना आणि वर्तमानस्थिती यांचा समन्वय साधून किंवा त्यांचे पूर्ण भान ठेवून ते कथा लिहितात. त्यांची निवेदनशैली तृतीयपुरुषी आहे.

एकंदरीत दलित साहित्य हाच दलित जीवनाचा आरसा असल्यामुळे दलित कथा ही आत्मशोधाची कथा असणे स्वाभाविक आहे. म्हणूनच दलितेतरांवर अन्याय–अत्याचारासंबंधी नुसते आरोप करण्याऐवजी पवार दलितांनाही आत्मपरीक्षण करण्याचे सुचवितात.

## ११.२.८. संघर्षाचे सातत्य

दलितांचे जीवनच सतत संघर्षमय असल्यामुळे पवारांच्या कथेचे नायकही सतत संघर्ष करीत असतात. वेगवेगळ्या कारणांसाठी ते संघर्ष करतात. त्यांचे नायक परिस्थितीविरुद्ध झुंज देतात. पण त्याच वेळी त्यांचा स्वत:शीही झगडा सुरू असतो. त्यांची चिंता पोटाची, आदिम चिंता आहे. संसाराचा गाडा कसा रेटायचा, ही चिंता आहे.

## ११.४. एक कथाकार म्हणून पवारांचे दलित साहित्यातील योगदान

एक कथाकार म्हणून दया पवारांच्या नावाचा विचार करताना जाणवते की, त्यांचे कथाक्षेत्रातील योगदान हे अनन्यसाधारण नसले तरी कितीतरी दलित लेखकांच्या तुलनेने श्रेष्ठ असे आहे.

दलित कथेचे शिल्पकार म्हणून अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल यांची नावे घेतली जातात. भालचंद्र फडके यांच्या मते, 'योगीराज वाघमारे, भीमराव शिरवाळे, पुंडलिक धोंगडे, योगेन्द्र मेश्राम, अशोक लोखंडे, अर्जुन डांगळे, दया पवार, माधव कोंडविलकर इत्यादी कथालेखकांची पिढी प्रामुख्याने साठे, खरात, बागूलप्रणीत कथेचेच अनुकरण करीत आहे.'[३९] या आरोपात पवारांचे नावही गोवले गेले आहे. पवार खरंच साठे, खरात आणि बागुलांच्या कथेचे अनुकरण करतात का?

अण्णाभाऊ साठे यांचे 'खुळंवाडी', 'बरबाद्या कंजारी', 'आबी', 'भानामती', 'लाडो', 'फरारी', 'गजाआड' इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. १९४९ पासून त्यांच्या कथालेखनास प्रारंभ झालेला आहे. त्यांची कथा काहीशी पारंपरिक, जुन्या वळणाची आहे. एकापुढे एक घटना ते मांडतात व त्यातून एकात्म परिणाम साधतात. एखादी व्यक्ती त्यांचे केंद्र असते,



## ११.३. पवारांच्या कथेतील वाङ्मयीन वैशिष्ट्ये

पवारांच्या कथेतील वाङ्मयीन वैशिष्ट्यांचा विचार करताना त्यांची भाषाशैली, निवेदनशैली, कथानक, संवाद, व्याकरणिक रूपे यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो.

पवारांची स्वत:ची वेगळेपण दर्शविणारी अशी भाषा आहे. पण तिची खास अशा प्रकारची 'स्टाईल' नाही. ती साधीच आहे. पवार मनमोकळेपणाने, कसलाही आडपडदा न ठेवता कथा लिहितात. त्यांची भाषा प्रमाणभाषाच आहे; परंतु वैय्याकरणी रूपे वापरताना ते सामान्यपणे वर्तमानकालाचाच उपयोग करतात. वास्तविक सर्वसाधारणपणे कथा ही ज्या काळात घडली असेल, त्या व्याकरणशुद्ध काळातच कथन केली जाते. पण पवार बहुतेक क्रियापदांची वर्तमानकालीन रूपेच स्वीकारतात. त्यांच्या कथांमध्येच नव्हे, तर इतरही वाङ्मयप्रकारात त्यांची ही लकब दिसून येते.

पवारांची निवेदनशैली ही तृतीयपुरुषी आहे. काही कथा सरळसोटपणे सांगितल्या आहेत. काही संवादांच्या सहाय्याने पुढे नेलेल्या आहेत. बहुतेक कथांच्या केंद्रस्थानी ते आहेत; पण पात्रांचा नामोल्लेख मात्र ते वेगळा करतात. पवारांची भाषा परिस्थितीचे चित्रण अत्यंत संयमाने करते. त्यांच्या भाषेत बंडखोरी नाही, विद्रोह नाही; पण विरोध आहे, वेदना आहे.

बरेचदा पवार तपशिलाचा भरणा गरजेपेक्षा अधिक

करतात. कधीकधी कथानकाला अवास्तव अशा स्वरूपाची ओळही पवार लिहून जातात. 'विटाळ'सारख्या कथेतही पवारांनी तपशिलाचा भरणा फार अधिक प्रमाणात केला आहे. अनावश्यक तपशील पवारांनी टाळले असते, तर कथा आणखी बांधेसूद झाली असती. पण दलित कथा वाचकांना रिझवण्यासाठी लिहिल्या जात नाहीत, तर दलित जीवनाच्या भीषण सत्याचे दर्शन घडविण्याचे कार्य त्या करीत असतात, हे विसरता येत नाही.

पवारांच्या कथेत संवाद पुष्कळ असतात. त्या संवादांनी कथा जरी पुढे जात असली तरी त्या संवादांनंतर मध्येच एखादा परिच्छेद येतो, त्यावेळी त्यांच्या कथेला गोठलेपणा येतो. यतिभंग झाल्यासारखा भास होतो. उदा. 'फिडेल' ही कथा. तरीदेखील त्यांचे संवाद भारदस्त वाटतात, वाचकांच्या चिंतनशीलतेला प्रवृत्त करतात. उदा. 'घुसमट'मधील शेवटचा नायकाच्या पत्नीचा संवाद – 'वीस रुपये आणलेत?' हा सर्वावर ताण करणारा ठरतो. पवारांची भाषाशैली, निवेदनशैली अप्रतिम आहे. वानगीदाखल खाली काही नमुने दिले आहेत.

१. पिंजऱ्यात कोंडून ठेवलेली जनावरे मांसखंडाची वाट पाहात असावीत, असा भास वामनला होतो. ('पंख', 'विटाळ' पृ. २१)

२. प्रकाशाच्या झोतात फुटपाथवर झोपलेल्या माणसांची रांग त्याला शवागारातील प्रेतासारखी थंड वाटते. ('भूक', 'विटाळ' पृ. ११)

३. भोवतालचा काळोख अजगरासारखा गिळीत असतो. ('साहेब, दिदी आणि गुलाम', 'विटाळ' पृ. ४९)

४. अंगावर तेजाब ओतल्यासारखा देहाचा दाह होतो. भूकंप व्हावा आणि आम्हा मायलेकराला धरणीनं पोटात घ्यावं असं वाटतं. ('विटाळ', 'विटाळ' पृ. ६३)

५. परंतु अशा स्त्रियांचे मूक आक्रंदन आभाळभर होते. ('एका झाडानं किती टकरावं?', 'विटाळ' पृ. ८४)

६. त्याची सारी गात्रे बर्फासारखी थंडगार पडतात. शरीराचे मुटकुळे करून तो बाजूला जाऊन पडतो. गर्भाशयात मूल झोपावं, तसा तो दिसत असतो. ('घुसमट', 'विटाळ' पृ. ९४)

७. काही माणसे पोलादी मनाची असतात. परिस्थितीच्या ऐरणीवर त्यांच्यावर कसेही घण पडोत, ती खचत नाहीत. चेंडू जसा खाली आपटल्यावर वर..... वर उसळी मारण्याचा प्रयत्न करतो, तसे ते वागतात. ('आमदार', 'विटाळ' पृ. ३१)

अशी कितीतरी वाक्ये चपखल अर्थाभिसरणामुळे वाचकाला खिळवून टाकतात. एकंदरीत पवारांच्या कथा वाङ्मयीन सौंदर्याने ओतप्रोत भरलेल्या नसल्या तरी त्यांची मोजकीच पण लक्षणीय वाङ्मयीन वैशिष्ट्ये दुर्लक्षिण्याजोगी निश्चितच नाहीत.

नाळ त्यांच्या प्रश्नांशी जोडली गेली. हिंदीतील कथा वाचून पवार झपाटले. त्यातून त्यांची कथा सकस रूपात बाहेर पडली.

आपल्याकडे पुष्कळदा असा आरोप केला जातो की, सामाजिक बांधिलकीने लिहिणारे लेखक म्हणजे प्रचारकी थाटाने लिहिणारे. पवार यावर टीका करताना म्हणतात, 'देश, धर्म किंवा देह अथवा शाश्वत मूल्यांच्या नावाखाली केवळ मृत्यू, मैथुन, आहार, निद्रा, तरल निसर्ग, अज्ञाताचा शोध इत्यादी लेखनाची उच्च दर्जाची पायरी ठरवली जाते. ह्यातून 'माणूस' नेहमीच दुर्लक्षित होतो.'[४०] हा दुर्लक्षित 'माणूस' चितारण्याचा पवारांनी प्रयत्न केला. ज्या सामान्य माणसाला प्रचलित समाजव्यवस्थेत असुरक्षित वाटते, अभावग्रस्त समाजात जन्माला आल्यामुळे जो मनुष्य आजही भयकंपित आहे, त्याचे चित्रण जे मराठी कथेत नाही, ते पवारांनी केले आहे.

पवारांचे कथाविश्व व्यक्तिगत पातळीपेक्षा सामाजिक पातळीवर अधिक वावरते. त्यांची कथानके परकीय अथवा दुसऱ्या अवास्तव पातळीवरची नसतात. बाहेरून एखादे बीज आणून या भूमीवर त्याचे कलम पवार करीत नाहीत. शोषितांची कथा रंगवताना ते समाजव्यवस्थेविरुद्ध झगडणाऱ्या नायकांना प्रस्तुत करतात. भोगवटा मांडण्याच्या पार्श्वभूमीवर अवतरणारी त्यांची कथा दलितत्वाच्या मर्यादा ओलांडून पुढे जाते. कधीकधी पारंपरिक कथांचाच घाट घेऊन त्यांची कथा अवतरत



जी संघर्ष करीत असते. वैफल्याशी त्यांचे वाकडे आहे. झुंज त्यांना प्रिय आहे. जीवनावर त्यांची निष्ठा आहे. ग्रामीण जीवनाचे, दारिद्र्याचे, गलिच्छ वस्त्यांमधील जीवनाचे ते प्रत्ययकारी चित्रण करतात.

शंकरराव खरात यांनी 'सांगावा', 'बारा बलुतेदार', 'दौंडी', 'टिटवीचा फेरा', 'तडीपार', 'सुटका', 'आडगावचं पाणी', 'गावशीव', 'मुलाखत' इत्यादी कथासंग्रह लिहिले. त्यांचा पहिला कथासंग्रह 'बारा बलुतेदार' हा १९५९ साली प्रकाशित झाला. खरातांची कथाही पारंपरिक वळणाची आहे. त्यांच्या कथांतील घटनांचा साक्षी स्वत: निवेदक आहे. घटना कडवट असल्या तरी ते त्याच अभिनिवेशाने मांडीत नाहीत. आपण जसे जगलो, तसे आपण पात्रांचे जीवन रंगवावे, ही त्यांची वृत्ती आहे. दलितांचे जग नव्या आव्हानांना कसे सामोरे जाते, याचा शोध ते घेतात. सर्वसाधारण दलित कुटुंब ते अधिक प्रमाणात रेखाटतात. पोटासाठी चोरी, लाचारी या गोष्टी त्यांच्या कथांमध्ये नि:संकोच येतात. दलित जीवनाचे मूलभूत प्रश्न उपस्थित करण्यासाठी ते दलित कथा रेखाटतात.

बाबुराव बागूल यांचे 'जेव्हा मी जात चोरली होती', 'मरण स्वस्त होत आहे', 'सूड' हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. दलित कथेला मानाचे स्थान मिळवून देणारे शिल्पकार म्हणून बागूलांचे नाव घेतले जाते. करुणा व चीड या दोन्ही गोष्टींची विचित्र सांगड त्यांच्या कथेत आढळते. हाडामांसाची माणसे

दानवासारखी का वागतात? हा प्रश्न त्यांच्या कथेत येत राहतो. या प्रश्नांच्या उत्तराचा शोध हेच त्यांच्या कथांचे फल आहे. दारिद्र्य, दु:ख, दैन्य यांतून दलित जीवन मुक्त करण्यासाठी त्यांच्या कथा अवतरतात. १९६३ साली त्यांचा 'जेव्हा मी जात चोरली होती' हा कथासंग्रह प्रकाशित झाला. पोटाखालच्या इंद्रियाच्या भुकेपेक्षा पोटाच्या भुकेने तडफडणाऱ्या समाजाचे दु:ख बाबुरावांनी अधिक परिणामकारकरीत्या रंगवले आहे. त्यांची भाषा आक्रमक आणि विद्रोही आहे. तरी मानवी जीवनावर त्यांची श्रद्धा आणि प्रेम आहे. कर्तृत्वावर भरवसा ठेवणारी विचारसरणी त्यांच्या कथेतून व्यक्त होते.

साठे, खरात आणि बागूल या तीनही दलित कथेच्या शिल्पकारांच्या कथांची वैशिष्ट्ये आणि पवारांच्या कथेची वैशिष्ट्ये यांतील साम्यभेद शोधण्याचा प्रयत्न केला असता असे जाणवते की, कथेतील अनेक घटनांचे स्वत: साक्षी असणे व दलित जीवनाचे मूलभूत प्रश्न उपस्थित करणे, या दोन गोष्टी पवारांनी शंकरराव खरात यांच्या कथालेखनाच्या तत्त्वांतून घेतल्या आहेत. एखादी व्यक्ती केंद्रस्थानी असणे व तिचे संघर्ष करीत जगणे हे अण्णाभाऊंच्या कथेचे वैशिष्ट्य पवारांनी स्वीकारले आहे. कर्तृत्वावर भरवसा आणि पोटाखालील इंद्रियाच्या भुकेपेक्षा पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठी तडफडणाऱ्या समाजघटकांची कथा रंगवण्याची बागूल यांची विचारसरणी पवारांनी स्वीकारली आहे.



परंतु पवारांनी या तीन ज्येष्ठ दलित साहित्यिकांकडून हा वारसा घेतला आहे, असे म्हणणे योग्य वाटत नाही. पवारांच्या कथांचा तोंडवळा वेगळा आहे. त्यांचे विचार, त्यांचे अनुभव, त्यांच्या जाणिवा अशा विविध पातळींवर विचार केल्यास पवार इतरांचे अनुकरण करतात, असे म्हणणे चुकीचे ठरते. पवारांची स्वत:ची अशी स्वतंत्र विचारसरणी आहे. त्यांची स्वत:ची लेखनशैली आहे आणि अनुभवही त्यांचे स्वत:चेच आहेत.

सुरुवातीला पवारांनी रोमँटिक कथा लिहिल्या. 'अनुराग' ह्या मासिकात त्या छापल्या गेल्या. पण त्यांना अभिप्रेत असलेली दलित जाणीव 'पंख' या कथेद्वारे प्रकट झाली. 'आम्ही' या मासिकात ती प्रकाशित झाली. त्यानंतर पवारांच्या मोजक्याच परंतु दर्जेदार कथा पुढे आल्या. 'विटाळ' मराठीसह हिंदी, इंग्रजी भाषेत गेली. पवारांनी ऐन आणीबाणीत लिहिलेली 'वीस रुपये' नावाची कथा 'सत्यकथे'ने नाकारल्यावर 'घुसमट' या नावाने 'राजस' या मासिकात प्रकाशित झाली. तिथून ती 'धर्मयुग' ह्या हिंदी मासिकात गेली आणि पुढे कानडी, तेलगूतही प्रकाशित झाली.

हिंदीतील समांतर साहित्य मेळाव्याच्या निमित्ताने पवारांनी भारतभ्रमण केले. हिंदी साहित्यिक कमलेश्वर यांच्यासह कितीतरी हिंदीतील साहित्यिकांशी त्यांच्या ओळखी झाल्या. त्यांच्यासोबत केलेल्या चर्चेतून पवारांच्या कित्येक प्रश्नांची

## संदर्भ

१. निंबाळकर, वामन, 'दलित कथा : एक अभ्यास', दलित साहित्य : स्वरूप व भूमिका, प्रथमावृत्ती, प्रबोधन प्रकाशन, नागपूर, १९८६, पृ. ८०.

२. मेश्राम, योगेन्द्र, 'दलित जीवनाची आशयघन प्रत्ययकारिता — आजची दलित कथा आणि कादंबरी', दलित साहित्य : उद्गम आणि विकास, प्रथमावृत्ती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९८, भाग दोन, पृ. १८९.

३. निंबाळकर, वामन, 'दलित कथा : एक अभ्यास', उनि., पृ. ८५.

४. फडके, भालचंद्र, 'दलितांची कथा : स्वरूप आणि विचार', दलित साहित्य : वेदना व विद्रोह, द्वितीयावृत्ती, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८९, पृ. १७९.

५. निंबाळकर, वामन, 'दलित कथा : एक अभ्यास', उनि., पृ. ८४—८५.

६. भगत, दत्ता, 'कथा', दलित साहित्य, संपा. भालचंद्र फडके, दादासाहेब मोरे, प्रथमावृत्ती, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, १९९२, पृ. ५५.

७. चवरे, रा.गो., 'दलित कथावाङ्मय', मराठी कथा : प्रवृत्ती आणि प्रवाह, प्रथमावृत्ती, मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती, १९९५, पृ. २५०.

८. भगत, दत्ता, 'कथा', दलित साहित्य, उनि., पृ. ५५.



असली, तरी मानवी मूल्यांचा होणारा ऱ्हास आणि सामाजिक दृष्टीने अस्वस्थ करून सोडणारी मूल्ये यांना ते प्रखरपणे मांडतात. वास्तवाचे ते जळजळीत चित्रण करतात. पण विद्रोह मात्र त्यांच्या कथानायकांना फारसा मानवत नाही. पुष्कळदा त्यांचे नायक तडजोडीची भाषा बोलतात.

काही कथांमध्ये लेखकाची अकारण शेरेबाजी आढळते. 'एका झाडानं किती टकरावं?' ही कथा त्याचेच उदाहरण म्हणून देता येईल. कदाचित पवारांची अनुभव मांडण्याची पद्धत याला कारणीभूत असावी. म्हणूनच वेश्यावस्तीचा अनुभव नामदेव ढसाळ जितक्या जळजळीतपणे, प्रखरतेने, भडकपणे मांडतात, तितक्या जळजळीतपणे, प्रखरतेने किंवा भडक स्वरूपात पवार मांडू शकत नाहीत.

पवारांच्या कथांतून व्यक्तिचित्रणे येतात; पण ही चित्रणे बहुधा शोकांतिकेचीच असतात. एकंदरीत दलित जीवन मुळात शोकांतिकाच असल्याने दलित कथा पर्यायाने 'शोकांतिका' होते. पण या शोकांतिकेला जबाबदार कोण? त्यावर उपाय काय? ह्या प्रश्नांची उकल पवारांची कथा करीत नाही. या संबंधात निर्णय घेण्याची जबाबदारी पवार वाचकांवरच सोपवतात. पवारांची कितीतरी कथानके अंतिम चरणात कुठला ना कुठला प्रश्न, बहुधा सामाजिकच, उपस्थित करून जातात. उत्तर शोधण्याच्या भानगडीत मात्र त्यांची लेखणी पडत नाही आणि कदाचित त्यांच्या परीने त्यांना उत्तर माहितीही

असले, तरी ते वाचकांकडूनच उत्तराची अपेक्षा करतात.

सर्वमान्य समजुतीप्रमाणे दलित कथा ही विद्रोही असते. पण योगीराज वाघमारे, बाबुराव बागूल यांच्या कथेसारखी पवारांची कथा प्रखर विद्रोही नाही. ती संयमी आहे. पवारांच्या कथानकांमधील विद्रोह हा एक सुजाण आणि समंजस व्यक्तिमत्त्वाचा विद्रोह आहे. आपल्याला कराव्या लागत असलेल्या संघर्षाचे भान ठेवून केलेला विद्रोह आहे. म्हणूनच तो योग्य असा संयम राखतो.

पवारांच्या कथांमधील संघर्ष हा मूलभूत मूल्यसंघर्ष आहे. सुष्ट आणि दुष्ट पात्रांचा तो संघर्ष नाही व्यक्तीविरुद्ध सामाजिक परिस्थिती असा तो संघर्ष आहे. त्यांची भाषाही बंडखोरीची नाही. त्यांची स्वत:ची भाषाशैली आहे. तिची काही खास पद्धतही नाही, तरीपण तिचे वेगळेपण मात्र जाणवते. त्यांची कथा वास्तव असल्याने ते कथांच्या केंद्रस्थानी आहेत. पण काही कथांची निवेदनशैली तृतीयपुरुषी आहे. काही कथा सरळसोट पुढे जातात तर काही संवादाच्या रूपाने पुढे सरकतात. कधीकधी त्यांच्या कथांमध्ये तपशिलाचा भरणा अधिक असतो, तर कधीकधी थोडक्यात आशय व्यक्त होतो.

एकंदरीत कथाकार म्हणून दलित साहित्यातील दया पवारांचे योगदान कमी लेखणे योग्य होणार नाही. पवारांची कथा म्हणजे एका समंजस व्यक्तिमत्त्वाने आपल्या



सभोवतालच्या जीवनातील मूल्यसंकल्पनांचा, व्यक्तींचा, समाजजीवनाचा खोलवर घेतलेला शोध आहे. मराठी कथेपासून दुर्लक्षिल्या गेलेले अनेक अनुभव दलित कथेने प्रकट केले. पवारांचेही त्यात बरेच योगदान आहे. सामाजिक परिवर्तनाचा शोध पवारांनी घेतला आहे. पूर्वापार चालत आलेल्या अनिष्ट रूढी, परंपरा, गावकी, चुकीच्या मूल्यसंकल्पना यांमुळे निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांना त्यांनी कथेद्वारे वाचा फोडली आहे. जीवनाचे मूलभूत प्रश्न, स्वसमाज बांधिलकी यांच्याप्रती त्यांच्या मनात जिव्हाळा आहे. तो त्यांच्या कथेतून निश्चितच प्रकटतो. त्यांची कथा काही वेळा शेरेबाजी करीत असली, तपशिलाच्या पातळीवर जात असली, तरी तिच्यामागे असलेल्या अनुभवांचा कॅनव्हास अत्यंत वास्तव आणि विस्तृत आहे. शब्दांच्या जंजाळात न गुरफटणारी, मानवतेची मूल्ये जपणारी, जीवनाचा तळठाव घेणारी अशी त्यांची कथा आहे. दलित कथेच्या विश्वात त्यांची कथा आगळ्यावेगळ्या वैशिष्ट्यांनी नटलेली आहे. ज्याप्रमाणे दया पवारांची 'विटाळ' ही कथा मराठी साहित्यविश्व ओलांडून कितीतरी भाषांमध्ये पोचली, जागतिक पातळीवर गेली, त्याचप्रमाणे पवारांनी दलित कथेद्वारे दलितत्वाच्या मर्यादा ओलांडून दलित कथाविश्वातच नव्हे, तर एकंदर मराठी कथाविश्वात फार मोठी झेप घेतली आहे, हे निर्विवाद सत्य आहे.

❑❑❑

सात वर्षे सेवा दिली. त्या दरम्यान ते तामीळनाडूमधील चेन्नई, पंजाबमधील चंदिगढ आणि राजस्थानातील उतरलाई, जि. बाडमेर येथे कार्यरत होते. त्यानंतर सहायक शिक्षक, अधिव्याख्याता आणि आता इंदिरा महाविद्यालयात प्राचार्यपदावर कार्यरत आहेत.

शालेय व महाविद्यालयीन जीवनात डॉ. पवन मांडवकर यांनी वक्तृत्व, वादविवाद स्पर्धांची तसेच खेळात रनिंगमध्ये अनेक पारितोषिके पटकावली आहेत. त्यांना जे पुरस्कार प्राप्त झाले, त्यात विदर्भ संत साहित्य संमेलन अंजनगावसूर्जीचे सन्मान पत्र, आध्यात्मिक सहजसमाधी विश्वविद्यापीठाचा आचार्य काव्यरत्न पुरस्कार, चतुर्थ अखिल भारतीय प्रतिभा सम्मान पुरस्कार समारोह, इन्दौर तर्फे म. ज्योतिबा फुले शिक्षाविद् पुरस्कार, साहित्यप्रेमी सार्वजनिक वाचनालय, इस्लामपूरचे साहित्य गौरवपत्र यांचा समावेश आहे. सर्वोत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार त्यांच्या 'ब्यांड मास्तर' ह्या कथासंग्रहाला प्राप्त झाला आहे.

साहित्य, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले असून परदेशातही शोधनिबंधांचे वाचन त्यांनी केलेले आहे. विद्यापीठाच्या समित्यांवरही त्यांनी काम केले असून प्रकाशन व्यवसायाशीही ते निगडित आहेत. सध्या अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेचे ते अध्यक्ष असून अमरावती विद्यापीठ प्राचार्य फोरमचे कार्यकारिणी सदस्य आहेत.

❒❒❒



९. नलगे, चंद्रकुमार, पानतावणे, गंगाधर (संपा.), 'दलित कथा : काही विचार', दलित कथा, द्वितीयावृत्ती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९४, पृ. ६.

१०. खांडगे, भास्कर, 'विटाळ', दया पवार यांच्या साहित्याचा अभ्यास, प्रथमावृत्ती, विमल प्रकाशन, पुणे, १९८९, पृ. १३०.

११. नलगे, चंद्रकुमार, पानतावणे, गंगाधर (संपा.), 'लेखक परिचय', उनि.

१२. नलगे, चंद्रकुमार, पानतावणे, गंगाधर (संपा.), 'दलित कथा : काही विचार', दलित कथा, उनि., पृ. ११–१२.

१३. तत्रैव, पृ. १२.

१४. तत्रैव, पृ. १३.

१५. तत्रैव, पृ. १३.

१६. तत्रैव, पृ. १४.

१७. तत्रैव, पृ. १५.

१८. नलगे, चंद्रकुमार, पानतावणे, गंगाधर (संपा.), 'लेखक परिचय', उनि.

१९. मेश्राम, योगेन्द्र, 'दलित जीवनाची आशयघन प्रत्ययकारिता – आजची दलित कथा आणि कादंबरी', उनि., पृ. २२६.

२०. तत्रैव.

२१. गजभिये, अनिल, 'दलित कथा : जीवनमूल्याधिष्ठित', दलित साहित्य : विचार आणि वैभव, प्रथमावृत्ती, श्री

अहिल्या प्रकाशन, इंदूर, १९९१, पृ. २०.
२२. पवार, दया, ' 'विटाळ'च्या पलीकडे', विटाळ , तृतीयावृत्ती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९६.
२३. तत्रैव.
२४. तत्रैव.
२५. पवार, दया, 'विटाळ', विटाळ, उनि., पृ. ६३.
२६. तत्रैव, पृ. ६४.
२७. पवार, दया, 'ब्रोकन मेन', कोंडवाडा, तृतीयावृत्ती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९४, पृ. ५७.
२८. चौघुले, वि.शं., विटाळ (समीक्षा), रविवार सकाळ, पुणे दि. ४–९–१९८३, पृ. ६.
२९. पवार, दया, 'एका झाडानं किती टकरावं?', विटाळ, उनि., पृ. ८२.
३०. तत्रैव, पृ. ८४–८५.
३१. पवार, दया, ' 'विटाळ'च्या पलीकडे', उनि.
३२. पवार, दया, 'विटाळ', विटाळ, उनि., पृ. ६३.
३३. नलगे, चंद्रकुमार, पानतावणे, गंगाधर (संपा.), 'दलित कथा : काही विचार', दलित कथा, उनि., पृ. १६.
३४. मेश्राम, योगेन्द्र,'दलित जीवनाची आशयघन प्रत्ययकारिता — आजची दलित कथा आणि कादंबरी', उनि., पृ. २२७.
३५. गजभिये, अनिल, 'दलित कथा : जीवनमूल्याधिष्ठित', उनि., पृ. १९.



३६. जाधव, रा.ग., 'नवोदित दलित कथा', निळी पहाट, द्वितीयावृत्ती, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९७९, पृ. १०९.
३७. तत्रैव.
३८. नलगे, चंद्रकुमार, पानतावणे, गंगाधर (संपा.), 'दलित कथा : काही विचार', दलित कथा, उनि., पृ. ११.
३९. फडके, भालचंद्र, 'दलितांची कथा : स्वरूप आणि विचार', उनि., पृ. १८०.
४०. पवार, दया, ' 'विटाळ'च्या पलीकडे', उनि.

❑❑❑

# प्राचार्य डॉ. पवन मांडवकर

डॉ. पवन मांडवकर यांनी मराठी आणि इंग्रजी अशा दोन विषयात एम.ए. तसेच बी.एड.ची पदवी प्राप्त केली असून 'दया पवार : वाङ्मयदर्शन आणि चिकित्सा' या विषयावर त्यांना अमरावती विद्यापीठाने आचार्य पदवीने सन्मानित केले आहे. मराठी विषयातच ते यूजीसी तर्फे घेतली जाणारी नेट परीक्षाही उत्तीर्ण झाले आहेत. एम.ए. मराठीत ते विद्यापीठातून प्रथम आले होते तर बी.एड.च्या परीक्षेत त्यांनी प्रावीण्य मिळविले होते.

त्यांनी भारतीय वायूसेनेत सेमीटेक्निशियन म्हणून